सोलापूर तरुण भारत
आसमंत



# जागतिक आर्थिक घुसळणीत भारत चमचमता तारा

उत्तम आर्थिक विकासदर, संतुलित देशांतर्गत महागाई, स्थिर बाह्य क्षेत्र, स्थिर खासगी उपभोग, गुंतवणुकीला भक्कम मागणी या घटकांच्या आधारे दमदार आर्थिक विकास भारताने साधल्याचे देशाच्या आर्थिक पाहणी अहवाल २०२३-२४ मधून स्पष्ट झाले. त्यानिमित्ताने या आर्थिक पाहणी अहवालातील काही ठळक निरीक्षणांचा ऊहापोह करणारा हा लेख...

लक्ष्यवेध

**शौनक कुलकर्णी**

दि. १ फेब्रुवारीला लोक कान टवकारून, सज्ज होऊन बसलेले असतात. अर्थसंकल्पात काय तरतुदी आहेत, त्यामुळे आपल्या रोजच्या आयुष्यात काय बदल होणार, काय महागणार, काय स्वस्त होणार. मध्यमवर्गीय, नोकरदार, आयकर भरणारे, सवलत मिळते की करात वाढच होते, हे जाणून घेण्यासाठी सर्वाधिक उत्सुक असतात. ते बरोबरच आहे. पण, आताशा किंबहुना मोदी सरकारच्या काळात सुरुवातीचे काही अर्थसंकल्प सोडले, तर फार काही उलथापालथ घडवणारे निर्णय येत नाहीत. नुकताच आलेला निवडणुकोत्तर पूर्ण अर्थसंकल्पही याला अपवाद नाही. पण, या सगळ्यात एका महत्त्वाच्या गोष्टीकडे अर्थतज्ज्ञ, अभ्यासक वगळता इतरांचे फार लक्ष जात नाही, ती म्हणजे आर्थिक पाहणी अहवाल.

देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार, सध्या डॉ. व्ही. अनंत नागेश्वरन हे मुख्यतः रिझर्व्ह बँकेकडून आलेल्या माहिती-आकडेवारीच्या आधारे आर्थिक पाहणी अहवाल तयार करतात. तो केंद्रीय अर्थमंत्र्यांकडे स्वाधीन करतात. या आर्थिक पाहणी अहवालात गेल्या वर्षीच्या भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा, त्यापूर्वीच्या काळातील धोरणांमुळे गेल्या वर्षात काही परिणाम झाला का? जागतिक आर्थिक परिस्थिती आणि पुढील काळात अर्थव्यवस्था कशी असेल? आव्हाने काय असतील? यांवर टिप्पणी असते. हा अहवाल अर्थसंकल्प मांडण्याच्या आधी संसदेच्या पटलावर ठेवणे आवश्यक असते. त्यानुसार दरवर्षी साधारण दि. ३१ जानेवारीला तो ठेवला जातो. यंदा निवडणुकीचे वर्ष असल्यामुळे फेब्रुवारीत अंतरिम अर्थसंकल्प मांडला गेला होता. त्यामुळेच पूर्ण आर्थिक पाहणी अहवाल दि. २२ जुलै रोजी आला आणि दि. २३ जुलै रोजी अर्थसंकल्प.

वर्ष २०२३-२४च्या आर्थिक पाहणी अहवालात २०१४ ते २०२४ या दशकाचा, दशकातील बदलांचा आढावा घेत मांडणी केली आहे. त्यातील वैशिष्ट्ये पुढे येतीलच, सुरुवात प्राथमिक आकडेवारीपासून करणे आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदर ८.२ टक्के, तर महागाईदर ५.४ टक्के, सकल मूल्यवर्धन ७.२ टक्के आणि करसंकलनात १९.१ टक्के निव्वळ वाढ, चालू खात्यातील तूट नीचांकी ०.७ टक्क्यांवर आली आहे. या आकडेवारीचे सार शब्दांत वर्णन करायचे तर, उत्तम आर्थिक विकासदर, संतुलित देशांतर्गत महागाई, स्थिर बाह्य क्षेत्र, स्थिर खासगी उपभोग, गुंतवणुकीला भक्कम मागणी या घटकांच्या आधारे दमदार आर्थिक विकास भारताने साधला आहे. ही दमदार कामगिरी गेल्या दशकभराच्या धोरणात्मक पायाभरणीचा परिपाक आहे. केंद्र सरकारने गेल्या दहा वर्षांत अनेक मूलभूत धोरणात्मक निर्णय घेतले. त्यात उद्योग, वित्त क्षेत्र आमूलाग्र बदलणारी धोरणे होती. त्याचबरोबर 'अंत्योदय' सूत्रानुसार आखलेली धोरणे होती. दिवाळखोरी आणि नादारी संहिता, वस्तू व सेवाकर, रेरासारखे वित्त, उद्योगक्षेत्र ढवळून काढणारे हे निर्णय आहेत. जन-धन, युपीआय, मुद्रा, स्टॅण्ड अपसारखी 'अंत्योदय' सूत्रानुसार राबवलेली धोरणे, योजना आहेत. सामाजिक क्षेत्रात उज्ज्वला, उजाला, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, जल जीवन मिशन, आयुष्मान भारत, आवास योजना अशा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणाऱ्या, 'अंत्योदय' सूत्रानुसारच्या योजना आहेत. त्याचबरोबर सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगक्षेत्राला चालना देण्यासाठी 'आत्मनिर्भर भारत' योजना, कृषी क्षेत्रासाठी कृषी सिंचाई, EANAM आणि पायाभूत सुविधाविकासावर प्रचंड भर दिला गेला आहे.

सामाजिक विकास, सामाजिक न्याय यासाठी होणाऱ्या खर्चातदेखील गेल्या दशकात लक्षणीय वाढ झाली आहे. सामाजिक सुविधा यावर होणारा खर्च जीडीपीच्या ७.९ टक्क्यांवर पोहोचला आहे, आरोग्य सुविधेवरील खर्च १.९ टक्क्यांवर पोहोचला आहे. आरोग्यक्षेत्रात 'आयुष्मान भारत योजने'ने कनिष्ठ मध्यमवर्ग, गरिबांच्या आयुष्यात खूप मोठे परिवर्तन आणले आहे. मध्यमवर्ग, कनिष्ठ मध्यमवर्ग आणि गरीब यांना आपल्या आर्थिक स्थितीच्या एक किंवा दोन स्तर खाली आणण्यात आरोग्यावरील, विशेषतः मोठ्या, गंभीर आजारांवरील उपचाराचा खिशातून करावा लागणारा खर्च हे प्रमुख कारणांपैकी एक आहे. 'आयुष्मान भारत'मुळे ही शक्यता खूप कमी झाली आणि त्यामुळे वाचलेले उत्पन्न इतर उत्पादक घटकांकडे वळून कौटुंबिक उन्नतीचा वेग वाढला, असे आर्थिक पाहणी अहवालात नमूद केले आहे.

दिवाळखोरी आणि नादारी संहितेमुळे वित्तक्षेत्रातील 'ट्वीन बॅलन्स शीट प्रॉब्लेम' सुटायला खूप मोठ्या प्रमाणात मदत झाली. गेल्या तीन वर्षांत ३३ हजार, ३९४ कॉर्पोरेट कंपन्या ज्यात विविध वित्त संस्थांचे १३.९ लाख कोटी रुपये अडकले होते, अशी प्रकरणे निकालात निघाली आहेत. बँका सुस्थितीत आल्या आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून होणारा वित्तपुरवठा १६४.३ लाख कोटींवर गेला आहे. 'प्रोडक्शन लिंक्ड इन्सेन्टिव्ह' योजनांमधून १.२८ लाख कोटींची गुंतवणूक आली आहे. खासगी गुंतवणुकीला चालना, एमएसएमईचा विस्तार आणि कृषी क्षेत्रावर भर देण्यात आला आहे. उद्योगवृद्धीदर ९.५ टक्क्यांवर गेला आहे. हे होत असताना मात्र एक महत्त्वपूर्ण नोंद करण्यात आली आहे की, वित्तपुरवठ्यात बँकांचा दबदबा कमी होत भांडवल बाजाराचा सहभाग वाढत आहे. याचे पडसाद अर्थसंकल्पीय तरतुदीत दिसून आले. फ्युचर्स-ऑप्शन ट्रेडिंग, समभाग, म्युच्युअल फंड गुंतवणुकीतून फिरणारा पैसा काही प्रमाणात का होईना, पुन्हा बँकिंग व्यवस्थेत यावा, अशा तरतुदी करण्यात आल्या आहेत. या सर्व सकारात्मक वातावरणात काही चिंताही यात व्यक्त करण्यात आल्या आहेत. जागतिक पातळीवर, विशेषतः विकसित देशात व्याजदर वाढीमुळे भारतातदेखील व्याजदर वाढला. परिणामी, वित्तभरणीचा खर्च वाढला. तरीही भारतात येणाऱ्या थेट परकीय गुंतवणुकीवर परिणाम झाला नाही. भांडवली बाजारातदेखील झाला नाही. कारण, देशांतर्गत पैसा म्युच्युअल फंड आणि वैयक्तिक माध्यमातून गुंतवला गेला. हरित ऊर्जा क्षेत्रात भारताने दणदणीत कामगिरी केली. त्यासाठी गुंतवणूकदेखील केली. हे करत असताना खासगी क्षेत्रातील भांडवलनिर्मितीवर भर, रोजगारनिर्मितीवर भर देत वेगवान आर्थिक वृद्धीचा दर राखता येणार आहे.

आर्थिक पाहणी अहवाल आणि अर्थसंकल्प दोन्हीही आता आलेले आहेत. अर्थसंकल्पावर मोठ्या प्रमाणात चर्चा, वादविवाद झाले,

(पान ४ वर)

# सार्वजनिक सुरक्षा कायद्याची आवश्यकता

नुकतेच महाराष्ट्राच्या विधानसभेत सार्वजनिक सुरक्षा अधिनियम विधेयक सादर करण्यात आले. विरोधी पक्षांनी या विधेयकाचे रूपांतर कायद्यात झाल्यास महाराष्ट्रात 'पोलीसराज' येईल, अशी हाकाटी उठवली आहे. पण, नेमकी वस्तुस्थिती काय आहे, हे तपासणे आवश्यक. त्यासाठी हा लेखप्रपंच...

वेध

**प्रवीण दीक्षित**



महाराष्ट्र व देशात शांतता बिघडवण्याच्या उद्देशाने व देशामध्ये सामान्य लोकांमध्ये भीती निर्माण करून दहशतवाद पसरविण्याचे मनसुबे अनेक संस्था व व्यक्ती पद्धतशीरपणे राबवित असल्याचे आढळते. त्यातील काही प्रमुख घटनांकडे या लेखाच्या माध्यमातून लक्ष वेधले आहे. भीमा-कोरेगावसंदर्भात महाराष्ट्रभर जातीय दंगलींचा जानेवारी २०१८ च्या सुरुवातीस आगडोंब उसळला आणि त्यात हकनाक एका व्यक्तीचा बळी गेला. पोलीस तपासानंतर 'शहरी माओवादी' नावाखाली वावरणाऱ्या अनेक प्रमुख नेत्यांना दिल्ली, मुंबई , हैदराबाद व देशाच्या अन्य भागांतून अटक करण्यात आली. त्यातील अनेक जण आजही सर्वोच्च न्यायालयात जाऊनही तुरुंगात आहेत. सैन्यदलप्रमुख जनरल रावत यांनी त्यावेळी दिल्लीत बोलताना इशारा दिला होता, 'खलिस्तानी चळवळीला पंजाबमध्ये प्रोत्साहन मिळत आहे.' त्यासाठीचा निधी महाराष्ट्रातून मिळत असण्याची शक्यता आहे.

केरळमधील 'Indian Prlar Front (IPF)' या 'जिहाद' संकल्पनेला खतपाणी घालणाऱ्या मदानी याने कोईम्बतूर व अन्य भागांत घडवलेल्या बॉम्बस्फोटांत अनेक निरपराध व्यक्तींचा बळी गेला होता. मुंबई व महाराष्ट्राच्या अन्य भागांत आज 'आयपीएफ' च्या छुप्या कारवायांना जोर प्राप्त झाला आहे. 'इसिस' या दहशतवादी संघटनेकडे आकर्षित होणाऱ्या काही व्यक्ती कल्याण, पुणे या भागांतून सीरियात गेल्याचे निष्पन्न झाले होते. अशा प्रवृत्तींना खतपाणी घालणाऱ्या काही संघटना व व्यक्ती महाराष्ट्रात ठिकठिकाणी कार्यशील असण्याची शक्यता आहे. अशा राष्ट्रविघातक अनेक प्रवृत्तींना चिथावणी देणाऱ्यांविरुद्ध सध्या 'केंद्रीय बेकायदेशीर कारवाया प्रतिबंध कायद्या'प्रमाणे कारवाई केली जाते. परंतु, या कायद्यामध्ये असलेल्या अनेक त्रुटी दूर करून 'सार्वजनिक सुरक्षा कायदा' करण्याची आवश्यकता आहे. भारत सरकारनेही महाराष्ट्र सरकारने असा कायदा करावा, अशी सूचना केली आहे.

छत्तीसगढ, तेलंगण, आंध्र प्रदेश व अन्य अनेक राज्यांनी 'विशेष जनसुरक्षा अधिनियम' कायदा २००५ नंतर लागू केला आहे. भीमा-कोरेगाव दंगलीतील आरोपी व शहरी माओवादी सुधा भारद्वाज यांनी 'Peole'r Union for Civil Libertier (PUCL) तर्फे छत्तीसगढ उच्च न्यायालयात सदर कायदा रद्द करावा, तो बेकायदेशीर आहे, अशा प्रकारचा कायदा करण्यास राज्ये असमर्थ आहेत, अशी मागणी न्यायालयात केली होती. यासंबंधी ११ एप्रिल २०१४ रोजी छत्तीसगढच्या उच्च न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधीश व अन्य एक न्यायाधीश यांच्या खंडपीठाने हे सर्व आक्षेप अमान्य करत स्पष्ट केले होते की, लोकांमध्ये भीती व दहशतवाद पसरू नये, यासाठी राज्यांनी केलेला कायदा, कुठल्याही प्रकारे भारतीय राज्यघटनेच्या विरुद्ध नाही. तो तर्काला धरून आहे व त्यात बेकायदेशीर असे काहीही नाही. त्यामुळे अशाच प्रकारचा कायदा राष्ट्रविघातक अशा वर उल्लेखिलेल्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी करण्याची आवश्यकता आहे. सदर कायद्याचा अभ्यास केल्यानंतर असे दिसते की, गैरकायदेशीर कारवायांमध्ये चिथावणीखोर भाषणे देणे, सार्वजनिक शांतता बिघडवणे, सार्वजनिक शांततेसाठी निर्माण केलेल्या संस्था किंवा व्यक्तींवर हल्ला करणे, हिंसात्मक कारवाया करण्यासाठी प्रोत्साहन देणे, दहशतवाद पसरविणे, अग्निशस्त्रे वापरण्यास प्रोत्साहन देणे व कायद्याने केलेल्या संस्था व कायद्यांविरुद्ध वागण्यास प्रोत्साहन देणे. सदर कारवायांसाठी निधी व रसद गोळा करणे, या सर्व बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे.

सध्याच्या केंद्रीय गैरकायदेशीर प्रतिबंधक कायद्यामध्ये यातील अनेक गोष्टींचा उल्लेख केलेला नाही. केंद्रीय कायदा भारताच्या सार्वभौमतेला धोका देणार्या कारवायांविरुद्ध आहे. राज्यात होत असणार्या अनेक गैरकायदेशीर कारवायांना त्यामुळे प्रतिबंध करणे अशक्य आहे. 'छत्तीसगढ विशेष सुरक्षा सार्वजनिक सुरक्षा अधिनियमा'प्रमाणे जी व्यक्ती अशा गैरकायदेशीर संस्थेसाठी निधी देते किंवा घेते; तिला तीन वर्षांचा कारावास आहे. अशाप्रकारे बेकायदेशीर कारवायांना चिथावणी देणाऱ्या व्यक्तीला सात वर्षांची शिक्षा सुचविण्यात आली आहे. या कायद्याचा लोकशाही मार्गाने विरोध करणाऱ्याविरुद्ध वापर होऊ नये, यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे कोणत्याही संस्थेस बेकायदेशीर जाहीर करण्यापूर्वी सर्व उपलब्ध पुरावे, या कायद्याने प्रस्थापित विशेष सल्लागार मंडळापुढे ठेवावे लागतात. या सल्लागार मंडळात उच्च न्यायालयाचे तीन सर्वांत वरिष्ठ न्यायाधीश सदस्य आहेत. त्यातील एकास त्याचे प्रमुख करण्यात आले आहे. सल्लागार मंडळाने मान्य केल्यानंतरच एखादी संस्था बेकायदेशीर म्हणून जाहीर होते व त्यांच्या बेकायदेशीर कारवायांवर कारवाई करणे शक्य होते. त्यामुळे या कायद्याचा गैरवापर होईल, अशी हाकाटी पिटणाऱ्यांना योग्य प्रत्युत्तर देण्यात आले आहे. अशा प्रकारचा कायदा उपलब्ध नसण्यामुळे मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व अन्य अनेक ठिकाणी शहरी माओवादी वेगवेगळ्या माध्यमांतून सार्वजनिक सभा घेऊन गैरकायदेशीर कृत्यांना राजरोस प्रोत्साहन देत आहेत. 'Tata Inrtirrtªe of Sobial Sbienber' (TISS) सारख्या केंद्रीय संस्था, राज्यातील अनेक विद्यापीठे व वसतिगृहे या ठिकाणी अशा गैरकायदेशीर कारवायांना प्रोत्साहन द्यायचे अड्डे बनले आहेत. त्यातून तरुणांमध्ये जातीय तेढ निर्माण करणे, धार्मिक दंगली पसरवणे, गैरकायदेशीर कृत्यांसाठी नेतृत्व निर्माण करणे, निधी व रसद गोळा करणे, अशा कारवाया चालू आहेत. सध्याच्या प्रचलित कायद्यामध्ये या गोष्टी घडताना दिसून येत असूनदेखील त्या प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांकडे किंवा न्यायसंस्थेकडे पुरेशा तरतुदी नाहीत. त्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी आपसातील मतभेद बाजूला ठेवून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी व लोकांना निर्भयपणे विकास साध्य करण्यासाठी 'महाराष्ट्र सार्वजनिक सुरक्षा अधिनियम' विधानमंडळात मंजूर करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. शासनानेही यात दिरंगाई न करता, आपली जबाबदारी पार पाडली आहे. लवकरात लवकर हा कायदा होईल व महाराष्ट्रात त्यामुळे शांतता निर्माण होईल, अशी अपेक्षा. (लेखक निवृत्त पोलीस महासंचालक आहेत.)

# बांगलादेशींच्या उमाळ्याने 'हद्द' ओलांडली!

बांगलादेशातील हिंसाचारग्रस्तांना आपल्या राज्यात आश्रय देण्याची घोषणा प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी नुकतीच केली. त्यावरुन बांगलादेशनेही आता आमच्या अंतर्गत प्रश्नांमध्ये ढवळाढवळ करु नका, म्हणून खडे बोल सुनावले आहेत. त्यानिमित्ताने असाच प्रश्न उपस्थित होतो की, प. बंगाल ही ममता बॅनर्जी यांची खासगी मालमत्ता आहे का? परकीय नागरिकांना त्या कशा स्वीकारू शकतात?

परराष्ट्रकारण

**राहुल बोरगांवकर**

बांगलादेशातही राखीव जागांवरून आंदोलन पेटले. मात्र, हे आंदोलन खूपच हिंसक आणि देशव्यापी झाले. कायदा-सुव्यवस्थेची स्थिती कायम राखण्यासाठी लष्कराला पाचारण करण्यात आले आणि देशभरात संचारबंदी लागू करण्यात आली. तेथील सर्वोच्च न्यायालयाने सरकारपुरस्कृत लोकांच्या आरक्षणाची टक्केवारी घटविल्यावर हे आंदोलन आता शमत चालले आहे. त्यात १०० पेक्षा अधिक लोक मृत्युमुखी पडले.

बांगलादेशातून रोजगाराच्या आशेपोटी आजही भारतात अखंडपणे निर्वासितांची घुसखोरी सुरुच असते. कितीही प्रयत्न केला, तरी या घुसखोरांना पूर्णपणे रोखणे हे सर्वस्वी आव्हानात्मकच. त्याला केवळ बांगलादेशाशी असलेली प्रचंड मोठी सरहद्द जबाबदार आहे, असे नाही, तर प. बंगाल या सीमावर्ती राज्यातील सत्तारूढ नेतेही तितकेच जबाबदार. आसाममध्ये भाजपचे सरकार आल्यापासून त्या राज्यात घुसखोरांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर घटले असले, तरी त्याची भरपाई प. बंगालमध्ये होत असते. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे सारे राजकारण हे मुस्लीम अनुनयावर आधारित आहे. त्यामुळे बांगलादेशातून येणाऱ्या घुसखोरांना त्यांचे सरकार सर्व सोयीसुविधा तर उपलब्ध करून देतेच, पण आधारकार्ड, रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र यांसारखी महत्त्वाची कागदपत्रेही तयार करून देते. त्यामुळे प. बंगालमध्ये कोण बांगलादेशी आणि कोण भारतीय, हे कळणे फारच जिकिरीचे. ममता यांचे मतांसाठी तुष्टीकरणाचे राजकारण याला जबाबदार.

आपल्या या मुस्लीम अनुनयाच्या राजकारणाला मोठी चालना देण्यासाठी, ममता बॅनर्जी यांनी सध्या त्या देशात सुरू असलेल्या आंदोलनाचाही वापर करून घेण्याचा प्रयत्न केला. देशातील कमालीच्या दारिद्र्याने

(पान ४ वर)



(पान ४ वर)

# अमेरिकन मिड वेस्ट, प्रझेकरोज आणि काझीमीर

राष्ट्ररक्षा

ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३




अमेरिकन संयुक्त संस्थाने किंवा अमेरिका या देशामध्ये एकूण ५० संस्थाने किंवा राज्ये आहेत. यापैकी उत्तर डकोटा, दक्षिण डकोटा, नेब्रॅस्का, कॅन्झझ, मिनेसोटा, अयोवा, मिझुरी, विस्कॉन्सिन, इलिनॉय, मिशिगन, इंडियाना आणि ओहायो एवढ्या राज्यांना 'मिड वेस्ट' असे म्हटले जाते. आजचे अमेरिकन राष्ट्र हे युरोपीय गोऱ्या स्थलांतरित लोकांचे राष्ट्र आहे, हे आपल्याला माहीतच आहे. कोणकोणत्या देशांमधले आहेत हे स्थलांतरित? सर्वात मोठी संख्या अर्थातच इंग्लंडची. मग इटली, आयर्लंड, जर्मनी आणि पाचव्या क्रमांकावर आहे पोलंड. आता गंमत बघा हं; इटली, आयर्लंड, जर्मनी आणि पोलंड हे सगळे कॅथलिक ख्रिश्चन देश आहेत. तिथले स्थलांतरितही अर्थातच कॅथलिक होते, पण प्रोटेस्टंट ख्रिश्चन असणाऱ्या इंग्लंडने म्हणजे इंग्लिश स्थलांतरितांनी अमेरिकन राजकारणाची सूत्रे नेहमीच आपल्या हातात ठेवली.

अमेरिकेचा पहिला राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन हा प्रोटेस्टंट होता. सन १७८९ मध्ये तो राष्ट्राध्यक्ष बनला. त्यानंतर थेट १९६१ साली म्हणजे सुमारे पावणेदोनशे वर्षांनंतर एक कॅथलिक माणूस राष्ट्राध्यक्ष बनू शकला. १९६१ साली राष्ट्राध्यक्ष बनलेले जॉन केनेडी हे आयरिश कॅथलिक होते. त्यांच्यानंतर एकदम जो बायडेन म्हणजे २०२१ साली राष्ट्राध्यक्ष झालेले वर्तमान अध्यक्ष हे कॅथलिक आहेत. २००९ ते २०१७ राष्ट्राध्यक्ष असलेले बराक ओबामा हे कृष्णवर्णी मुसलमान आफ्रिकन पिता आणि गौरवर्णी प्रोटेस्टंट ख्रिश्चन माता यांचे अपत्य होते; पण ते स्वत:ला म्हणवतात प्रोटेस्टंटच! अमेरिकन साहित्यिक, लेखक, विचारवंत म्हणत असतात की, आमचे राष्ट्र म्हणजे एक उकळती कढई आहे. विविध देशांचे, विविध वंशांचे, विविध भाषांचे लोक या उकळत्या कढईत एकजीव, एकरस होऊन जातात. हे खरे आहेही आणि नाहीही! एकतर राजकीय क्षेत्रावर इंग्लिश गोऱ्या प्रोटेस्टंटांचे वर्चस्व आजही कायम आहेच. दुसरे म्हणजे विविध वंशांच्या मूळच्या लोकांनी आपापल्या संस्था, संघटना निर्माण केल्या आहेत. त्यांच्या नियमित बैठका होतात. त्यांची नियतकालिके निघतात. ते पहा मिशिगन या विशाल सरोवराच्या काठावर असलेले मिलवॉकी शहर. अलिकडे सर्वच शहरांमध्ये नाना-नानी पार्क, आजी-आजोबा पार्क वगैरे बनवण्याची फॅशन बोकाळली आहे तसेच मिलवॉकीमधले हे एक भले मोठे आजी-आजोबा पार्क. संध्याकाळची वेळ आहे. नेहमीसारखेच अनेक म्हातारे म्हाताऱ्या जॉगिंग करतायत. अड्डे जमवून गप्पा हाणतायत. पण आज काही मध्यमवयीन आणि तरुण माणसेसुद्धा दिसतायत. एक गायक-वादकांचा ताफा पण आलाय! एवढ्यात बगीच्यातून काहीतरी वर हवेत उडालंय! बाप रे!! एक भले मोठे तान्हे बाळ! म्हातारा-म्हातारींच्या बागेतून हवेत भले मोठे तान्हे बाळ हवेत उडाले? आहे तरी काय भानगड? ज्यांना हे दृश्य दिसले अशा अनेकांनी लगेच त्या बागेकडे धाव घेतली. मग सगळ्यांच्याच लक्षात आले की, ते भले मोठे बाळ म्हणजे एक गॅसचा फुगा आहे. त्याचे दोर खाली जमिनीवर घट्ट बांधलेले असल्यामुळे ते बाळ आता आकाशात स्थिर झाले आहे. तो गायक-वादक वृंद आता एक छानसे गीत गात आहे. 'प्रझेकरोज' नावाच्या पोलिश म्हणजे पोलंड देशाच्या भाषेतील एका मासिकाचा हा उद्घाटन किंवा प्रकाशन सोहळा आहे. हे मासिक आता पोलिश भाषेसोबत इंग्रजीतही प्रकाशित होणार आहे. म्हणजे एक नवे बाळ जन्मले आहे, असे सूचित करण्यासाठी बाळाच्या आकाराचा गॅसचा फुगा आकाशात सोडण्याची ही अभिनव कल्पना प्रझेकरोज मासिकाची संपादिका मरिया कोझॅक हिच्या सुपीक डोक्यातून निघालेली आहे. अगोदर सांगितलेल्या अमेरिकन 'मिड वेस्ट'मध्ये पोलिश स्थलांतरितांची लक्षणीय संख्या आहे. आपणा भारतीय लोकांना साधारणपणे शिकागो हे शहर माहिती असते. कारण स्वामी विवेकानंदांनी याच शिकागो शहरातल्या सर्वधर्म परिषदेत हिंदुत्वाचा ध्वज उंच फडकवून सगळे जग दीपवून सोडले होते. तर, या शिकागो शहरातच 'पोलिश अमेरिकन काँग्रेस' अशी पोलिश स्थलांतरितांची प्रभावी संघटना आहे. शिकागोमध्येच 'पोलिश म्युझियम ऑफ अमेरिका' असे संग्रहायलसुद्धा आहे. तिथली संचालिका बिजाट्रिक्स झरकावस्की ही पोलंड देशाचा गेल्या एक हजार वर्षांचा इतिहास तर घडाघडा सांगतेच; पण एका अतिशय उमद्या योद्ध्याच्या तैलचित्रासमोर प्रेक्षकांना उभे करून ती सांगते, ''हा आहे पोलंडचा पराक्रमी सेनापती काऊंट काझीमीर पुलास्की. हा अमेरिकन स्वातंत्र्य युद्धात क्रांतिकारकांच्या बाजूने लढला. अमेरिकेला स्वातंत्र्य मिळावे म्हणून याने बलिदान केले आणि याने योग्य वेळी माघार घेण्याचा निर्णय घेतल्यामुळे जनरल जॉर्ज वॉशिंग्टन याचे प्राण वाचले अन्यथा चाल करून येणाऱ्या इंग्रज सैन्याने वॉशिंग्टनला ठार केले असते किंवा कैद तरी केले असते.'' खरोखरच काझीमीर पुलास्की हा एक फार मोठ्या क्षमतेचा सेनापती होता. त्याच्या काळात पोलंडच्या सभोवार रशिया, प्रशिया आणि ऑस्ट्रिया यांची जबरदस्त साम्राज्ये होती आणि या तिघांनाही पोलंडचे लचके तोडायचे होते. त्यांच्याशी झुंजता-झगडताना पुलास्कीने अनेक रणांगणे गाजवून सोडली; पण दुर्दैवाने त्याच्या स्वकीयांनीच त्याचा घात केल्यामुळे त्या स्वदेशातून परांगदा होऊन फ्रान्सचा राजकीय आश्रय घ्यावा लागला. तिथून त्याला बाहेर काढून अमेरिकेत पाठविण्याची कल्पना अमेरिकन क्रांतिकारक पक्षाचा फ्रेन्च मित्र मार्कस् द लाफायेत आणि अमेरिकन विचारवंत बेंजामिन फ्रँकलीन यांची अमेरिकन स्वातंत्र्य युद्धात इंग्लिश साम्राज्यवादाविरुद्ध लढण्यासाठी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा पुरस्कर्ता असणारा पुलास्की बोस्टनला येऊन पोहोचला. त्याने अमेरिकन क्रांतिकारक सैन्याची पाहणी केली. त्याला असे आढळले की, खुद्द सरसेनापती जॉर्ज वॉशिंग्टनसह सर्वच सेनापती हे पायदळावरच विसंबून आहेत. घोडा हे ते फक्त प्रवासाचे वाहन म्हणून वापरतात. घोडदळाची युद्ध पद्धती, घोडदळाची मारक शक्ती याची त्यांना कल्पनाच नाहीये. पुलास्कीने वॉशिंग्टनसह इतर सेनापतींसमोर आपले म्हणणे मांडले. वॉशिंग्टनने तो म्हणतो तसे घोडदळ संघटित करण्याची जबाबदारी त्याच्यावरच सोपवली. मग पुलास्कीने मोठ्या प्रयत्नांनी पायदळ पथकांमधूनच कुशल घोडेस्वार निवडून काढले. जॉर्ज वॉशिंग्टनच्या लष्करी तळावर फार मोठी इंग्रजी सेना चालून येत आहे, अशी खबर या घोडेस्वार टेहळणी पथकाने आणली. आता लढाईला उभे न राहता माघार घेण्यातच शहाणपणा आहे, असा सल्ला पुलास्कीने वॉशिंग्टनला दिला. त्याने तो मानला आणि त्याचा प्राण वाचला. पराभव टळला. काझीमीर पुलास्कीला अमेरिकन सैनचा ब्रिगेडियर जनरल बनवण्यात आले. ९ ऑक्टोबर १७७९ या दिवशी आजच्या जॉर्जिया राज्यातल्या सवेना शहराजवळ थंडरबोल्टच्या लढाईत काझीमीर पुलास्की जबर जखमी झाला आणि ११ ऑक्टोबरला मरण पावला. आपल्या घोडदळ पथकाचे नेतृत्व करीत इंग्रज सैन्यावर चालून जात असताना एक इंग्रजी तोफगोळ्याने त्याचा अचूक वेध घेतला. स्वत:चा देश स्वतंत्र ठेवू न शकलेला, पण अमेरिकेच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान झालेला काझीमीर पुलास्की हा पोलिश योद्धा अवघा ३४ वर्षांचा होता. अमेरिकन राष्ट्राने पुलास्कीला मानद नागरिकत्व तर दिलेच; शिवाय 'फादर ऑफ अमेरिकन कॅव्हलरी' म्हणूनही गौरविले. अमेरिकाभरात अनेक ठिकाणी त्याच्या नावाचे रस्ते, चौक, संस्था, शाळा, कॉलेजेस, संशोधन संस्था आहेत. दरवर्षी ११ ऑक्टोबरला अमेरिकेत 'जनरल पुलास्की मेमोरियल डे' पाळला जातो. न्यूयॉर्कच्या 'फिफ्थ ॲव्हेन्यू' या फार मोठ्या चौकात अमेरिकन सेना एक शानदार संचलन करून पुलास्कीला मानवंदना देते. हा सगळा वृत्तांत सांगण्याचे तात्पर्य काय की, अमेरिकन राष्ट्राच्या जन्मापासूनच पोलंड देशामधून अमेरिकेत स्थलांतर करणाऱ्या लोकांची संख्या भरपूर होती. दुसऱ्या महायुद्धानंतर पोलंड सोव्हियत रशियाचा मांडलिक देशच बनला. साम्यवादी राज्यकर्त्यांच्या दडपशाहीमुळेही अनेक पोलिश परिवार अमेरिकेत पळून आले. अमेरिकन मिड वेस्ट राज्यांमध्ये, त्यातही शिकागोसारख्या शहरामध्ये सार्वजनिक चौकात, हॉटेलात चारपाच लोक पोलिश भाषेत गप्पा मारताना ऐकू येणे हे सामान्य दृश्य आहे.

अतिशय गरिबीतून वर येऊन हॉलिवूडचा सुपरस्टार बनलेला अभिनेता चार्ल्स ब्रॉन्सन याचे पूर्वज मूळचे पोलिशलिथुएनियन होते. अमेरिकेसह सगळे जगच आपल्या लाल साम्राज्यात आणू पाहणाऱ्या सोव्हियत रशियन साम्राज्याचे पतन पोलंड देशातल्या काही घटनांपासूनच सुरू झाले होते. पोलंडच्या गडान्स्क या मुख्य बंदरात कामगार नेता लेक वालेसा याच्या नेतृत्वाखाली पोलिश गोदी कामगारांनी अभूतपूर्व संप पुकारला होता. स्वत:ला कामगारांचे राज्य म्हणवणाऱ्या शासनाच्या विरोधात त्याच देशातले कामगार बंड करून उठतात. हा हादरा पोलंडचा हुकूमशहा जनरल यारुझेल्स्की, सोव्हियत राष्ट्राध्यक्ष ब्रेझनेव्ह आणि एकंदरीत सोव्हियत तत्त्वज्ञान यांनाच होता. १९८०-८१ साली उभा राहिलेला हा लढा १९९१ साली सोव्हियत रशियातली साम्यवादी राजवट संपवूनच थांबला. हा सगळा घटनाक्रम जरी अमेरिकेपासून दूर युरोप खंडात घडत होता, तरी अमेरिकन मिड वेस्टमधल्या पोलिश भाषिक अमेरिकन स्थलांतरितांना 'प्रझेकरोज' मासिकातून तो वाचायला मिळत होता. १९४५ ते १९९१ या काळात अमेरिका आणि तिची दोस्त राष्ट्रे नि सोव्हियत रशिया आणि त्याची मांडलिक राष्ट्रे यांच्या दरम्यान चालू असलेल्या शीतयुद्धाची बित्तंबातमी पोलिश नागरिकांपर्यंत पोहोचवित राहणे हे महत्त्वाचे कार्य प्रझेकरोज मासिकाने पार पाडले. आता इतक्या मोठ्या कालावधीनंतर म्हणजे २०२४ साली प्रझेकरोजची इंग्रजी आवृत्ती काढावी, असे चालकांना का बरे वाटले असावे? नव्या पिढीचा पोलिश भाषेशी संपर्क कमी होत चालला असावा. मूळचे इंग्रज असणारे लोक अमेरिकेत स्थलांतरित झाले आणि जेमतेम १०० वर्षांतच त्यांनी खुद्द मायभूमी इंग्लंडविरुद्धच युद्ध पुकारले. पहिले आणि दुसरे महायुद्ध झाले नसते तर कदाचित अमेरिका युरोपपासून म्हणजे जगापासून कायमची अलिप्त राहिली असती.

आता जागतिकीकरण आणि व्यापाराच्या बदलत्या संकल्पनांमुळे कुणीच कुणापासून कायम अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे पोलिश स्थलांतरितांची अमेरिकेत जन्मून पक्की अमेरिकन बनलेली नवी पिढी किंवा नव्या पिढ्या कायमच्या पोलंडपासून तुटू शकणार नाहीत, पण भाषेमुळे त्यांच्या मनात मूळ मायभूमीबद्दल दुरावा निर्माण होऊ नये म्हणून कदाचित प्रझेकरोज मासिकाने इंग्रजीत आवृत्ती काढण्याचा निर्णय घेतला असावा. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

# महाराष्ट्रातील भक्ती चळवळ व अध्यात्म विचार

संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे

धर्म व भक्तीचे व्यापकत्व स्पष्ट करताना भक्ती चळवळीच्या उदयामागची पृष्ठभूमी सखोलपणे व्यक्त करणारी आपली अध्यात्म परंपरा आहे. महाराष्ट्रातील भक्ती चळवळ काळाच्या विविध टप्प्यातून कशी प्रवाही झाली, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील विविध भक्ती संप्रदायाचा परिचय व आचारधर्म संतांनी मांडला आहे.

भक्ती चळवळीचे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान, अध्यात्म तत्त्वज्ञान यावर संत साहित्याने अतिशय अचूकपणे भाष्य केले आहे. धर्म व भक्ती या संज्ञांची उकल करताना एक गोष्ट महत्त्वाची वाटते की, धर्माची बाब माणसाच्या उत्पत्तीसोबतच जुळलेली आहे, असा महत्त्वाचा उलगडा संत करतात. धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब असली, तरी तिला नीती व तत्त्वज्ञानाची जोड ही प्रत्येक धर्माने दिलेली आहे. महाराष्ट्राच्या धार्मिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक पृष्ठभूमीचा विचार करताना महाराष्ट्रातील प्रमुख बौद्ध, इस्लाम, हिंदू, ख्रिश्चन, इसाई या धर्मांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. आर्य आणि द्रविड संस्कृती या दोघांचाही विचार महत्त्वाचे मानतात. त्यात भक्ती चळवळीच्या उदयामागची कारणे राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक पृष्ठभूमी याचा संत साहित्याने घेतलेला मागोवा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. भक्ती चळवळ एकूणच ज्या पृष्ठभूमीवर निर्माण झाली; त्यामध्ये विविध पंथांचे आध्यात्मिक व सांस्कृतिक योगदान हा महत्त्वाचा धागा वाटतो. समाजातील वैफल्यग्रस्तता, देवाची, पापकर्माची भीती, भक्तीचे स्थान, अघोरी भक्ती, भूतखेत यांना प्रसन्न करणारी भक्ती या सर्व बाबी संत विचारात घेतात. स्त्रियांना समाजातील दुय्यम स्थान, देवादिकांच्या जीवनातील घटना व प्रसंग या सगळ्या बाबी विचारात घेऊन मूर्तिपूजा, शाक्त, शैव शक्ती संप्रदाय, नरबळी, उत्सव, अंधश्रद्धा, भूतखेत या बाबींचा समाजातील रुजलेला विचार कारणीभूत ठरतो. 'वारकरी संप्रदाय' हा अद्वैत तत्त्वज्ञानावर आधारित असलेला संप्रदाय आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भक्ती संप्रदायांनी जसे नाथ संप्रदाय, दत्त संप्रदाय, महानुभाव पंथ, आनंद संप्रदाय, रामदासी संप्रदाय, चैतन्य संप्रदाय या सर्वांनी आपापल्या कालखंडामध्ये भक्तीचा मार्ग अधिक सुकर केला आहे. भक्ती चळवळीची पताका या प्रत्येकाने आपल्या खांद्यावर घेऊन वेगवेगळे तत्त्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, त्यातील वारकरी संप्रदाय आजतागायत खंबीरपणे उभा आहे. त्यामुळे भक्ती चळवळीतील वारकरी संप्रदायाचे स्थान हे आजही अढळ आहे, असा महत्त्वाचा विचार सर्व अभ्यासक अधोरेखित करतात. महाराष्ट्रातील भक्ती चळवळ ही... **आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा । मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ।। मच्छिंद्राने बोध गोरक्षशी केला । गोरक्ष वोळला गहिनीप्रती ।। गहिणी प्रसादे निवृत्ती दातार । ज्ञानदेवा सार चोजविले ।।** प्रस्तुत उक्तीप्रमाणे आदिनाथांपासून चालत आलेली ही वारकरी संप्रदायाची परंपरा जवळजवळ ७०० वर्षांपूर्वीपासूनचा हा वारकरी चळवळीचा वाहणारा झरा वेगवेगळ्या कालखंडातून वेगवेगळ्या शतकांच्या प्रवासातून फुलत गेलेला आहे. त्यामध्ये सर्वांचे आराध्य दैवत असणारा श्री विठ्ठल व भक्त पुंडलिक या दोन अनुबंधातून निर्माण झालेला आहे. त्यामध्ये नाथ संप्रदायाचे हटयोगी विचारापासून तर महानुभावांचा महानुभावी स्मरण भक्ती विचारापर्यंत सर्वांचा एकत्रित केलेला भक्ती पुष्पगुच्छ म्हणजे वारकरी संप्रदाय होय. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' लिहून या वारकरी संप्रदायाला अद्वैत तत्त्वज्ञान विचाराचा भक्कम आधार दिला. त्यानंतर संत एकनाथ, संत नामदेव, तुकोबा या संतांनी तर या वारकरी परंपरेची पताका अधिक उंच केली.

संत नामदेवांनी ही पताका महाराष्ट्राबाहेर नेऊन पंजाबातसुद्धा फडकविली. महाराष्ट्रामध्ये आजही सर्वांच्या मुखोद्गत ही अभंगवाणी आहे. वारकरी संत परंपरा ही अतिशय शुद्ध, सात्त्विक व स्पष्ट असल्याने या संप्रदायाशी अनेक संप्रदायांनी जुळवून घेतले. महाराष्ट्राच्या या मातीमध्ये संत बहिणाबाई वारकरी परंपरेचा इतिहास परंपरा लिहिताना म्हणतात **ज्ञानदेवे रचिला पाया । उभारले देवालया ।। नामा तयाचा किंकर । जेणे केला हा विस्तार ।। नाथ दिला खांब तोचि मुख्य आधार । तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।** महाराष्ट्रातील भक्ती चळवळीतील वारकरी संप्रदायाने आपले तत्त्वज्ञान निश्चित केले आणि या तत्त्वज्ञानाच्या बळावर अद्वैत सिद्धांत मांडला. या अद्वैत सिद्धांताने आमचा विठ्ठल हा एकच आहे, तो आमच्या अंतरात्म्यामध्ये बसलेला आहे, याची साक्ष प्रत्येक अभंग व प्रत्येक ओवी वारकरी संप्रदायाची समाजाला देत असते. पंढरपूरचे आराध्य दैवत विठ्ठल आणि चंद्रभागा ही या संप्रदायाची भक्ती-मुक्तीची प्रमुख साधने आहेत. जो वारकरी असेल त्याने गळ्यामध्ये तुळशी माळ घालावी, कपाळाला बुक्का लावावा, मुखामध्ये 'राम-कृष्णहरी' हा मंत्र असावा,



असा साधा आचारधर्म वारकरी संप्रदायाने मांडला. अध्यात्माच्या भक्ती चळवळीचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास व जीवन तत्त्वज्ञान हे खूप सात्त्विक सृजनशील आणि प्रत्येकाने अंगीकारावे असे आहे. प्रत्येक व्यक्तीने आपले मूल्यमापन केले तर प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये समाधानाचा व मन:शांतीचा भाव निर्माण होईल, इतकी ताकद त्या भक्ती संप्रदायामध्ये आहे. समाधान ही तर अलौकिक बाब, परंतु तीसुद्धा संतांच्या विचारांच्या अभ्यासामध्ये प्राप्त होते. हा विश्वास संताच्या विचारांचा परामर्श घेताना व्यक्त करावासा वाटतो.

संत विचाराची मांडणी करताना अतिशय प्रांजळपणे कबुली देता येईल की, महाराष्ट्रातील भक्ती चळवळ व वारकरी संप्रदाय हा सामान्य भक्तांचा जीवनाचा मूलाधार आहे. भक्ती विचार हा जीवन विचार आहे आणि सामान्य माणसाच्या जगण्याचा विचार आहे. **सुख पाहता जवापाडे । दु:ख पर्वताएवढे ।।** माणसाच्या जीवनातील दु:खाची वास्तवता आणि सुखाची क्षणभंगुरता ही संत तुकाराम मांडतात. जणू काही ते आपल्याच जगण्याची कथा सांगत आहेत, असे प्रत्येकाला वाटते, असा विचार संतांनी व्यक्त केला आहे.


(पान ६ वर)

# हम किसी से कम नहीं... सफर स्त्री-दिग्दर्शकांची

सिनेजगत

देवेंद्र प्रभुणे

'जिचे हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' अशी एक अर्थवाही म्हण मराठी भाषेत आहे. स्त्रीत्वाची महन्मंगल महतीविदित करणाऱ्या अनेकविध म्हणी व वाक्प्रचार विविध भारतीय भाषांमध्ये विद्यमान आहेत. 'स्त्री ही संस्कृतीची निर्माती, स्त्री ही मानवतेची उद्गाती' असे सार्थ वर्णन केल्या जाते. स्त्रीत्वाची निगडित असलेल्या अतिशय टोकाच्या मान-अभिमानाच्या संकल्पनेमुळे स्त्रीत्वाचे रक्षण हे भारतीय समाज व संस्कृतीत परम महत्त्वाचे कर्तव्य म्हणून गणल्या जाते. आधुनिक सामाजिक स्थित्यंतरात स्त्रिया सार्वजनिक जीवनात पुरुषांच्या बरोबरीने सहभागी होऊ लागल्या व जीवनाचे असे कुठलेही क्षेत्र नाही, ज्यामध्ये स्त्रियांनी आपल्या कार्यकुशलतेचा ठसा उमटवलेला नाही. तरीदेखील, सामाजिक अवधारणा व अविश्वास यांचा परिपाक म्हणून बहुतांश क्षेत्रात स्त्रियांचा सहभागी मर्यादित करण्याचा समाजाचा प्रयत्न असतो. भारतीय चित्रपटसृष्टीदेखील या समज- अपसमजांना अपवाद नाही. चित्रपटसृष्टीची कार्यप्रणाली व अनियमित समज-सारणी स्त्रियांच्या सर्व क्षेत्रातील मुक्त वावरास पायबंद घालणारीच होती व आहे, हे मात्र निश्चित.


फातिमा बेगम


जद्दनबाई


लीला चिटणीस


विजया मेहता

चित्रपटांच्या तांत्रिक बाजू समर्थपणाने सांभाळणाऱ्या स्त्रिया म्हणूनच अतिशय कमी संख्येने दृष्टीस पडतात. चित्रपट हा कला व शास्त्र यांचा मनोहारी संगम..! हिंदी चित्रपटांमधील पहिली दिग्ददर्शका म्हणजे 'फातिमा बेगम.' १८९२ साली जन्मलेल्या फातिमा बेगम यांचे तरुणपण म्हणजे जिवंत दंतकथा! अभिनेत्री, पटकथा, लेखिका, निर्माता व दिग्ददर्शक म्हणून चौफेर कामगिरीने आपला ठसा उमटवणाऱ्या फातिमा बेगम यांनी मूकपटांच्या काळात आपली स्वत:ची निर्मिती संस्था 'फातिमा फिल्म्स' १९२५ साली स्थापन केली होती. १९२६ साली प्रदर्शित झालेला 'बुलबुल-ए-परिस्तान' हा त्यांचा दिग्ददर्शक म्हणून प्रथम चित्रपट! 'भाग्य की देवी', 'हीर-रांझा', 'अद्‌भुत राजकुमार' हे त्यांनी निर्देशित केलेले अन्य चित्रपट. त्यांची सुकन्या 'झुबेदा' भारताच्या पहिला बोलपट 'आलमआरा'ची नायिका होती. त्यांच्या अन्य कन्या सुल्ताना व शहजादी या देखील लोकप्रिय अभिनेत्री होत्या. याच परंपरेतील पुढील महत्त्वाचे नाव म्हणजे जद्दनबाई उर्फ जयादेवी. भारतीय चित्रपटातील पहिली महिला संगीतकार असा बहुमान प्राप्त करणाऱ्या जद्दनबाई उत्तम नर्तिका, अभिनेत्री, चित्रपट निर्मात्या व दिग्दर्शका होत्या. 'मॅडम फॅशन', 'हृदय मंथन', 'मोती का हार', 'जीवन स्वप्न' हे त्यांनी दिग्दर्शित केलेले अचित्रपट. नर्गिस व अन्वर हुसैन यांच्या त्या माता.

'सीते'ची भूमिका करून विख्यात झालेल्या व वास्तविक जीवनात बंडखोर असलेल्या शोभना समर्थ यांनीदेखील 'हमारी बेटी' (१९५०) व 'छबिली' (१९६०) हे लक्षणीय चित्रपट दिग्दर्शित केले. 'हमारीअबेटी' चित्रपटात त्यांच्या दोन्ही सुकन्या नूतन व तनुजा यांनी हिंदी चित्रपटात पदार्पण केले. त्यांची परंपरा मोहनीश बहल, काजोल व तनीषा या नातवंडांनी समर्थपणे पुढे चालवली. हिंदी चित्रपटांच्या बोलपट युगातील एक लोकप्रिय अभिनेत्री व कारकीर्दीच्या उत्तरार्धात सोशिक आईच्या भूमिका विशेषत्वाने केलेल्या लीला चिटणीस यांनीदेखील 'आज की बात' (१९५५) हा चित्रपट दिग्ददर्शित केला होता. अजित व चित्रा यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा सरधोपट चित्रपट अतिसामान्य होता. उत्तम नृत्यांगना व लोकप्रिय अभिनेत्री असलेल्या आणि दादासाहेब फाळके पुरस्कार विजेत्या आशा पारेख यांनीदेखील दिग्दर्शक म्हणून लक्षणीय कार्य केले. अर्थात, त्यांनी दिग्दर्शक म्हणून छोट्या पडद्याची निवड केली. 'श्वेतांबरा' म्हणून विख्यात असलेल्या नजाकतदार सिमी गरेवाल यांचे दिग्दर्शकीय कौशल्य प्रकर्षाने लक्षात आले ते त्यांनी दूरचित्रवाणीसाठी दिग्दर्शित केलेल्या 'लिव्हिंग लिजेंड: राज कपूर', 'भारत के राजीव' या वृत्तचित्रांमुळेच..! त्यांनी 'रूखसत' (१९८८) हा थरारक चित्रपटही दिगदर्शित केला होता.

मराठी रंगभूमीवर आपल्या अतुलनीय दिग्दर्शन कौशल्याची अमिट छाप उमटवणाऱ्या व 'बाई' या प्रचंड आदरसूचक नामाभिधानाने ओळखल्या जाणाऱ्या विजया मेहता यांनी जयवंत दळवी यांच्या 'अंधाराच्या पारंब्या' या कादंबरीवर (याच कादंबरीवर 'बॅरिस्टर' हे मराठी नाटकदेखील आधारित होते) 'रावसाहेब' (१९८५) हा उत्तम हिंदी चित्रपट दिग्दर्शित केला. १९८८ साली पारशी समाजाचे सूक्ष्म व वास्तवदर्शी चित्रण करणारा 'पेस्तनजी' चित्रपट दिग्दर्शित करून आपला सिद्धहस्त दिग्दर्शक हा नावलौकिक कायम राखला. विजयाबाइरनी दूरचित्रवाणीसाठी 'स्मृतिचित्रे', 'शाकुंतल', 'हवेली बुलंद थी' व 'हमीदाबाई की कोठी' अशी सकस दिग्दर्शकीय प्रस्तुती दिली. त्यांनी दिग्दर्शित केलेली 'लाईफलाईन' (१९९१) ही दूरचित्रवाणी मालिका मैलाचा दगड ठरली. पण स्त्री-दिग्दर्शक म्हणताच चित्र-रसिकांच्या दृष्टीसमोर येणारे प्रथम नाव म्हणजे सई परांजपे..!आपल्या वेगळ्या बाजाच्या व संवेदनशील चित्रपटांनी आपल्या दिगदर्शकीय कसबाची ग्वाही देणाऱ्या सई परांजपे यांनी स्त्री-दिग्दर्शक या वर्गवारीस प्रतिष्ठा व महत्त्व मिळवून दिले, हे मात्र निश्चित.

समांतर चित्रपट धारांमध्ये आपल्या पतीच्या खांद्याला खांदा लावून अरुणा राजे यांनी स्त्री जाणिवा व स्वातंत्र्याचा पृथक आविष्कार घडवणाऱ्या 'शक' (१९७६), 'गहराई' (१९८०) व 'रिहाई' (१९८८) या चित्रपटांचे साक्षेपी दिग्दर्शन केले. मानसिक व सामाजिक जाणिवांचे जिवंत चित्रण त्यांनी 'सितम' या चित्रपटात घडवले. स्वतंत्र दिग्दर्शक म्हणून त्यांनी 'भैरवी' (१९९६), 'तुम' (२००४) व 'फायरब्रांड' (२०१९) असे लक्षणीय चित्रपट बनवले. मूलत: अनिवासी भारतीय असलेल्या व वैश्विक परिदृश्यात चित्रपट दिग्दर्शित करणाऱ्या दिग्दर्शक म्हणजे मीरा नायर. 'सलाम बॉम्बे' (१९८८) या पहिल्याच चित्रपटाने त्यांनी खळबळ उडवली. 'मिसीसीपी मसाला' (१९९१), 'कामसूत्र' (१९९६), 'मान्सून वेडिंग' (२००१), 'अमेलिया' (२००९) ही त्यांची अन्य चित्रसंपदा. नृत्यांगना, अभिनेत्री व खासदार म्हणून स्पृहणीय कार्य करणाऱ्या हेमा मालिनी यांनी 'दिल आशना है' आणि 'टेल मी ओ खुदा' हे दोन चित्रपट दिग्दर्शित केले.

आसामच्या जंगलांची व चहाचा मदीर सुगंध पडद्यावर प्रस्तुत करणाऱ्या प्रखर स्त्रीवादी दिग्दर्शक म्हणजे कल्पना लाजमी. 'एक पल' (१९८६), 'रूदाली', 'दरमियाँ' (हा तृतीयपंथी व्यक्तींच्या आयुष्यावरील एक महत्त्वपूर्ण चित्रपट), 'दमन', 'क्यो' व 'चिंगारी' असे स्त्री-मुक्तीवर भाष्य करणारे संवेदनशील चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केले.

(पान ६ वर)

यशासाठी

डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

# अतंर्नाद ते गुरू एक प्रवास

१. जपानमधील शिमीझु शहरात १९५४ साली जगभरातील तत्त्वज्ञांची विश्व तत्त्वज्ञान परिषद सुरू होती. अमेरिकेचे प्रतिनिधी डॉ. कॉम्प्टन यांचा भारतीय प्रतिनिधीला विनाकारण प्रखर विरोध होता. त्यामुळे परिषद सुरू झाल्यावर पश्चिमी देशातील तत्त्वज्ञ, भारतातून आलेल्या ३४ वर्षे वयाच्या भारतीय प्रतिनिधीला बोलूच देत नव्हते. असे तीन दिवस गेलेत. चौथ्या दिवशी मात्र 'अवतार' या विषयावर बोलायला कुणी वक्ताच नसल्यामुळे भारतीय तरुणाला बोलण्याची संधी मिळाली आणि या संधीचा त्या तरुणाने पुरेपूर फायदा घेतला. त्याची वाणी म्हणजे ओघवती गंगाच होती. त्याच्या अतिशय श्रवणीय व मुद्देसूद विवेचनातून आधीच्या तीन दिवसांत झालेल्या सगळ्या भाषणातील अपूर्णता अगदी सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट झाली. जसे ज्ञानदेव महाराजांनी रेड्याच्या मुखातून वेद बोलवल्यानंतर सर्व विरोधक ज्ञानदेवांना शरण आले होते; अगदी तसेच त्या परिषदेतील प्रखर विरोधक डॉ. कॉम्प्टनपासून सगळेच जगातील तत्त्वज्ञ त्या



**सद्गुरू पांडुरंगशास्त्री आठवले** (जन्म १९ ऑक्टोबर १९२० - मृत्यू २५ ऑक्टोबर २००३)

तरुणाचे भक्त झाले. परिषदेत त्यांनी भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान मांडले. कोण होता हा तरुण? तो भारतातून जपानच्या त्या परिषदेत कसा काय पोहोचला? काही महिन्याआधी मुंबईमध्ये एका कार्यक्रमात या तरुणाची पॅरिसहून आलेल्या डॉ. डीन यांच्याशी भेट झाली. त्यांच्या मनात भारतीय तत्त्वज्ञानाबद्दल बरेच प्रश्न होते. या तरुणाने अतिशय शांतपणे व अगदी मुद्देसूद पद्धतीने सगळ्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांचे पूर्ण समाधान केले. म्हणून त्या डॉ. डीन यांनी पॅरिसला परतल्यावर तेथूनच जागतिक परिषदेसाठी या तरुणाची म्हणजेच पांडुरंगशास्त्री आठवले यांची जोरात शिफारस केली.


पांडुरंगशास्त्री आठवले यांनी तो विश्वास सार्थ ठरवला. जपानमधील परिषदेत सगळ्या देशातील तत्त्वज्ञांनी एक गोष्ट एकमुखाने मान्य केली... ती म्हणजे, आपल्या धर्माचा व तत्त्वज्ञानाचा स्वत:चा जितका अभ्यास आहे त्यापेक्षा जास्त पांडुरंगशास्त्र्यांचा प्रत्येक देशाच्या संस्कृती, धर्म आणि साहित्याचा आहे. त्या त्या देशातील अगदी समर्पक उदाहरणे देऊन त्यांनी भगवद्गीता किती सर्वसमावेशक व श्रेष्ठ आहे ते पटवून दिले. त्यांच्या अफाट बुद्धिमत्ता आणि ज्ञानावर लुब्ध होऊन आधीचे प्रखर विरोधक डॉ. कॉम्प्टन यांनी शास्त्रीबुवांना त्यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी अमेरिकेत 'स्टेट गेस्ट' म्हणून आदराने आमंत्रित केले. 'स्टेट गेस्ट' या नेमणुकीत अमेरिकेत पाच वर्षे बंगला, मोटारगाडीसह आलिशान वास्तव्य, एक लाख रुपये वर्षासन, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांशी हवी तेव्हा अग्रक्रमाने भेट इत्यादी आकर्षक गोष्टींचा समावेश होता. परंतु देशभक्त पांडुरंगशास्त्रीजींनी देशकार्याला प्राधान्य देऊन अमेरिकेच्या आमंत्रणाचा स्वीकार केला नाही. पुढील आयुष्यातही निरनिराळ्या देशांनी व भारत सरकारने देऊ केलेल्या अनेक सोयी-सवलती त्यांच्यातील आध्यात्मिक अधिष्ठानामुळे दृढतेने नाकारल्या. इंग्लंडच्या स्टेला शेफर्ड या महिलेने मृत्युपश्चात, आपल्या कोट्यवधी पौंडाच्या संपत्तीचा विनियोग पांडुरंगशास्त्री यांच्यावर सोपविला. पण शास्त्रीजींनी ती सर्व रक्कम ख्रिश्चन धर्मीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी संबंधितांच्या हवाली केली. त्यांनी कधीही कोणाकडे मदतीसाठी हात पसरला नाही. आपल्या सर्व गोष्टींचे कर्तृत्व त्यांच्या आराध्य दैवतावर म्हणजे भगवान श्रीकृष्णावर सोपवून ते निश्चिंत राहत. त्यांना कुठल्याही गोष्टीची कमी पडली नाही.

**ज्ञान साधना:** पांडुरंगशास्त्र्यांचा जन्म २० ऑक्टोबर १९२० साली कोकणातील रोहा नावाच्या गावात झाला. त्यांचे बालपण रोह्याला आजी-आजोबांसोबत गेले. आजोबांनी पांडुरंगला गुरुकुल पद्धतीने वैदिक शिक्षण दिले. पुढे रोहा व मुंबई येथे इंग्रजी विषयाचेही शिक्षण झाले. त्यांचे वडीलच पाठशाळा चालवीत. पुढे वडील सारखे आजारी असल्यामुळे पाठशाळेची संपूर्ण जबाबदारी वयाच्या २२ व्या वर्षी पांडुरंगने पेलली तसेच प्रवचन करणे सुरू केले. आता लोक त्यांना अत्यंत आदराने व सन्मानाने 'पांडुरंगशास्त्री' म्हणून ओळखू लागलेत.

मुंबईत असताना त्यांनी रॉयल एशियाटिक सोसायटी लायब्ररीचे सदस्यत्व मिळविले. तेथे रोज सायंकाळी ते रात्री वाचनालय बंद होतपर्यंत व सुटीच्या दिवशी सकाळपासून तर रात्री बंद होतपर्यंत त्यांनी अगदी शिस्तबद्ध व अखंडपणे पूर्ण १४ वर्षे प्रखर ज्ञानसाधना केली. कुठल्याही कारणाने एकही दिवस त्यात खंड पडू दिला नाही. या काळात त्यांनी सर्व वेद, शास्त्रे, पुराणे, उपनिषदे, संपूर्ण जगाचे ऐतिहासिक वाङ्मय व प्रमुख साहित्य, शंकराचार्यांपासून तर ज्ञानोबा तुकोबांपर्यंत सर्व ग्रंथ, ख्रिश्चन, मुस्लिम, जैनांचे धर्म ग्रंथ तसेच अगदी ॲरिस्टॉटल, सॉक्रेटिस, कार्ल मार्क्स, लेनिन, पायथॉगोरस, बुद्ध, शेक्सपिअरपासून तर सिग्मंड फ्रॉईडपर्यंत सर्व प्रसिद्ध तत्त्ववेत्त्यांच्या साहित्याचा, संशोधनाचा, शास्त्रांचा व साहित्याचा अगदी व्यवस्थित व सखोल अभ्यास केला. या सोबतच इस्रायल व रशियातील शेती तंत्रज्ञानाचाही सूक्ष्म अभ्यास केला. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर १० हजार वर्षांत ४० संस्कृती आल्या आणि गेल्या; पण भारतातील वैदिक संस्कृती अजूनही व्यवस्थित टिकून आहे. त्याचप्रमाणे जगातील सर्व तत्त्वज्ञान जर २५ टक्के असेल तर भारतीय तत्त्वज्ञान १०० टक्के आहे असे आढळते. हीच गोष्ट त्यांनी त्या जागतिक तत्त्वज्ञानाच्या परिषदेत सप्रमाण पटवून दिली.

पांडुरंगशास्त्री एकपाठी होते. त्यांची स्मरणशक्ती म्हणजे 'फोटोग्राफिक मेमरी' होती. शास्त्रीबुवा नियमित सूर्यनमस्कार घालत व सात्त्विक आहार घेत. १९४४ साली त्यांचा विवाह निर्मलाताईंशी झाला. या दाम्पत्याला जयश्री नावाची कन्या आहे. ती आजही त्यांचे कार्य पुढे चालवते आहे. स्वाध्याय परिवारद्वारे समाज प्रबोधन-परिवर्तन : जपानहून परत आल्यावर १९७८ मध्ये त्यांनी श्रीमद्भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानांवर आधारित 'स्वाध्याय परिवार'ची स्थापना केली. त्यातील स्वाध्यायी म्हणजे सदस्य हा कोणत्याही जाती-धर्मस्तरातला, पण परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा असलेला, प्रामाणिक, निर्व्यसनी, कुणाचीही फुकट मदत न घेणारा, कुणापुढेही हात न पसरणारा, स्वखर्चाने काम करणारा स्वयंसेवक असे. शास्त्रीजींच्या मार्गदर्शनानुसार ज्या गावात कार्यक्रम असे तेथील तांदळाचा दाणा व काडीपेटीतील काडीसुद्धा कुणी गावाकडून घेत नसत. कुठेही दाता-याचक अशी भावना निर्माण होऊ देत नसत. सुरुवातीला हा वेडेपणा वाटला तरी पुढे त्याचा एवढा प्रचंड प्रभाव पडला की, शास्त्रीबुवा आणि त्यांचे स्वयंसेवक यांच्या अथक मेहनतीमुळे गावेच्या गावे निर्व्यसनी व स्वयंपूर्ण बनली. अशिक्षित लोक शिक्षणाकडे वळले. जाती-धर्माचा बाऊ न करता त्रिकाळ संध्याप्रार्थना, श्रीसूक्त, नारायणोपनिशादांचे पाठ करू लागले. हुंडा, पशुहत्या, बालविवाह आणि अनेक अनिष्ट प्रथा बंद झाल्या. चोर, गुन्हेगार, अट्टल दरोडेखोर हे स्वत:हून कायद्यानुसार शिक्षा भोगून पूर्णवेळ स्वाध्यायी बनले. पुढे ही चळवळ एवढी फोफावली की, एक लाखांपेक्षाही जास्त गाव-खेडी स्वाध्यायी झाली. भारतात दोन लाखांच्यावर स्वाध्याय केंद्रे तयार झालीत. प्रत्येक केंद्रात कमीत कमी २०० स्वाध्यायी असत. सर्व जगात त्याच्या शाखा निघाल्या. केवळ अमेरिकेतच ५० च्यावर शाखा निघाल्या. पडीक जागेत १९ वृक्ष मंदिर प्रकल्प राबवून लाखो झाडे लावलीत. समुद्र किनाऱ्यावरील कोळी, आगरी, तांडेल मंडळींना व्यसने व अंधश्रद्धेच्या जाळ्यातून मुक्त करून समृद्ध करणाऱ्या १०० च्यावर 'मत्स्यगंधा योजना' राबवल्या. अशा वेगवेगळ्या शेकडो योजनांतून लाखो कुटुंबांना फायदा झाला. संपूर्ण कार्याला वैधानिक रूप देण्यासाठी पांडुरंगशास्त्र्यांनी १९५६ साली मुंबईतील घोडबंदर येथे तत्त्वज्ञान विद्यापीठाची स्थापना केली. मूळ वैदिक धर्माचे तत्त्वज्ञान हा या चळवळीचा पाया आहे. गेल्या काही वर्षांत आठवलेंच्या अनुयायांनी जात, सामाजिक, आर्थिक अडथळे आणि धार्मिक भेद भगवद्गीतेच्या 'अंतर्मनातील देव' व 'देवाचे वैश्विक प्रेम' या संकल्पना लाखो लोकांपर्यंत पोहोचवल्या. आठवले यांनी वैयक्तिकरीत्या पायी किंवा सायकलने हजारो गावांना भेट दिली आणि त्यांचे बंधू आणि भगिनी (स्वाध्यायी) वैयक्तिकरीत्या प्रत्येक घरात गेले. प्रत्येक कुटुंबाशी नि:स्वार्थ संबंध प्रस्थापित केले. घरोघरी जाऊन गीतेच्या विचारांचा प्रसार केला. अनुयायांनी संपूर्ण भारतातील अंदाजे एक लाख खेड्यांमध्ये आणि जगभरातील किमान ३४ देशांमध्ये प्रसार केला आहे. आठवलेंनी देवकेंद्रित भक्तीद्वारे सामाजिक कार्य करण्यासाठी विविध प्रयोग सुरू केले; ज्यात सामूहिक, दैवी श्रम (भक्ती) च्या भावनेने सहकारी शेती, मासेमारी आणि वृक्ष लागवड प्रकल्पांचा समावेश आहे. शासनाची मदत न घेता २१ मार्च १९८६ ला प्रयाग येथे 'तीर्थराज मिलन' हे संमेलन घेतले. त्यात जगातील ५ लाख लोकांनी भाग घेतला. परिचयपत्राशिवाय कुणालाही प्रवेश मिळणार नाही इतकी भक्कम सुरक्षा यंत्रणा होती. भगवद्गीतेच्या मार्गदर्शनानुसार एक जागतिक कुटुंब तयार करून जगाच्या समस्यांचे निर्मूलन करण्याची आठवले यांची दृष्टी पूर्ण करण्याचे स्वाध्यायांचे ध्येय आहे. त्यामुळे त्यांचे विचार शेवटच्या माणसापर्यंत पोहोचले पाहिजेत.

आज लाखो अनुयायी कॅरिबियन, अमेरिका, आशिया, युरोप, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड, मध्य पूर्व आणि आफ्रिका यासह ३५ पेक्षा जास्त देशांमध्ये प्रत्येक राहण्यायोग्य खंडात आढळू शकतात. आठवले शास्त्री यांचे देवाच्या दैवी पितृत्वाखाली वैश्विक बंधुत्व हे स्वप्न पूर्ण करणे हे स्वाध्याय परिवाराचे ध्येय आहे. पांडुरंगशास्त्री यांना मिळालेले पुरस्कार १) पद्मविभूषण २) टेम्पलटन पारितोषिक ३) रॅमन मॅगसेसे पुरस्कार ४) व्हिजन ऑफ गॉड ५) लोकमान्य टिळक पुरस्कार ६) राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार ७) महात्मा गांधी पुरस्कार पांडुरंग शास्त्रीजींच्या प्रवचनावर आधारित वैदिक स्तोत्रे, गीता आणि रामायण यावर आधारित अनेक पुस्तके आहेत. वाल्मीकि रामायण, गीता अमृतम्, संतांना श्रद्धांजली, प्रार्थना प्रीती, तुलसीदल, संस्कृती पूजन (संस्कृती आणि धर्माच्या योग्य व्याख्यांचे वर्णन), विजिगीषु जीवनवाद आणि अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. १९८४ साली बहारीन या मुस्लिम देशात त्यांना गीता प्रवचनाची परवानगी नाकारली म्हणून शेखसाहेबांना भेटले. १५ मिनिटांची ठरलेली भेट दीड तास रंगली. शास्त्रीबुवांचे गीतेइतकेच कुराणावरील प्रभुत्व पाहून शेख चकित झाला. परवानगी तर मिळालीच; शिवाय आजूबाजूच्या मशिदीतील नमाजाची वेळ फक्त ३ मिनिटात संपवून मुस्लिमांनी प्रवचनासाठी सहकार्य केले. शेखने शास्त्रीबुवांना 'स्टेट अवॉर्ड' देऊन सन्मानित केले. १९९१ साली श्याम बेनेगल यांनी शास्त्रीबुवांवर 'अंतर्नाद' (युट्युबवर उपलब्ध आहे) हा प्रभावी चित्रपट काढला. २००४ साली शास्त्रींच्या निर्वाणानंतर त्यांच्या कार्यावर 'स्वाध्याय' ही डॉक्युमेंटरी अबीर बजाझ यांनी बनवली. शास्त्रीजींमुळे पडीक जमिनी, आटलेल्या विहिरी, खेडी, कोळीवाडे, अस्पृश्य वस्त्यांची समृद्ध वस्त्यांमध्ये परिवर्तने झालीत. शास्त्रीजींनी त्यांचा देव गरीब, अशिक्षित लोकांमध्ये शोधला. अशा या कर्मयोगी, ज्ञानयोगी गुरूंची प्राणज्योत ८३ व्या वर्षी शांत झाली. पांडुरंगशास्त्री आठवले यांचे जीवन आपण सर्वांसाठी समुद्रातील योग्य दिशा दाखवणाऱ्या एक दीपगृहासारखेच आहे. त्यांनी स्वत:चे व जगाचे निरीक्षण करून मनातील 'अंतर्नाद' ऐकला व 'स्वाध्याय' सिद्ध करून श्रेष्ठ गुरू झाले. आज आपल्याला अशाच गुरूंची गरज आहे. आपल्यास योग्य सद्गुरू व त्यांची कृपा लाभो! सर्वांना श्रीगुरुपौर्णिमेच्या खूप खूप शुभेच्छा! (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## चंद्रभागा नेत्री । वाहू लागे ।।

करावा विचार । विवेक बुध्दीने ।।
विकारी मनाने । घात होई ।।१।।

अंतरीचा भाव । शुद्ध तो असावा ।।
तेथेची विसावा । देव घेतो ।।२।।

कर्माचिया ठायी । पापपुण्य गाठी ।।
तो हा जगजेठी । पाहतसे ।।३।।

देखिता चरण । उजळल्या रात्री ।।
चंद्रभागा नेत्री । वाहू लागे ।।४।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## सद्गुरू

गुरु कुलाश्रम पूर्वाश्रमीचा सुंदर अनुभव असे निराळा
आजही गुरु महिमा सांगतो श्री गुरुनिष्ठेची तीच परंपरा
वंदन करीता त्या मनोभावे मनी पुण्य संचय गवसतो
रात्रंदिन श्री गुरूला स्मरता मग हा ताप भवाचा हरतो
गुरु सहवासे मन मोहरते मग गुरु सेवेने मन बहरते
प्रसन्न होता श्री सद्गुरु गुरुकृपेचे कवच लाभते
ज्ञानसागर अथांग सुंदर नीट शोधून मोती काढावे
ज्ञानप्राप्ती पदरी मिळण्या सतत गुरुचरणी लीन व्हावे
आयुष्याचा प्रवास खडतर पदोपदी अवघड डोंगर
अंधारातून प्रकाश दावत गुरु करीती मार्ग सुकर
शिष्य सुदामा असे याचक पण शब्द निघेना मुखातूनि
या श्रीकृष्णाच्या गुरुज्ञानाने सुदामा नगरी केली सुवर्णी
कृतार्थ करूनी हे जीवन नित्य पूजा करू दिन रात
सौ'यशांतीचा मिळे आनंद श्री सद्गुरूच्या पूजनात

साधना शेंडे



## गुरुवंदना

गुरू चरणी माथा टेकून, मिळाले अनंत दिव्य ज्ञान.
जगण्याचे आले मज भान सत्कारणी लागले जीवन।।१।।
गुरूने चालविले सानंदे, मन पोहचले ब्रह्मानंदे.
पाहुनिया सुंदर रूपाते मन व्याकूळ गदगदे।।२।।
गुरूने शमविले चित्त. पद वंदूनी झाले शांत.
संपली ही जीवनाची भ्रांत तन्मयता पूर्ण ठाके दत्त।।३।।
गुरूने उपचारिले मन, साकारून आले कारुण्य.
सार्थकी लागेल जीवन धन्यता होई ब्रह्मलीन।।४।।

रेखा भिवगडे

# उलाढाल वाढणार, चांदी वधारणार...



**सरत्या आठवड्यामध्ये रोजगार, उद्योग आणि चांदीच्या दराबाबत काही लक्षवेधी बातम्या समोर आल्या. आखाती युद्धामुळे राजस्थानमध्ये तीन लाख युवक बेरोजगार झाले असल्याची पहिली बातमी कोड्यात पाडणारी ठरली. दरम्यान, अन्नसेवा उद्योगात भारताची ७.७६ लाख कोटींची उलाढाल झाल्याचे आकडेवारीमुळे स्पष्ट झाले. याच सुमारास भारत परदेशात कच्च्या तेलाचा साठा करणार असल्याची बातमी पुढे आली.**

अर्थोद्योग

महेश देशपांडे

सरत्या आठवड्यामध्ये रोजगार, उद्योग आणि चांदीच्या दराबाबत काही लक्षवेधी बातम्या समोर आल्या. आखाती युद्धामुळे राजस्थानमध्ये तीन लाख युवक बेरोजगार झाले असल्याची पहिली बातमी कोड्यात पाडणारी ठरली. दरम्यान, अन्नसेवा उद्योगात भारताची ७.७६ लाख कोटींची उलाढाल झाल्याचे आकडेवारीमुळे स्पष्ट झाले. याच सुमारास भारत परदेशात कच्च्या तेलाचा साठा करणार असल्याची बातमी पुढे आली. आणखी एक खास वृत्त म्हणजे चांदी प्रती किलो सव्वा लाख रुपयांवर जाणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली.

गेल्या दोन महिन्यांमध्ये राजस्थानमध्ये ८०० हून अधिक कारखाने बंद झाले असून सुमारे तीन लाख लोक बेरोजगार झाले आहेत. जोधपूर जिल्हा तर सर्वाधिक प्रभावित झाला आहे. येथील हस्तकला, कापड, मसाले आणि गवार गम यांसारख्या उद्योगांचे दरवर्षी दोन हजार कोटी रुपयांहून अधिक नुकसान होत आहे. हुथी बंडखोरांच्या सततच्या हल्ल्यांमुळे शिपिंग कंपन्यांनी राजस्थानमधून परदेशात माल पाठविण्याचे भाडे अनेक पटींनी वाढविले आहे. त्यामुळे शेकडो कोटींच्या ऑर्डर्स रद्द करण्यात आल्या आहेत. राजस्थानच्या जोधपूर आणि जयपूरसारख्या शहरांमध्ये तयार होणाऱ्या फर्निचरला परदेशात मोठी मागणी असते. हा व्यवसाय आता ४० टक्क्यांनी घटला आहे. राजस्थानमध्ये जोधपूर, जयपूर, रतनगड आणि सरदारशहर येथून हस्तकलेच्या सर्वाधिक वस्तूंची निर्यात केली जाते. येथे बनवलेले लाकडी-लोखंडी फर्निचर, लहान संगमरवरी वस्तू, हाडांच्या कामाच्या वस्तू, पेंटिंग्ज, सजावटीच्या वस्तू, चामड्याचे फर्निचर, पिशव्या, उशा आणि कपड्यांपासून बनवलेल्या इतर वस्तूंची निर्यात केली जाते. त्याची वार्षिक उलाढाल सहा हजार कोटी रुपयांच्या आसपास आहे. अनेक नामांकित परदेशी कंपन्या येथे दोन महिने अगोदर ऑर्डर देतात. माल तयार झाल्यानंतर बंदरात जातो. नंतर तो शिपिंग लाईनद्वारे परदेशात पोहोचतो. गेल्या दोन महिन्यांमध्ये हा व्यवसाय ४० टक्क्यांनी घसरला आहे. फक्त ४००० कोटी रुपयांचा व्यवसाय शिल्लक आहे.

जयपूर येथील हस्तकला निर्यातदार आणि 'इंडियन एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल ऑफ हॅन्डीक्रॉफ्ट'चे अध्यक्ष दिलीप वैद्य यांनी सांगितले की, राजस्थानमधील दोन हजार निर्यातदार नोंदणीकृत आहेत. हस्तशिल्पांमध्ये राजस्थान सर्वात जास्त फर्निचरची निर्यात करतो. हुथी बंडखोरांमुळे सध्या ही समस्या निर्माण झाली आहे. येमेनचे बंडखोर किंवा हुथी सुएझ कालव्यातील मालवाहू जहाजांवर सतत हल्ले करत आहेत. हे बंडखोर जहाजांचे अपहरणही करत आहेत. यामुळे मालवाहू जहाजांना मार्ग बदलावा लागत आहे. परिणामी, राजस्थानपासून फ्रान्स- इटली- इंग्लंडसारख्या शहरांचे सागरी अंतर दुप्पट झाले आहे. पूर्वी कंटेनर पाठविण्यासाठी ५०० डॉलर लागत होते; आता त्याचे भाडे चार हजार डॉलरवर पोहोचले आहे. त्यामुळे राजस्थानमधील ८०० उद्योग बंद पडले आहेत.




दरम्यान, भारतात रेस्टॉरंट उद्योगातील उलाढाल ७.७६ लाख कोटी रुपयांची होईल, असे सांगणारा एक अहवाल समोर आला. भारतीय अन्न सेवा उद्योगातील सध्याची उलाढाल ५.७ लाख कोटी रुपये असेल, असा अंदाज आहे. २०२८ पर्यंत ती ७.७६ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढेल. माहितीनुसार भारतात अन्न सेवा उद्योग ८५.५ लाख लोकांना रोजगार देतो. दिल्लीचे लोक डम्पलिंग, टॅको या पदार्थांना तसेच दक्षिण भारतीय पदार्थांपेक्षा समोसे, कचोरी, पकोडे, छोले भटुरे आणि कबाब यांना अधिक पसंती देतात. गुरुग्राममध्ये ५३ टक्के लोक चायनीज पदार्थ खातात. 'नॅशनल रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडिया'च्या इंडिया फूड सर्व्हिस रिपोर्ट, २०२४ मध्ये ही माहिती समोर आली आहे. त्यानुसार दिल्लीतील ३२ टक्के लोकांनी कबूल केले आहे की, कोविडपूर्वीच्या काळाच्या तुलनेत त्यांची बाहेर खाण्याची सवय वाढली आहे. देशातील २१ शहरांमधील ५,२०० रेस्टॉरंटमध्ये सर्वेक्षण करण्यात आले. या डेटासाठी 'एनआरएआय'ने देशातील २१ शहरांमधील ५,२०० रेस्टॉरंटमध्ये सर्वेक्षण केले आहे. यासोबतच रेस्टॉरंट चेनच्या १२० 'सीईओं'कडून त्यांच्या सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या आणि सर्वाधिक लोकप्रिय खाद्यपदार्थांची माहितीही घेण्यात आली. दिल्लीतील ३० टक्के लोक चांगले जेवण घेण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये जातात. अहवालानुसार, दिल्लीत राहणारे ३० टक्के लोक उत्तम जेवण, २० टक्के लोक फास्ट फूड रेस्टॉरंट्स, १३ टक्के लोक कॅज्युअल जेवण, ११ टक्के लोक फूड कोर्ट आणि ९ टक्के लोक मिठाई, आईस्क्रीम आणि बेक्ड वस्तूंना प्राधान्य देतात. भारतातील अन्न सेवा उद्योग वेगाने वाढत आहे. हे क्षेत्र ८५.५ लाख लोकांना थेट रोजगार देत असून भारतीय तिजोरीमध्ये ३३,८०९ कोटी रुपयांचे योगदान देते. आता एक खास बातमी. भारत आपल्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कच्च्या तेलाच्या आयातीवर अवलंबून आहे. इतर देशांबरोबर हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी तेलाचा साठा वाढविण्याचा प्रयत्न भारत करीत आहे.

सध्या भारत सरकार देशाबाहेर कच्च्या तेलाचा साठा करणार असल्याची माहिती मिळाली आहे. भारत चार देशांमध्ये तेलाचे साठे तयार करणार आहे. जपान, दक्षिण कोरिया, सिंगापूर आणि संयुक्त अरब अमिराती या देशांमध्ये तेलाचे साठे तयार करण्याचा भारताचा विचार आहे; मात्र याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. अंतिम निर्णय घेण्यापूर्वी देशाच्या हिताच्या अनुषंगाने संबंधित स्थान किती व्यावहारिक आहे. या घटकाचा विचार केला जाईल. 'स्ट्रॅटेजिक स्टोरेज'साठी जागा निवडताना गोदामाचे भाडे वाहतुकीच्या खर्चापेक्षा जास्त होणार नाही, याची पूर्ण काळजी घेतली जाईल. २०२० मध्ये भारत आणि अमेरिकेने स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्हसंदर्भात एक करार केला होता. या करारात अमेरिकेत भारतीय तेल साठवण्याच्या शक्यतांचाही विचार करण्यात आला होता. दरम्यान, आणिबाणीच्या स्थितीत कोणतीही अडचण निर्माण होऊ नये म्हणून भारताने सावध पवित्रा घेतला आहे. त्यामुळे भारत परदेशात कच्च्या तेलाचे साठे तयार करण्याचा प्रयत्न करीत आहे. दरम्यान, येत्या काही दिवसांत चांदीची चमक आणखी वाढू शकते. लवकरच चांदीची किंमत १ ते १.२५ लाख रुपये प्रती किलोपर्यंत जाऊ शकते. 'मोतीलाल ओसवाल फायनान्शियल सर्व्हिसेस'ने आपल्या अहवालात चांदीच्या किमतींबाबत मोठा अंदाज व्यक्त केला आहे. 'ब्रोकरेज हाऊस'ने आपल्या अहवालात गुंतवणूकदारांना किमती घसरल्यास चांदी खरेदी करण्याचा सल्ला दिला आहे. 'मोतीलाल ओसवाल फायनान्शिअल सर्व्हिसेस'ने चांदीबाबतचा त्रैमासिक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात गुंतवणूकदारांना घट झाल्यावर चांदी खरेदी करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. या 'ब्रोकरेज हाऊस'ने चांदीच्या किमतींबाबत आपल्या जुन्या लक्ष्य किमतीत सुधारणा केली आहे. मोतीलाल ओसवाल यांनी चांदीची जुनी लक्ष्य किंमत एक लाख रुपयांवरून सव्वा लाख रुपये प्रती किलो केली आहे.



अहवालात 'ब्रोकरेज हाऊस'ने म्हटले आहे की, हे लक्ष्य १२ ते १५ महिन्यांत गाठले जाऊ शकते. अलिकडच्या काही महिन्यांमध्ये चांदीच्या किमतीत ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे काही अंतराने नफा बुकिंग दिसू शकते. चांदीची कोणतीही घसरण ही खरेदीची संधी म्हणून वापरली पाहिजे. चांदी स्लो मूव्हरच्या टॅगमधून बाहेर आली आहे आणि यावर्षी किमतीत मोठी वाढ झाली आहे. व्याजदर कमी करण्याच्या 'फेड'च्या निर्णयाची गुंतवणूकदार वाट पाहत आहेत. अमेरिकेतील कमजोर आर्थिक डेटामधून धातूंना पाठिंबा मिळत आहे. चांदीची देशांतर्गत आयात वाढली असून २०२४ मध्ये चार हजार टनांपर्यंत पोहोचली आहे. चीनमधील वेगवान आर्थिक वाढीमुळे, औद्योगिक धातूंच्या मागणीत वाढ झाल्यामुळे चांदीच्या किमती वाढू शकतात. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)



आशा बगे ह्या मराठी साहित्यातील महत्त्वाच्या लेखिका असून त्यांचा जन्म २८ जुलै, १९३९ रोजी झाला. कथाकार आणि कादंबरीकार म्हणून त्या प्रसिद्ध असून त्यांच्या २००४ मध्ये प्रकाशित झालेल्या भूमी या कादंबरीला २००६ चा साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला. वडिलांच्या मृत्यूनंतर आईच्या संस्कारात वाढलेल्या मैथिली या नायिकेच्या जीवनातील विविध वळणामधून भूमी ही कादंबरी पुढे सरकत जाते. वैदर्भीय भाषेमधून विविध पातळ्यांवर मानवी भावपूर्ण आणि स्त्री जीवनाचे स्पंदन या कादंबरीत आशा बगे यांनी रेखाटली आहेत.

# भूमीमधील स्त्री जीवनावरील शैक्षणिक पडसाद

साहित्य शिक्षण

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

भूमी या कादंबरीतील शैक्षणिक संदर्भांचा विचार करत असताना कादंबरीच्या सुरुवातीला मॅथ्यूज या मैथिलीच्या शिक्षकाचे तिच्या आईसोबतचे संबंध शिक्षकी पेशाला साजेसे आहेत असे वाटतच नाही. मैथिलीच्या वडिलांचे मित्र डॉ. चित्तरंजन हे मैत्रिणीला संस्कृत शिकून घ्यायला सांगतात. तसेच तिचे वडील संस्कृतमध्ये खूप जास्त गुणांनी उत्तीर्ण झाले होते असे सुद्धा सांगतात. यावर लहान मैथिली मला कोण संस्कृत शिकवणार? असा प्रश्न उपस्थित करते, त्यावेळी वडिलांच्या पश्चात समाजात त्यानंतरच्या पिढीला संस्कार आणि शिक्षण दोन्हीच्या बाबत अडचणी निर्माण होतात दोन्ही स्तरावर अडचणी निर्माण होतात हे लेखिका दाखवून देतात.

मैथिलीला काही औपचारिक शिक्षण तिची अम्मा देते. असे एक-दोन प्रसंगातून दिसते. उन्हाळी सुटल्यानंतर तिच्या शाळेतील मित्र पुट्टू मद्रासच्या मोठ्या शाळेत जातो. हे सांगत असताना वडिलांच्या नोकरीमुळे मुलांची शिक्षणाची ठिकाणे बदलत जातात आणि शालेय मित्रांसोबत त्यांच्या जोडलेल्या भावभावना सुद्धा त्यांना विसरून पुढे चालावे लागते. हे सुद्धा लक्षात घ्यावे लागते. मुलान नावाच्या मुलीने मुलाचा वेश घेऊन युद्धाचे रीतसर शिक्षण घेणे, युद्ध करणे ते जिंकणे. मात्र, ती मुलगी असल्याने लोकांनी तिचा विजय न स्वीकारणे. या एका छोट्या संदर्भ कथेतून स्त्रियांच्या जीवनात किती संघर्ष आहे. त्यांचे शिक्षण, किंवा युद्ध शिक्षण याबाबत समाजात कशी अनास्था आहे हे सुद्धा आशा बगे यांनी अप्रत्यक्षपणे उलगडून सांगितले आहे.

सरस्वतीची प्रार्थना म्हणजे बुद्धीच्या देवतेची प्रार्थना त्यातही बुद्धीचे भाषांतर होत नाही असे संस्कार मैथिलीची आत्या तिच्यावर करते. आत्या तिला शालेय सहलीसाठी जाण्यासाठी परवानगी देते. पैसे देते, त्या शाळेतील गॅदरिंगमध्ये ती भाग घेते. भाषेचे माध्यम बदलल्यामुळे इंग्रजी सोबत इतर सर्व विषयात ती नापासही होते. त्यावर पहिलं वर्ष कृष्णार्पण म्हणूनच तिच्या मानसिकतेला समजून घेणारी आणि पालक म्हणून उभे राहणारी आत्या आशा बगे यांनी फार स्वाभाविकपणे उभी केली आहे. दहावीत नापास झाल्यावर आपल्या हुशार भावाची मुलगी आपल्यासारख गृहिणीचा आयुष्य न जगता काहीतरी नावलौकिक मिळवण्यासाठी शिकली पाहिजे, शिकून मोठी झाली पाहिजे असा विचार सुद्धा आत्या करताना दिसते. त्याचवेळी मैथिलीचं लग्नाचं वय नाही म्हणून उदयला ती मैथिलीच्सोबत लग्नाच्या विचाराबाबत आडकाठी करते. यावरून ती या सर्व बाबींचा विचार करता आत्या ही विचार करता सावित्रीबाई फुले यांच्याप्रमाणे शिक्षणाची भोक्ती होती हे लक्षात येते. मात्र, दहावीच्या पेपर संपल्यावर मधू नावाच्या वर्गमित्रासोबत बोलताना सगळे बदलले तरी चालते मात्र शाळा बदलायला नको, असा विचार मैथिली बोलून दाखवते आणि त्याचवेळी वडील गेल्यावर काकांनी शिकायला आणल्यामुळे मधु सुद्धा शाळा बदलून आल्याचे तिला समजते.

एकल पालकत्व असलेल्या किंवा आई-वडील दोन्ही नसलेल्या मुलांच्या शिक्षणाची होणारी वाताहात या ठिकाणी लेखिकेने उलगडून दाखवली आहे. याच ठिकाणी मधुचे दहावी पास होणे आणि मैथिलीचे दहावी नापास होणे यात नापास यांची जातच वेगळी असते. अशा वाक्यातून नापास मुलांच्या मानसिक स्थिती आणि त्यांच्या मनातील निराशा आशा बगे यांनी नेमकेपणाने व्यक्त केली आहे. लायब्ररीत रोहिणीला मदतनीस म्हणून काम करत असताना मैथिली अनेक पुस्तकांचे वाचन करते आणि या दोन महिन्याची प्रगल्भ झाल्यासारखी वाटते हा आशा बगे यांनी अवांतर वाचनाचा झालेला फायदा अधोरेखित करण्याचा प्रयत्न आहे असे मला वाटते. या दरम्यान आपल्या मामाची मुलगी आपल्याकडे शिकायला आहे. या गोष्टीचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न करणारे उदय आणि संजू



ही दोन पात्रे स्त्रियांच्या मनाचा विचार न करता त्यांचा उपभोग घेण्याची वृत्ती ठेवणार्या प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. प्रोफेसर देवस्थळे या एका दिवंगत ज्येष्ठ लेखकाच्या घरी गेल्यावर त्याच्या पत्नीकडून मिळणारी वागणूक पाहता विद्वान लेखकांच्या घरचे वातावरण अनेकदा वाचकांसाठी भ्रमनिरास करणारे असते हे लक्षात येते. त्यातही पुन्हा देवस्थळे बाईंकडे मैथिलीचे काम करणे, परीक्षेच्या काळात त्यांच्याच घरी जाऊन राहणे या सर्व बाबी आई-वडिलांचे छत्र हरवलेल्या मुलांच्यासाठी शिक्षण किती कठीण होऊन जाते? हे सांगण्यासाठी पुरेसे आहे. त्यातही बारावीत पीसीबी ग्रुपला ९० टक्के मार्क मिळवूनही ९० टक्के मार्क मिळवून वैद्यकीय क्षेत्रात जाण्याची इच्छा असणारे मैथिली आर्ट कॉलेज जॉईन करते. या प्रसंगामुळे तर वरील बाबीवर शिक्कामोर्तबच होते. मात्र, देवस्थळे बाईकडून स्वतःहून पुस्तके मागून घेणारी मैथिली त्यांनी देऊ केलेल्या महागाच्या साड्या घेण्यास नकार देते यातून मैथिलीचा स्वाभिमान आणि विद्येसाठी, ज्ञान मिळवण्यासाठी मागणी केली तरी इतर गोष्टीसाठी मागणी करू नये हा तिचा स्वभाव आशा बगे यांनी अधोरेखित केला आहे. कॉलेजच्या शिक्षणामध्ये मैथिली आणि मिलिंद यांच्या निर्माण होत जाणारे हळवे संबंध अशा बाबींमुळे शिक्षण सोडून आजचे शिक्षण वेगळ्याच मार्गावर जात आहे. अर्थात त्यात भावनाशीलता आहे किंवा असले तरी आजच्या विद्यालय शिक्षणात पालक वर्ग मुला-मुलीबाबत साशंक का असतात? अशा प्रश्नांचा उलगडा होत जातो.

दांडेकर यांच्या माध्यमातून आशा बगे यांनी भारतीय शिक्षण व्यवस्थेला सरळ प्रश्न विचारला आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेवर हल्ला करत असताना दांडेकर म्हणतात, आपल्या देशातला प्रत्येक प्रज्ञावंत अनेक वर्ष कारकुनीच करत असतो. माझा मुलगा बी. ई. होऊन अमेरिकेत गेला तिथेही तो कारपूनच होता इतके वर्ष! अशा शब्दात भारतातील शिक्षणाचा आणि प्रत्यक्ष बाहेर देशात जाऊन काम करण्यात मोठेपणा बाळगणार्या प्रवृत्ती मधील फोलपणा आशा बगे यांनी व्यक्त केला आहे. मात्र स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास असेलेली मैथिली शिक्षण न सोडता पी.एच. डी.पर्यंत शिक्षण घेताना जीवनाचे वेगवेगळे अनुभव घेत असते. मैथिलीचे शंतनूसोबतचे लग्न म्हणजे दोन सुशिक्षित आणि साधारणपणे विधवा आईचे परक्या पुरुषासोबत संबंध असलेल्या एका विचित्र मानसिकतेत जगलेल्या दोन जीवांचे मिलन. मात्र, त्यातही पुढे येत जाणारा दुरावा. त्यातूनच स्वतःच्या मुलाला जीवनाच्या शर्यतीत पुरेपूर उतरावे म्हणून औपचारिक आणि अनौपचारिक दोन्ही शिक्षणासाठी धडपडणारी मैथिली हा एक वेगळा टप्पा कादंबरीत वाचायला मिळतो. त्याच टप्प्यावर तिचे पी.एच.डी. चे शिक्षक डॉ. अरुणाचलम हे आपल्या मुलीच्या वयाच्या असलेल्या मैथिलीच्या खांद्यावर पुरुषी वासनेच्या स्पर्शाने हात ठेवतात, अशा प्रसंगातून पुरुष गुरु-शिष्याच्या नात्याच्या पलीकडे स्त्रीच्या शरीराला महत्त्व देतात ही बाब आजच्या शिक्षण प्रणालीवर नेमकेपणाने भयावह भाष्य करते.

खाजगी आयुष्यातील ताणतणावाच्या पडसादातून मैथिली एक दिवस कॉलेजमधील मुलांना शिकवत असताना कमी पडते आणि मुले डॅम बोअर म्हणून तिची अवहेलना करतात. या प्रसंगातून भावी पिढीला ज्ञान द्यायचे असल्यास संबंधित शिक्षक तान तनाव रहीत असला पाहिजे ही एक बाजू तर माणसाच्या जीवनामध्ये खाजगी रीतीने काही ताणतणाव असल्यामुळे एखादेवेळी शिक्षकाचे शिकवणे कमी जास्त होऊ शकते हे जाणून घेणे शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांनाही गरजेचे आहे. नवीन पिढीला शिकवत असताना निर्माण होणार्या दोन पिढीतील अंतराचा म्हणजे जनरेशन गॅपचा विचार सुद्धा आशा बगे यांनी भूमी कादंबरीत केलेला दिसून येतो.

मैथिलीचा मुलगा अंशुमन जेव्हा वर्तमानपत्रात स्तंभलेखन करायला सुरुवात करतो तेव्हा त्याच्या आईने त्याला दिलेल्या काही सूचना न आवडल्याने तो स्तंभलेखनच थांबवतो तसेच पुन्हा दुसर्या प्रसंगी मैथिलीला आपल्या कविता पाठवून त्याबद्दल तिने मत द्यावे, असे तो सांगतो. तरी ती त्याचे दोष दाखवत नाही. त्याला ते आवडले नसते असे तिला वाटते. यातून शिक्षणाच्या प्रवाहात राहणार्या उच्चभ्रू कुटुंबात असलेला जनरेशन गॅप लेखिकेने नेमकेपणाने टिपला आहे.

एकंदरीत भूमी या कादंबरीत मैथिलीचे जीवन ही एक रणभूमी आहे, या भूमीवर अनेक भावनिक युद्ध होतात पण भूमीचा जय किंवा पराजय होत नाही. मैथिली हे सीतेचे नाव, आणि सीता ही भूमिती कन्या...तिच्या जीवनात सतत संघर्ष, ह्याच पार्श्वभूमीवर ही कादंबरी उभी आहे. डॉ. विश्राम आणि मैथिलीची अम्मा हे सुशिक्षित जोडपं धर्माचे बंधने झुगारून एकमेकांशी लग्न करतात. मात्र, त्याचे परिणाम आणि प्रभाव मैथिलीच्या जीवनावर शेवटपर्यंत दिसत होतो. पुरुषप्रधान संस्कृती मैथिलीच्या आत्या, देवस्थळी, बिना, रोहिणी, संहिता, वासुकी अशा विविध स्त्री पात्रांची होणारी घुसमट या कादंबरीत दिसते. अनेक पुरुष पात्रांचे स्त्रियांकडे पाहण्याची दृष्टी किती वासनांध असते तेही या कादंबरी दिसते. साधारणपणे सर्वच पात्र शिक्षित असले तरी प्रत्येक पात्राची एक वेगळी घुसमट आशा बगे यांनी लिहिली आहे. (पान ६ वर)

# कहाणी घराची

घरपण

सुनेत्रा पंडित
भ्र. ८३०८६३७४६५

कुठल्याही घराचा ही जन्म कष्टाने होतो. हौसेने होतो. मला पाऊस. ऊन, वारा यासाठी दारे खिडक्या असतात गरजांप्रमाणे वस्तू ठेवायसाठी आणि जागा वाचण्यासाठी कपाटे केलेले असतात. घराला छप्पर असते, ऊन पावसापासून थंडीपासून रक्षण होते, घर एका अर्थाने देवानेच दिलेले असते तरी पण त्यात देवघर असते.

पोट पूजेची सोय असते, माणसांच्या आवडीप्रमाणे त्याचे रूप सौंदर्य बदलते. घरामुळे माणसांचा स्वभावात फरक पडतो, वृत्तित फरक पडतो, आणि माणसांच्या वृत्ती प्रमाणे घरावर परिणाम होतो, अशी देव-घेव असते. पाणीही मुख्य गरज असते, वीज पाणी विचारपूर्वक वापरले तर ते खरे नागरिकत्व असते.

आपले घर आपल्यासाठी जसे असते तसे



अडचणीतल्या माणसांसाठी सुद्धा ते असते, अतिथीसाठी एक आधार असते, कुत्रा मांजर पोपट तुळस वनस्पती या सर्वांवरचे प्रेम घरातल्या लोकांच्या अभिरुचीप्रमाणे दिसून येते.

घरालाही स्वच्छतेने सौंदर्य लाभते. मधून अधून रंगरंगोटी करून नटवावे लागते. घर हे घरातल्यांच्या संस्कृती प्रमाणे, स्वभावाप्रमाणे, आपले रूप बदलते. माणसालाही जन्म तारुण्य आणि वृद्धत्व या अवस्था असतात. तशाच घरालाही हळूहळू वृद्धत्व येते. त्यालाही नेहमी दुरुस्ती करून, तंदुरुस्त ठेवावे लागते. मधून-मधून त्याच्याही काही आजारांचे लक्षण दिसते. ते प्लंबर इलेक्ट्रिशियन या डॉक्टरांना बोलावून दुरुस्ती करावी लागते. काळाप्रमाणे गरजा बदलतात, आणि घरांच्या संकल्पनेत वेगवेगळे बदल होतात, गीझर फ्रीज एसी शॉवर या सार्या सुखावह गोष्टी धनिकांसाठी असतात, पण त्याच्याशिवायही राहणारी माणसेही आनंदात राहू शकतात. सगळ्या प्रकारच्या घरामध्ये राहिलेला माणूस अनुभवाने परिपक्व होतो हेच खरे..... घराला छान ठेवल्यावर माणसाचे मन प्रसन्न होते व त्याचे तारुण्य वाढते. याउलट घराच्या अस्वच्छतेमुळे माणसाचे मानसिक वय नकळत वाढते व वृद्धत्व आल्यासारखे होते. आर्थिक संपन्नता आणि मानसिक विशालता या दोन्हींचे दर्शन मूकपणाने घर करत असते.

पान १ वरून

# जागतिक आर्थिक घुसळणीत भारत चमचमता तारा

आणखी काही दिवस होत राहतील. पण, आर्थिक पाहणी अहवाल आणि अर्थसंकल्प एकत्रितरित्या पाहिले, अभ्यासले, तर गेल्या दशकातील धोरणात्मक पाया, त्यावर उभारलेली आजच्या वेगवान वृद्धीची इमारत आणि विकसित भारताची पायाभरणी अशी सलगता प्रतीत होते. उच्च विकासदर, नियंत्रित महागाई, जागतिक व्यापारात वाढती भागीदारी, वाढती गुंतवणूक, याचबरोबर सामाजिक सुरक्षा केलेल्या खर्चासह राखलेली शिस्त यातून भारत जागतिक आर्थिक घुसळणीतला चमचमता तारा हे बिरुद राखत 'विकसित भारता'कडे वाटचाल करणार, हे नक्की.

# बांगलादेशींच्या उमाळ्याने 'हद्द' ओलांडली!

गांजलेल्या बांगलादेशी जनतेचे दैनंदिन जीवन या राखीव जागा आंदोलनामुळे अधिकच बिकट झाले. त्यामुळे तेथून भारतात घुसणार्यांच्या संख्येतही वाढ झाली आहे. ममतांनी नुकतीच घोषणा केली की, ज्यांना तेथील सामाजिक असंतोषामुळे भारतात आश्रय घ्यायचा असेल, त्यांचे आम्ही स्वागत करू. तेथील असाहाय जनता प. बंगालच्या सीमेवर मदतीच्या अपेक्षेने आल्यास आम्ही त्यांचा स्वीकार करू. पण, ममतांच्या या अनावश्यक औदार्याला बांगलादेशच्या परराष्ट्रमंत्र्यांनी परस्पर उत्तर दिले.

ममतांशी आमच्या सरकारचे जिव्हाळ्याचे संबंध असले, तरी त्यांच्या या घोषणेमुळे देशात विनाकारण संभ्रमाचे वातावरण निर्माण जाले आहे. त्यामुळे त्यांच्या या विधानाचे स्पष्टीकरण करण्याची विनंती आम्ही भारत सरकारला केली आहे, असे बांगलादेशाचे परराष्ट्रमंत्री हसन मेहमूद यांनी म्हटले आहे. त्यांचे हे विधान म्हणजे ममतांच्या लांगूलचालनाच्या राजकारणाला दिलेली परस्पर चपराकच आहे. कारण, ममतांना नसला, तरी बांगलादेशाच्या परराष्ट्रमंत्र्यांना थोडा तरी स्वाभिमान शिल्लक आहे. ममतांनी आपल्या देशाच्या अंतर्गत बाबींमध्ये निष्कारण हस्तक्षेप वा टिप्पणी करू नये आणि आपल्या नागरिकांची काळजी घेण्यास बांगलादेशचे सरकार अजून समर्थ आहे, हेच त्यांना सुचवायचे आहे.

केंद्र सरकारने लागू केलेल्या 'सीएए' या कायद्याच्या अंमलबजावणीस ममता बॅनर्जी यांनी विरोध दर्शविला आहे. बांगलादेशातील हिंदूंना भारताचे नागरिकत्व मिळणे, या कायद्याने सुलभ होते. पण, ममता बॅनर्जी यांना तेथील हिंदूंनी भारतात येणे मान्य नाही. सद्यस्थितीत तेथील मुस्लिमांना बंगालमध्ये आश्रय देण्यास त्या एका पायावर तयार आहेत. मुळात कोणत्याही परकीय नागरिकाला भारतात येऊ देणे किंवा न येऊ देणे, हे केंद्र सरकारवर अवलंबून. कोणत्याही राज्याच्या मुख्यमंत्र्याचा त्याच्याशी काहीही संबंध नाही. ममतांप्रमाणे उद्या मेहबूबा मुफ्ती किंवा फारूख अब्दुल्ला हे पाकिस्तानी नागरिकांना भारतात येण्याचेही आमंत्रण देतील. ही राज्ये या नेत्यांची खासगी मालमत्ता आहे काय? बांगलादेशातील नागरिकांना आश्रय देण्याची घोषणा ममता बॅनर्जी परस्पर कशी काय करू शकतात? यापूर्वी त्यांनी बांगलादेशातून रोहिंग्या या म्यानमारमधील मुस्लिमांना आपल्या राज्यात आश्रय दिलाच होता. खरे तर तेव्हाच केंद्र सरकारने कठोर पाऊले उचलायला हवी होती. त्या देशातील हिंदूंना भारतात वसविण्यास विरोध करताना तेथील मुस्लिमांना मात्र स्वीकारण्याचे त्यांचे धोरण हे उघडच पक्षपाती आणि जातीयवादी.

संघराज्यीय व्यवस्थेच्या आडून ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारवर कायम निशाणा साधण्याचा प्रयत्न केला आहे. केंद्राने आपली सारी जबाबदारी पार पाडायची, पण आपण केंद्र सरकारप्रति असलेली जबाबदारी पार पाडणार नाही, असे हे हेकट आणि उद्दाम राजकारण. खरे तर ममतांचे सरकार कधीच बरखास्त व्हावयास हवे होते. पण, केंद्र सरकारलाही आपल्या लोकशाहीवादी मूल्यांची प्रतिमा जपायची असल्याने त्याने ममतांच्या अनेक बेकायदा आणि बेबंद आदेशांना सहन करण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्यामुळेच ममतांचे फावले असून त्यांनी आता शब्दशः 'हद्द ओलांडली' आहे.

# पराधीन

दादांना आजच हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळाला होता. घरी जायचं म्हणून दादा उल्हासित होते. राकेशची वाट पाहात कॉटवर बसले होते. राकेश ९ ला येऊन त्यांना घरी नेणार होता. गेले आठ दिवस ते या हॉस्पिटलमध्ये कंटाळून गेले होते. औषधांचा वास, रुग्णांचे कण्हणे, होणारा त्रास, सिस्टरचे खेकसणे, डॉक्टरांचा राऊंड, त्यांचं खोटंखोटं हसत पेशंटशी बोलणं, त्यांना दिलासा देणं, तेच ते ब्लडप्रेशर पहाणं, स्टेथोस्कोप लावणं, परत परत सूचना देणं... दादांना वाटत होतं दूर कुठेतरी मोकळ्या ठिकाणी निघून जावं. वाटेल ते खावं, प्यावं, खूप भटकावं, मोकळ्या वार्यात फिरावं. त्यामुळेच डॉक्टरांनी त्यांना जेव्हा उद्या घरी जायचं म्हणून आदल्या दिवशी सांगितलं तेव्हा ते खूप खूश झाले. आज सकाळीच ते लवकर उठून तयार झाले होते.

राकेशची वाट पाहत बसले होते. राकेश पाच-सहा दिवस त्यांच्याजवळ हॉस्पिटलमध्येच झोपला होता. आता तब्येत ठीक होती म्हणून तेच त्याला म्हणाले होते, ''तू जा आज घरी झोपायला. इथे त्या एवढ्याशा बाकावर झोपता येत नाही. उगाचंच तुला जागरण. घरी जाऊन शांत झोप. मी झोपतो एकटा.'' राकेश जास्त आढेवेढे न घेता घरी गेला होता. राकेश साडेनऊला आला. त्याने खोलीतील सगळं सामान आवरलं. बॅग भरली. डॉक्टरांना भेटून बिल चुकत करून तो आला. दादांना घेऊन हळूहळू चालत तो बाहेर आला. ऑटोत बसल्यावर दादांना एकदम हायसं वाटलं. घरी पोहोचल्यावर दादा आपल्या खोलीत गेले. त्यांच्या कॉटच्या समोर लावलेल्या आपल्या पत्नीच्या सुमतीच्या फोटोकडे पाहत पुटपुटले, ''आलो बरं परत. आठ दिवसांपूर्वी जेव्हा छातीत दुखायला लागलं तेव्हा वाटलं होतं, आता संपलं सगळं. पण वाचलो.'' दादा कॉटवर आडवे झाले आणि त्यांनी शांतपणे डोळे मिटले. तेवढ्यात नीमा- त्यांची सून चहा घेऊन आली. ''दादा, चहा...'' चहा पिता पिता दादा म्हणाले, ''मुलं गेली का गं शाळेत.'' ''हो. मी पण निघतेच. जेवणाचं सगळं ठेवलंय, ओट्यावरच आहे. नीट वाढून घ्याल?'' ''हो, हो घेईन जा तू.'' नीमा पण नोकरी करायची. राकेश बँकेत होता. दोघंही बरोबरच घरून निघायचे. आठ दिवसांपूर्वी दादांना हार्ट अटॅक आला तेव्हा नीमा आणि राकेश दोघंही घरी नव्हते. शेजार्यांनीच त्यांना ॲडमिट करून राकेशला फोन केला होता. त्यामुळे दादांना चाळीतलं हे छोटंसं तीन खोल्यांचं घर विकायचे नव्हते. नीमा आणि राकेशला हे घर विकून फ्लॅट घेण्याची इच्छा होती, पण दादा त्यांना विरोध करायचे. नीमा आणि राकेश निघून गेले. दादांनी समोरच्या खोलीचं दार लावलं. आत येऊन फॅन लावून ते खुर्चीत बसले. थोडा वेळ टीव्ही बघत बसले. मग उठून त्यांनी जेवण उरकलं आणि आपल्या कॉटवर शांतपणे झोपले. आज त्यांना खूप शांत झोप लागली. डॉक्टरांनी त्यांची तब्येत व्यवस्थित असल्याचं सांगितलं होतं. पण डॉक्टरांनी त्यांना दोन महिन्यांच्या आत बायपास करायला सांगितली होती. त्याची त्यांना जरा भीती वाटत होती. पण त्यांच्या ज्येष्ठ नागरिक संघातले त्यांचे मित्र मोहनरावांची मागच्या वर्षी बायपास झाली होती. ते दादांना धीर द्यायचे. त्यांचं ऐकून दादांनी मनाची तयारी केली. आता त्यांनी बायपासला सामोरं जायचं पक्कं केलं होतं. संध्याकाळी सर्वजण परत आले तेव्हा दादांनी राकेशजवळ विषय काढला. ''काय म्हणाले रे डॉक्टर?'' ''तेच तर, बायपास करायची म्हणाले. पण तुम्ही घाबरता.'' ''अरे, आता हिंमत बांधलीय मी. तू काही काळजी करू नको. सांग डॉक्टरांना कधीही करा म्हणावं.'' राकेश आणि नीमाने एकमेकांकडे पाहिलं आणि ते गप्प बसले. ''कधी बोलतोस डॉक्टरांशी?'' त्यांनाही वाटत होतं की, डॉक्टरांनी सांगितलीच आहे तर लवकरात लवकर बायपास सर्जरी करून घ्यावी, उगाचंच वेळ वाया घालवून आयुष्याशी खेळ कशाला करायचा? ''अं... बोलतो बोलतो.'' ''लगेचच बोल उद्या...'' त्यानंतर १५ दिवस उलटले तरी राकेश डॉक्टरांकडे जाण्याचा विषय काढेना तेव्हा दादाच न राहवून म्हणाले,

''बोललास ना रे डॉक्टरांशी?'' ''अं... नाही ना कामाच्या गडबडीत वेळच झाला नाही.'' दादा जरा नाराज झाले. ''लगेच बोलशील उद्या? लवकरात लवकर ऑपरेशन करून घेऊ या.'' राकेश काहीच बोलला नाही, नीमासुद्धा गप्पच होती. दादांना वाटत होतं की, डॉक्टरांनी एवढं बजावून सांगितलंय तर ऑपरेशन लवकरात लवकर व्हावं. परत आठ-दहा दिवस उलटले तरी राकेशने काही विषय काढला नाही. तेव्हा दादांना अवघडल्यासारखं झालं. पण त्यांनी ठरवलं की आज संध्याकाळी राकेश घरी आला की आपणच बोलू त्याच्याशी. संध्याकाळी जेवणाच्या वेळेला दादा परत म्हणाले, ''राकेश डॉक्टरांकडे गेलास का रे?'' ''अं.. नाही ना दादा जातो आता.'' ''कधी?'' ''कधी म्हणजे जाईन ना.'' ''उद्याच जा.'' ''एवढी काय घाई करता? दादा जाईन. पण... पण दादा पैशाची सोय नको का करायला?'' ''आपल्यासारख्या मध्यमवर्गीय लोकांना बायपास सर्जरीसारखे चोचले परवडतात का?'' नीमा बोलली. तेव्हा दादांनी चमकून तिच्याकडे पाहिलं. मग परत ते राकेशला म्हणाले, ''बघ, माझ्या फंडाचे दीड लाखापर्यंत आहेतच. शिवाय कुठे कुठे गुंतवून ठेवलेले, फिक्स डिपॉझिट्स सर्व मिळून होतीलच दोन लाखांपर्यंत. तुला जास्त खर्च करावा लागणार नाही.'' ''दादा, तुम्ही उगाचच घाई करू नका. मी बोलतो डॉक्टरांशी...'' राकेश उठून आत जात म्हणाला. दादा घाबरले. त्यांना जाणवलं, राकेशची सर्जरीची आणि त्यासाठी पैसा खर्च करायची इच्छा दिसत नाही. रात्री बराच वेळ त्यांना झोप लागली नाही. पाणी प्यावं म्हणून ते स्वयंपाक घरात गेले. परतताना त्यांना राकेश आणि नीमाची वादावादी ऐकायला आली. ''अहो पण आता ८० वर्षांचे होतील दादा. आता या वयात एवढा पैसा, जवळ असलेली सर्व पुंजी खर्च करून बायपास सर्जरी करण्याची काही आवश्यकता आहे का?'' दादा चरकले. त्यांच्या हृदयात कळ आली. ''अगं पण त्यांची इच्छा आहे.'' राकेश म्हणाला. ''तेच तर म्हणतेय मी. एवढं कसं कळत नाही त्यांना, आपण जर खूप श्रीमंत असतो तर मीही काही म्हटलं नसतं. पण आता एवढ्या काटकसरीच्या आयुष्यात, पैशांच्या चणचणीत एवढं मोठं ऑपरेशन म्हणजे...'' ''पण त्यांना नाही कसं म्हणायचं.'' ''तेच तर म्हणते मी. त्यांनाच कळायला हवं. त्यांनी आपणहूनच म्हणायला हवं की राकेश असू दे. एवढं मोठं ऑपरेशन मी काही करणार नाही. आता या वयात एवढा खर्च करून उपयोग आहे का काही? बोलू नये, पण ऑपरेशनने असं किती आयुष्य वाढणार आहे? आणि आता जगलेत ना हो ते एवढे ८० वर्षांचं परिपूर्ण आयुष्य. अजून जगण्याची किती हाव.'' ''नीमा हळू बोल.'' राकेश म्हणाला. ''राकेश, तू बोल त्यांच्याशी.'' ''अगं पण पैसा त्यांचाच आहे.'' ''म्हणून काय झालं? या वयात एवढा पैसा, सगळी पुंजी खर्च करणं म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे. त्यांचा पैसा म्हणजे? मुलांसाठी, नातवंडांसाठी काहीतरी शिल्लक ठेवलं मागे तर काय हरकत आहे? आणि ही सगळी पुंजी संपल्यावर आपल्या जवळ तरी काय आहे हो? एक फ्लॅट घेण्यासाठी तर आपली मरमर चाललीय. ''नीमा शांत हो. जाऊ दे. जे होईल ते बघू.'' ''हेच तर मला आवडत नाही तुमचं नरमाईचं धोरण, जरा व्यवस्थितपणे बोला ना दादांशी.'' दादांच्या डोळ्यात पाणी भरून आलं. छातीवर हात चोळत ते आत आले. पलंगावर आडवे झाले. खूपच अस्वस्थ वाटायला लागलं म्हणून ते येरझारा घालू लागले. नीमाच्या बोलण्यातला व्यवहारीपणा त्यांना पटला. मृत्यूच्या कल्पनेनेच ते भयभीत होत होते.

दादांना काय करावं सुचेना. डोळ्यातलं पाणी पुसत ते सुमतीबाईंच्या फोटोसमोर उभे राहिले. ''सुमती, जास्त आयुष्य म्हणजे कोणाला किंमत नसते गं, आता खरंच अजून जगून मला करायचं तरी काय? येतोय गं... लवकरच भेटायला येतोय...?'' दादांना जाणवलं की छातीत जोरात कळ आली आहे. ते एका हाताने छाती चोळत पलंगावर बसले. देवाचा धावा करत ते वेदना सहन करण्याचा प्रयत्न करत राहिले...

माधवी देशपांडे

**मराठी संत परंपरेतील थोर साक्षात्कारी, संत रामदासस्वामी हे रामदास्य भक्तीद्वारे समर्थ झाले. श्रीराम हेच त्यांच्या जीवनाचे व कार्याचे अधिष्ठान व सारसर्वस्व होते. श्रीराम हीच त्यांची इष्टदेवता, सद्गुरू, सखा आणि प्रेरणा होती. त्यांचे सारे साहित्य रामभक्तीचा अमृतठेवा आहे. रामकथेचा राष्ट्रीय ग्रंथ, राष्ट्रप्रेरणा ग्रंथ म्हणून संत एकनाथांप्रमाणेच समर्थ रामदासांनी जोरकस पुरस्कार केला. त्यामध्ये विश्व उद्धारण्याचे सामर्थ्य आहे. देव देश व धर्मासाठी, निस्तेज समाजाला पुरुषार्थाने सज्ज करण्याचे महान ऐतिहासिक कार्य त्यांनी बलोपासनेद्वारे केले. समर्थ रामदासांच्या साहित्यातील समर्थ करण्याचे महान ऐतिहासिक कार्य त्यांनी बलोपासनेद्वारे केले. समर्थ रामदासांच्या साहित्यातील समर्थ करण्याचे महान ऐतिहासिक कार्य त्यांनी बलोपासनेद्वारे केले. समर्थ रामदासांच्या साहित्यातील समर्थ रघुवीराचे दर्शन आपण सलग पाच भागांमध्ये करणार आहोत. धर्म जागो राघवाचा या लेखपंचकापैकी पहिला लेख...**

लेखांक ३०

# संत रामदासस्वामींचा 'रघुवीर समर्थ'

(भाग पहिला)

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

**रामाची पदे मानसी धरीन ।**
**विश्व उद्धरीन हेळामात्रे ।**

महाराष्ट्राच्या संतपंचकातील एक प्रमुख संत म्हणून समर्थ रामदासस्वामींच्या अपूर्व योगदानास कृतज्ञतापूर्वक वंदन केले जाते. महाराष्ट्राला फार मोठी वैभवशाली संत परंपरा आहे. त्यापैकी संत ज्ञानेश्वर, संत नामदव, संत एकनाथ, संत तुकाराम आणि संत रामदास स्वामी यांना महाराष्ट्राचे 'पंचप्राण' म्हणूनच गौरविले जाते. संत पंचकातील समर्थ रामदासांच्या बद्दल थोर संशोधक, अभ्यासक कै. रा.चिं ढेरे म्हणतात- महाराष्ट्रातील संतपंचायतनातील समर्थ हे प्रथम रामदास होते आणि मगच समर्थ बनले. त्यांच्या सामर्थ्याचे रहस्य त्यांच्या रामदास्यात आहे.

समर्थ रामदासस्वामी यांच्या जीवनात प्रभु रामचंद्राचे १) इष्टदैवत, २) सद्गुरू ३) सखा ४) प्रेरणा देवता अशा अनेक प्रकारे स्थान दिसून येते.

१) जांबमधील बाल्यकाळातच घराण्यातील रामोपासना करीत असतानाच समर्थांना श्रीरामाचा साक्षात्कार झाला व अनुग्रह लाभला. या ठिकाणी श्रीरामाचे स्थान सद्गुरू म्हणून आहे. समर्थ म्हणतात रामचंद्र स्वामी स्वामी राम अयोध्येचा राजा २) नाशिक-टाकळी येथील तपश्चर्येच्या काळात श्रीरामाचे स्थान उपासना दैव म्हणून आहे. **राम उपासना ऐसी । ब्रह्मांड व्यापिनी** पहा. ही पदे त्याचे द्योतक आहेत.

३) दासबोध- आत्माराम आदि लेखन काळात श्रीराम ही समर्थांची प्रेरणा देवता आहे. समर्थ कृपेची वचने या दासबोध व आत्माराम मधील ओव्या पहा.

४) पारमार्थिक- राष्ट्रीय- सामाजिक कार्यात श्रीराम हे त्यांचे जनजागृतीचे दिव्य पुरुषार्थी साधन आहे. रघुनाथे स्मरोनी कार्य करावे। ते तात्काळचि सिद्धी जाते. ही पदे त्याची साक्षच आहे. आणि छ. शिवाजींच्या पराक्रमाद्वारे स्वराज्य निर्मितीच्या कल्पनेमागे रामराज्य हे त्याचे साध्य आहे.

थोडक्यात अशा प्रकारे समर्थांचे अवघे जीवन व कार्य राममय आहे.

**घराण्यातील रामोपासना:-**



**माता रामो मत्पिता रामचन्द्:।**
**स्वामी रामो मत्सखा रामचन्द्र्ः।।**

बुधकौशिक ऋषींनी रामरक्षा स्तोत्रामध्ये व्यक्त केलेल्या, प्रभू रामचंद्रांविषयीच्या भक्तीयुक्त दृढनिष्ठा भावाचे, समर्थ रामदास स्वामींच्या समग्र जीवन कार्यातून आपणास विलोभनीय दर्शन घडते. **माय, बाप, बन्धु, स्वजन, सांगाती। तूचि आदिअंती माहिये।।** हा समर्थांचा अभंग श्रीरामप्रभुंचे त्यांच्या जीवनातील अनन्य, एकमेवाद्वितीय स्थान अधोरेखित करणारा आहे. श्रीरामचंद्र हे त्यांच्या जीवन व कार्याचे सारसर्वस्व आहे.

समर्थ रामदासांना रामोपासना लाभली, ती घराण्यात चालत आलेली वडिलोपार्जित उपासना या स्वरूपात, खर तर ठोसर घराणे मूलतः सूर्योपासक. रामदासांच्या वडिलांचे नावही सूर्योपंत होते व रामदास स्वामींचे जन्मनावही सूर्यवाचक नारायण असे ठेवण्यात आले हाते. पण समर्थभक्त कै.शं.श्री. देव एका लेखात म्हणतात- रामदासांचे पाळण्यातील नाव राम, राघव ठेवण्यात आले होते. कारण त्यांचा जन्म रामनवमीचा होता. (संदर्भः रामदास रामदासी शताब्दी ग्रंथ) दासविश्राममध्ये समर्थांची जी ३६ नावे दिली आहेत. त्यात राघोबा असे एक नाव आहे. एवढेच नव्हे तर समर्थपंचायतनातील प्रसिद्ध संत जयराम स्वामी वडगावकर हे रामदासांना राघोबा अशाच नावाने संबोधत होते. अशा प्रकारे रामदास स्वामींचा जन्म रामनवमीचा व नावही राम हे सूचक होते.

मूळ सूर्योपासक घराण्यात रामोपासना कशी आली? या विषयी एक प्रसंग समर्थ शिष्य अनंत मौनी (तंजावर) यांचे शिष्य मेरूस्वामी लिखित रामसोहळा या ग्रंथात वर्णिलेला आहे. तो प्रसंग असा- एका सकाळी समर्थांचे वडील सूर्यो पंत अंगणात उभे राहून सूर्योपासना करीत असतानाच एक तेजस्वी सत्पुरुष आला आणि त्याने राम, सीता व लक्ष्मण अशा तीन मूर्ती दिल्या व आपण रामोपासना करावी अशी विनंती करून तो अंतर्धान पावला आणि ठोसर घराण्यात रामोपासनेचा श्रीगणेशा झाला.

**अवतारकार्यासाठीच जन्मः-**

समर्थ रामदास स्वामींना (नारायण) वयाच्या केवळ ८व्या वर्षी (इ.स.१६१६ साली) रामदर्शनाचा साक्षात्कार झाला होता. साक्षात्कार ही केवळ एक दिव्य अनुभूतीच नव्हे तर ती एक सर्वश्रेष्ठ अवस्था आहे. अशी अवस्था प्राप्त करण्यास अनेक वर्षे तपश्चर्या करावी लागते; पण अशी श्रेष्ठतर अवस्था समर्थांना बालवयातच प्राप्त झालेली होती. समर्थांचा म्हणजे बाल नारायणाचा जन्मच मुळी चैत्र शुद्ध नवमी म्हणजे रामनवमीच्याच दिवशी झाला हा केवळ योगायोगच नव्हे तर एक संकेत होता. सामान्य माणसे जन्माला आल्यानंतर जीवनाचे उद्दिष्ट शोधतात व मग कार्य करतात. पण जन्मजात अवतारी पुरुष हे विशिष्ट कार्यसिद्धीसाठीच जन्मलेले असतात.

समर्थ रामदासांना (छोटा नारायण) आपल्या जीवनकार्याचे स्मरण होते म्हणूनच त्यांनी लग्नमंडपातून आपल्या इष्ट कार्यासाठी प्रयाण केले. सर्व सामान्य लोक त्याला पलायन म्हणतात पण ते पलायन नसून विधिलिखित इष्ट कार्यार्थ प्रयाण होते. जांब येथून वयाच्या १२व्या वर्षी घर सोडून समर्थ थेट रामचरणांनी परमपावन झालेल्या नाशिक परिसरात आले व गोदावरीच्या तटी टाकळी येथे त्यांनी कठोर तपाचरण केले. या १२ वर्षांच्या तपश्चर्येने घराण्यातील रामोपासना त्यांनी कळसाला पोचविली.

श्रीराम जय राम जय जय राम या त्रयोदशी मंत्राचा जपयज्ञ केला. वाल्मिकी ऋषींच्या रामायणाची स्वअक्षरात प्रतिलिपी केली. अशाप्रकारे ग्रंथाची प्रतिलिपी करून ईश्वरचरणी अर्पण करणे हा भक्तीचाच एक प्रकार आहे.

**श्रीराम जय राम जय जय राम।**
**ऐसा काही एक धरूनि नेम।**
**जप किजे तेणे आत्माराम।**
**जोडेल नेमे।।**

असे समर्थांनी म्हटले आहे. तो केवळ उपदेशच नव्हे तर ती त्यांची स्वानुभूती आहे.

**!! जय श्रीराम !!**



# आपल्या दु:खाचे वारुळ करु नका

अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

पुरंदरे आणि पु.ल.ची मैत्री मराठी साहित्य प्रांत जाणतो. एक विनोद प्रांतातील दिग्गज तर दुसरे रोमहर्षक व जींवत इतिहास श्रोत्यांच्या डोळ्यासमोर उभे करणारे महाराष्ट्र भूषन. विनोदी लेखक, वक्ते ही पु. ल.ची प्रतिमा लक्षात घेवून त्यांना त्यांच्या घरातील विनोदी वातावरणाविषयी काही बोलावं व त्यातून विनोद निर्मिती करावी, अशी लहर पुरंदरेंना आली. ते पु.ल.ना म्हणाले, तुमच्या घरात सारखे विनोद चालत असतील नाही का? तुम्ही विनोद सांगत आहात आणि सुनीताबाई सारख्या हसत आहेत. असं आनंदी वातावरण पूर्ण महाराष्ट्रात कुठेही नसेल.

सत्य बाब अशी की पु. ल. सारखे विनोद करायचे. तेव्हा बरेचदा सुनीताबाई रागावयच्या. नेहमी मस्करी करण्यापेक्षा त्यांनी काही वेळा तरी गंभीर व्हावं, अशी त्यांची अपेक्षा असायची. शिवाय विनोद करण्यासाठी काही वेळा गंभीर व्हावं लागतं. त्यासाठीही चिंतन मनन करावं लागतं. याची जाणं एखाद्या सामान्य माणसांना नसणे हे पु. ल. समजू शकत होते, पण असा प्रश्न खुद्द बाबासाहेबांनीच विचारावा? हा त्यांचा गैरसमज त्वरित दुर करण्यासाठी ते म्हणाले, बाबासाहेब तुम्ही थोर इतिहासतज्ञ, शिवचरित्राचे गाढे अभ्यासक, अवघे शिवचरित्र तुम्ही श्रोत्यांच्या डोळ्यासमोर उभे करता. महाराज अमावश्येच्या रात्री गडावर कसे चालले? याचे दिवसा वर्णन करुन आपल्या सादरीकरणाने प्रसंग जीवंत उभा करता, त्यामुळे मी असा निष्कर्ष काढू शकतो. तुमच्या घरात सारखे युद्ध चालत असेल. निर्मलाबाई तुमच्या मागे लाटणं घेवून धावत आहेत आणि तुम्ही, नाही...नाही...नको...नको... म्हणतं या दालनातून त्या दालनात सारखा पळ काढतं असालं. या विनोदाने उपस्थितांना मेजवाणी तर मिळालीच पण खुद्द बाबासाहेब सुद्धा मनसोक्त हसले.

विनोदी जीवन जगणाऱ्या माणसाच्या जीवनात अनेक दु:ख असतात पण तो आपल्या दु:खाचे कधी भांडवल करत नाही. आपले दु:ख आपल्या उरात दाबुन दु:खाने उर भरुन आपली छाती छप्पन इंच करुन आपल्या चेहर्यावरील हास्य कधीच नष्ट होवू देत नाही. आपल्या संपर्कात येणार्या सर्वांना प्राप्त प्रसंगातून हसवण्याचा आणि त्यातून आनंद निर्मिती करण्याचा त्याचा प्रामाणिक प्रयत्न असतो. आपल्या संपर्कातील प्रत्येक माणूस तणावमुक्त व्हावा. हाच त्याचा शुद्ध, निर्मळ, प्रांजळ आणि प्रामाणिक हेतू असतो. पण मित्रहो, आपल्या तणावाचे भांडवल करणाऱ्या टेंशन मास्तरांचे नेमके काय करावे? तेच अनेकदा कळत नाही. बरं ते टेशनमध्ये आहेत का? असल्यास नेमके किती? याचे मोजमाप करण्याचे कोणतेही यंत्र विनोदी जीवन जगणार्या कोणत्याच माणसाजवळ नसल्यामुळे हा आपल्याला भेटल्यावर साधा 'टेंशन मास्तर 'आहे का? त्याची अवस्था टेंशनचा पारा चढून चढून पार 'टेंशन सम्राट' झाली आहे? काहीच कळायला मार्ग नसतो.

असाच आमच्या संपर्कातील संभाजीनगर शहरात राहणारा एक तुकाराम शिंदे नावाचा मित्र. एका नामवंत कॉलेजवर मराठीचा प्राध्यापक. संत वाङमयावर आपला खूप अभ्यास आहे, असा त्याचा दावा. त्यामुळे माझ्या वर्तनात खूप बदल झाला आहे असेही छातीठोकपणे तो सांगायचा. मला फोनवरुन बोलतांना नेहमी सांगायचा, तू हल्ली विनोदावर बरेच काही लिहत असतो. त्याने तणावमुक्ती होते. असा तुझा ठाम विश्वास आहे, पण संत साहित्यात जी ताकद आहे ती तुमच्या या फाजिल विनोदात नाही. तू एकदा संभाजीनगरला ये. मला तुझ्याशी खूप बोलायचं. संत साहित्य म्हणजे काय? माझ्याशी चर्चा केल्यावरच तुला कळेलं. बोलता बोलता संत साहित्याच्या या अभ्यासकाच्या वाणीतून शेवटी जो अंहकाराचा दर्प बाहेर आला. त्या क्षणी माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली. या महाविद्वानाकडे आपण जायचे नाही, हे मी ठरवून टाकले पण योगायोग असा की मध्यंतरी माझ्याकडे त्याने सहपरिवार भेट दिली. त्याच्याकडे आम्ही सर्वांनी यावे, असा त्या सर्व कुटुंबाचा आग्रह आणि त्यानंतरही फोन. त्यामुळे माझ्या कामानिमित्ताने मी एकदा संभाजीनगरला गेलो. माझ्या नियोजनानुसार माझी सर्व कामे आटोपून या संत तुकारामाची भेट घेण्यास निघालो. तशी पूर्व- कल्पना त्याला दिली होती. त्याच्याकडून यथासांग स्वागत झाले. रात्रीचे जेवण झाल्यावर बाहेर जावून थोडे चालावे आणि चालत चालत काही बोलावे. ते शक्य झाले नाही तर परम मित्र तुकाराम कडून बरेच काही ऐकावे. संत साहित्याच्या गाढ्या अभ्यासकाच्या सहवासात मी होतो. याचा मला सार्थ अभिमान होता. तुकाराम सांगू लागला, संताच्या पायाखाली एखादी मुंगी जरी आली आणि तिचा मृत्यू झाला तरी व्यथित होणारं मन त्यांच्याजवळ असतं आणि आपण स्नान करण्यासाठी स्नान गृहात गेलो.तिथे आपल्याला मुंग्याची रांग लागलेली आहे असे दिसले तरं लगेच आपण बादलीभर पाणी घेतो आणि स्नानगृह स्वच्छ करतो आणि त्या मुंग्यासाठी महापूर निर्माण करतो. या आपल्या कृतिने आपण किती मुंग्यांची हत्या करत असतो. तरीही या आपल्या अन्यायी अत्याचारी वृत्तीने आपण कधी दु:खी होतो का? या आपल्या अमानुष वर्तनावर संत साहित्यात जे उत्तर आहे, ते इतर साहित्यात आहे का? तुमच्या विनोदी साहित्यात तर मुळीच नाही. तो संत साहित्यावर त्याचे खूप आग्रही मत मांडत होता. त्यामुळे त्याच्याशी संवाद करण्या ऐवजी मी उत्कृष्ठ श्रोता होणे पसंत केले. त्याचे एकतर्फी बोलणे सुरु होते. मी आपला वा.. वा.. बहोत अच्छे.. क्या बात है। असे सर्व सुरु होते. काय करणार? आलीया भोगासी असावे... अशी माझी अवस्था सुरु होती. बरे त्यात विनोदाला कुठेही वाव नव्हता. कारण या तुकारामाच्या मते, विनोदी साहित्य म्हणजे अतिशय चिल्लर, थिल्लर, इतकेच नव्हे तर निव्वळ कचरा. हे सर्व विनोदी साहित्यिक गुढघाभर पाण्यात उड्या मारणारे. त्यांच्या विचारा आचारात कोणतीही खोली नाही. आम्ही कसे अथांग सागरात पोहन-रे. असे मत व्यक्त करुन स्वत:भोवती आत्मस्तुतीचे डोंगर उभे करण्याचे प्रयोग या तुकारामाचे सुरु होते. संत साहित्याच्या अभ्यासाने माणसात असा काही बदल होतो का? यावर माझे चिंतन सुरु झाले. मला माझ्या प्रश्नाचे उत्तर कसे मिळेलं यासाठी मी अस्वस्थ झालो होतो. त्याचे मात्र संत वाङमयावरचे अखंड प्रवचन सुरु होते. मी ते किती ऐकतोय किंवा ऐकतच नाही. याच्याशी त्याला काही फारसे देणेघेणे नव्हते.

एवढ्यात त्याचा एक मित्र आम्हाला रस्त्यात भेटला. त्याचा स्वभाव विनोदी असल्याने त्याला जरा तुकारामची विकेट घेण्याची लहर आली.तो म्हणाला, काय शिंदेसर परवा रात्रीला जरा जास्तच... अहो, तुम्ही एकदम राजासारखे डुलत.. डुलत चालले होते. नंदीबैलाचीच चाल धरली होती तुम्ही. मला वाटलं की, तुम्हाला पोहचून द्यावं लागते काय घरी. अहो, जरा हिशोबा हिशोबानं घ्यायची नं राजेहो...असं म्हणून तो हसायला लागला. पण आमचा संत तुकाराम मात्र एकदम रागानं लालं झाला. त्याच्या डोळ्यातून अंगार फुलतं होता. ओठ थरथर हालत होते. त्याने त्या अवस्थेत बोलायला सुरुवात केली, तुम्हाला काय वाटते, त्या रात्री मी पिलो होतो. तुम्हाला काय माहित आहे. त्या रात्री मी किती टेंशनमध्ये होतो? कोणाचे काय प्राब्लेम असतात तुम्हाला काय माहित आहे? अन् एक गोष्ट लक्षात घ्या, मी आतापर्यंत चार माणसांना ठोकून काढलं आहे. ते कोणत्या पदावर आहेत. कोणत्या जातीचे आहेत. याचा विचार केला नाही. आपलं कोणीच काही वाकडं केलं नाही. करु शकणार नाही. अन् आपल्याला त्याचा काहीच पश्चाताप नाही. तो मित्र थोडा सावध झाला आणि म्हणाला, अहो, शिंदेसर मी थोडी मजाक केली हो तुमची. आपण नेहमीच असं बोलतो. राजेहो, पण आज तुम्ही एवढं गरम होण्याच कारण कायं? तुम्ही तर अप्रत्यक्ष इशाराचं दिला, तुम्ही मलाही मारु शकता म्हणून. परत आमचा तुकाराम, मी काहीही करु शकतो. त्या लोकांना मारल्याबद्दल मला पश्चाताप नाही. आणखी कोणी माझ्या चपक्यात आला तर त्यालाही सोडणार नाही. तो त्याचा मित्र काहीही न बोलता निघून गेला.

(पान ६ वर)

# रवींद्रनाथ टागोर: वारसा आणि कार्य

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

(भाग ७)

शिक्षण कसे असावं याबद्दल टागोरांच्या स्वतःच्या कल्पना होत्या. जीवन आणि शिक्षण या दोन्ही गोष्टी हातात हात घालून चालल्या पाहिजेत असं त्यांना वाटत होतं. एखाद्या उद्यानात फेरफटका मारणं, तेथील शीतल हवेचा स्पर्श, फुलांचा सुगंध, एखाद्या नदीच्या खळाळत्या पाण्यात डुंबण्याचा आनंद, त्या पाण्याच्या स्पर्शाची शरीराला होणारी जाणीव, एखादं गाणं म्हणण्याचा किंवा ऐकण्याचा आनंद या सगळ्या गोष्टी आपण जेवढ्या आनंदानं आणि सहजपणे करतो, तेवढ्याच आनंदानं आणि सहज-तेनं मुलांना शिकता यावं असं त्यांना वाटे. मलयानील, दक्षिणेकडील वारा मुलांना शिकवताना आधी मुलांना तो वारा प्रत्यक्ष अनुभवायला लावणे, नंतर भूगोलाच्या तासाला तो पाठ शिकवला जाई.

नदी, समुद्र, सूर्योदय, सूर्यास्त, चंद्रोदय या गोष्टी प्रत्यक्ष दाखवणं आणि नंतर त्यासंबंधीची माहिती मुलांना सांगणं हे त्यांच्या कल्पनेतील शिक्षण होतं. मुलांनो, काल आपण नदीवर गेलो होतो. ही नदी कुठून कशी वाहते, तिच्या काठावर कोणकोणती गावं आहेत, ती कुठल्या समुद्राला जाऊन मिळते हे आपण आता पाहू या... असं वर्गात म्हटलं की नदी केवळ भूगोलाच्या पुस्तकात न राहता सजीव होई आणि मुलांच्या मनात कायमची जाऊन बसे. सूर्य आपल्याला जसा रोज नवीन प्रकाश, ऊर्जा देतो तसाच ज्ञानाचा नवीन प्रकाश, ऊर्जा शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना दिली पाहिजे असं त्यांना वाटे. सूर्याकडून आपण जशी रोज प्रकाशाची अपेक्षा करतो, तसेच विद्यार्थी सुद्धा शिक्षकाकडून करतात. असं करताना शिक्षकाला स्वतःच्या वैयक्तिक अडचणी, सुखदुःखें निश्चितपणे असू शकतील, पण विद्यार्थ्यांचं ते कळण्याचं वय नसतं. त्यांना आपल्या शिक्षकांनी आपल्याला रोज काहीतरी नवीन सांगावं अशी अपेक्षा असते आणि शिक्षकांनी सुद्धा ती पूर्ण करायला हवी. रवींद्रनाथांची शाळेची कल्पना आपल्या प्रचलित शाळेच्या कल्पनांना आजही छेद देणारी आहे. हे सगळे वाचल्यावर कुणाला असं



वाटू शकेल की रवींद्रनाथांची शाळा म्हणजे अशीच शिस्त नसलेली, मुले कशीही वागताहेत आणि मौजमजेत काळ चालला आहे असे ठिकाण असावं. पण आपल्याला असं वाटत असेल तर आपण चुकतो आहोत. केवळ शिस्त आणि धाकदपटशा म्हणजे शाळा नव्हे. केवळ आनंद आणि मौजमजा म्हणजेही शाळा नव्हे. शाळा म्हणजे असे ठिकाण की जेथे ज्ञान आणि मनोरंजन, स्वातंत्र्य आणि स्वयंशिस्त, सौंदर्य आणि उपयुक्तता, समर्पण आणि सेवाभाव, ज्ञानाची श्रीमंती आणि मनाची श्रीमंती यासारख्या अनेक गोष्टी हातात हात घालून चालताहेत. शिकायला येणारी मुलं मुक्त मनानं शिकली पाहिजे. आनंद हा त्यांचा स्थायीभाव असला पाहिजे असे रवींद्रनाथांना वाटत असे. धाक आणि विकास या गोष्टी एकत्र नांदू शकत नाहीत असे त्यांचे मत होते.

शिकण्यासह सगळी कामं आनंदात गात गात सहज होऊन जातात. पंढरीच्या वाटेवरील वारकरी विठुरायाच्या नामस्मरणात, भजनात तल्लीन होऊन जातात. त्या भजनात आणि टाळ मृदूंगाच्या नादात चालताना पंढरी किती दूर आहे, वारा, ऊन, पाऊस आहे का यासारख्या गोष्टी त्यांच्या मनात येऊन त्यांचं मन विचलित होत नाही. पांडुरंगाच्या दिशेने होणारी त्यांची वाटचाल केवळ आनंदाची होऊन जाते. वारी म्हणजे जीवन जगण्याचं तत्वज्ञान साध्या सोप्या पद्धतीनं प्रत्यक्ष उलगडून दाखविणारी पाठशाळाच आहे. त्यांच्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थी सेवा, त्याग आणि नवनिर्मिती करण्यात आनंद मानत होता. शिक्षण घेता घेता हातामध्ये झाडू घेऊन शाळेची, परिसराची साफसफाई करणे, शाळेच्या विविध उपक्रमांमध्ये भाग घेणे, त्यासाठीची तयारी करणे, आपल्या हातांनी आश्रमासाठी म्हणजेच शाळेसाठी उपयोगी वस्तू तयार करणे, त्यातूनच जीवनोपयोगी कलाकौशल्य प्राप्त करणे यासारख्या अनेक गोष्टी शिकत होता. त्यातूनच श्रमाची प्रतिष्ठा जपली जात होती. आमच्या प्रचलित शिक्षणपद्धतीत विद्यार्थी जसजसा शिकून मोठा होतो, तसतशी श्रम करणे ही गोष्ट त्याला कमीपणाची वाटू लागते.

आपलं शिक्षण त्याचं बालपण हरवून घेतं, लहानपणीच शिस्तीच्या नावाखाली त्याला प्रौढ बनवतं. आम्ही त्याला केवळ मार्कांच्या शर्यतीत पुढे धावायला लावतो. पण गुणांच्या, जीवनमुल्यांच्या शर्यतीत तो मागे पडतो. आपल्याकडे सण उत्सवानिमित्त गावोगावी यात्रा भरतात. या यात्रा किंवा जत्रांना धार्मिक अधिष्ठान असतं. रवींद्रनाथांनी आपल्या शाळेत पौष जत्रा म भरवायला सुरुवात केली. जत्रांचं धार्मिक अधिष्ठान काढून टाकून त्या जागी निसर्गाची प्रतिष्ठापना केली. वृक्षारोपणाचा उत्सव सुरु झाला की त्यात बाल तरूची पालखी निघायची. त्यासाठी रवींद्रनाथांनी सुंदर सुंदर गाणी लिहिली. शाळेच्या परिसरात अशा झाडांची लागवड व्हायची. तीही समारंभपूर्वक! त्या झाडांशी, लतावेलींशी केवळ विद्यार्थ्यांचेच नव्हे तर शाळेतील शिक्षकांचे, त्यांच्या कुटुंबियांचे नाते जुळायचे. तुकोबांच्या अभंगातील वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे हे तिथे प्रत्यक्षात आले होते.

महान कवी आणि नोबेल पुरस्कार विजेता असलेले रवींद्रनाथ कितीही महत्वाच्या कामात असले तरी आपल्या विद्यार्थ्यांसाठी वेळ काढत असत. छोट्या मुलांच्या वर्गावर जाऊन शिकवत. काय शिकवायचं त्याच्याही नोट्स काढत. लहान मुलांनी दिलेली उत्त-रे, त्यांची गाणी आवर्जून ऐकत. त्यांच्या प्रश्नांचं समाधान करीत. त्यांच्याबरोबर गाणी म्हणत, नाटकात भाग घेत. या सगळ्या गोष्टी करण्यात त्यांना कोणताही कमीपणा वाटत नव्हता. मी एवढा मोठा कवी, मग मुलांबरोबर कसा खेळू असा प्रश्न त्यांना कधीही पडला नाही.

टागोरांच्या शाळेबद्दल कुणीतरी एका जाणकार व्यक्तीने फार सुंदर उद्गार काढले आहेत. ते म्हणतात, शांतिनिकेतन ही रवींद्रनाथांची ढरपसळलश्रश झेशा आहे. कविता ही अमूर्त असते. त्यातील गोष्टींना आपण स्पर्श करू शकत नाही. पण शांतिनिकेतन म्हणजे म मूर्तिमंत काव्य. ते तुम्ही प्रत्यक्ष अनुभवू शकता. टागोरांच्या शाळेत दिलं जाणारं ज्ञान प्राचीन, अर्वाचीन, ऐतिहासिक, भौगोलिक अशा वेगवेगळ्या प्रकारात बसणारं नाही. ते एकजिनसी, आनंददायी आणि अनुभूतीतून आलेलं आहे. बुद्धदेव बसू हे बंगालमधील थोर साहित्यिक आणि विचारवंत होते. ते शांतिनिकेतनबद्दल बोलताना म्हणतात की शांतिनिकेतन म्हणजे शब पेयेछिर देश. शब पेयेछिर म्हणजे जिथं सगळं काही मिळतं, कशाचीही उणीव राहत नाही असा देश, असं ठिकाण. यापेक्षा शांतिनिकेतचं वर्णन करणारे सुंदर उद्गार कोणते असू शकतील? (क्रमशः)

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

**(रविवार, २८ जुलै ते शनिवार, ३ ऑगस्ट २०२४)**

**नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर**

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

* **रविवार, २८, जुलै-** कलाष्टमी, निर्सग संवर्धन दिन * **सोमवार, २९, जुलै-** आंतरराष्टीय व्याघ्र दिन * **मंगळवार, ३०, जुलै-** श्री गंगामाई यात्रा वडवळ (बेळगाव), दशमी श्राध्द * **बुधवार- ३१, जुलै-** कामिका एकादशी, एकादशी श्राध्द, दुर्गानंद महाराज पुण्यतिथी तासगाव, आळंदी निर्मळ यात्रा, नाना शंकरशेठ पुण्यदिन, छत्रपती राजाराम महाराज जयंती * **गुरूवार- १, ऑगस्ट-** प्रदोष, लोकमान्य टिळक पुण्यतिथी, द्वादशी श्राध्द, लोकशाहिर अण्णाभाऊ साठे जयंती, नित्यानंद स्वामी पुण्यतिथी गणेशपुरी * **शुक्रवार- २, ऑगस्ट-** शिवरात्री, श्री संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा, अश्लेषा रवि (वाहन गाढव) * **शनिवार- ३, ऑगस्ट-** श्री संत सावता माळी पुण्यतिथी, चतुर्दशी श्राध्द, स्वयंज्योती मुळे महाराज पुण्यतिथी सातारा, दुपारी ३: ५० नंतर अमावास्या.

**मुहूर्तः-** * **साखरपूडा-** ३१ जुलै * **बारसे-** ३१ जुलै (१६ नंतर) * **जावळ-** २८ जुलै (१२ पर्यंत), १ ऑगस्ट (१० पर्यंत) * **गृहप्रवेश-** २८ जुलै (१२ पर्यंत), २१ जुलै, १ ऑगस्ट (१० पर्यंत)

### मेष- विवंचनेतून मार्ग निघेल

माणूस एकाच कारणामुळे एकटा पडतो. आपल्या माणसाला सोडण्याचा सल्ला परक्या माणसाकडून घेतो. या सप्ताहात आर्थिक विवंचनेतून मार्ग निघेल. चिकाटीने केलेली वाटचाल निश्चितच शुभ फलदायी ठरणार आहे. गृहनिर्माण, कृषि, ज्ञानदान, बॅंक, विमा क्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. संततीची अभिमानास्पद प्रगती होईल. अनावश्यक खर्च टाळावेत. फार दगदग करू नका. शुभ ता. २८, ३१

### वृषभ- अपेक्षीत घटना

जीवनात कोणी रूसलं तर त्याला लगेच मनवा. जिद्दीच्या लढाईत नेहमी दुरावाच जिंकतो. राशी स्वामी शुक्र चतुर्थात बुधासह आहे. त्यामुळे स्वास्थ लाभेल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. उताविळपणा टाळावा. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. घरात शुभ कार्य घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. सुसंधीचा लाभ उठवावा. उपेक्षीत घटना घडतील. शुभ ता. २८

### मिधुन- कला गुणांचा विकास

माणसं ओळखण्यात झालेली चूक हेच आपल्या आयुष्यात आलेल्या दुःखाच मोठं कारण असतं. व्ययस्थानी मंगळ, हर्षल, गुरूसह आहेत. धनस्थानी रवि असल्याने महत्त्वाचे व्यवहार विचारपूर्वक करावेत. उपजत कला-गुणांचा विकास होईल. नवीन बदल घाईत करू नका. सरकारी कामे मार्गी लागतील. शुभ ता. २८, ३१

### कर्क- चिंता नको

वेळेला वापरून घेणारी लोक कधी आपली नसतात. लाभस्थानातील गुरू, मंगळामुळे अर्थिक स्थिती समाधानकारक राहील. शारीरिक तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. धनस्थ बुध, शुक्रामुळे महत्त्वाचे व्यवहार मार्गी लागतील. गायन, वादनादि कलेला प्रोत्साहन मिळेल. नव्या संधींचा लाभ उठवावा. आत्मविश्वासाने रहावे. प्रगती होत जाईल. चिंता नको. शुभ ता. २८

### सिंह- उत्साहवर्धक घटना

आनंदात वचन देऊ नका. रागात उत्तर देऊ नका. सुखामध्ये निर्णय घेऊ नका. अष्टमात राहू, नेपच्यून असल्याने वरील त्रिसूची ध्यानी घेऊन वाटचाल करावी. कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. महत्त्वाचे बदल सध्या करू नका. अनावश्यक खर्चाचे प्रसंग टाळावेत. आनंददायी घटना घडतील. समस्यांतून मार्ग निघत जाईल. अनुकूलता वाढेल. शुभ ता. २८

### कन्या- सामंजस्याने रहावे

जे आपल्याशी बोलायला इच्छुक असतात. अश्यांशी जरूर बोलावे. राशी स्वामी बुध व्ययात शुक्राशी युतीत आहे. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होत जाईल. स्पर्धामध्ये यश मिळेल. राजकारणात आपले प्यादे पुढे सरकले जाईल. तयारीला लागावे. सर्व परिस्थीतीत सामंजस्याने रहावे. वितंडवादाचे प्रसंग टाळावेत. भाग्यवृध्दिंगत करणाऱ्या घटना घडतील. अडचणी सुटत जातील. शुभ ता. ३१

### तुला- नव्या विचारांना चालना

एकदा विश्वासघात केलेल्या माणसांवर पुन्हा विश्वास ठेवायचा नसतो. लाभस्थानी शुक्र, बुध असल्याने आर्थिक बाबतीत आता चिंता करू नका. शिक्षण, अनुभवातून प्रगती साधता येईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. प्रशासन सेवेत अनुकुलता वाढेल. शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. नव्या विचारांना चालना मिळेल. सर्व व्यवहार विचाराने करावा. शुभ ता. ३१

### वृश्चिक- सामंजस्याने रहावे

पाठीवर खंजीर खुपसणार्या व्यक्तीला पुन्हा पाठीवर हात ठेवू देवू द्यायचा नसतो. कर्मस्थ बुध, शुक्रामुळे कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने रहावे. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात अडचणीतून मार्ग निघत जाईल. प्रकृतीस जपावे. शुभ ता. २८

### धनु- कला-गुणांचा विकास

पोटची पोरे जेव्हा कर्तव्याकडे पाठ फिरवतात, तेव्हा वडिलांना म्हातारपण जीव घेण वाटायला लागतं. सुखस्थ राहू, नेपच्यूनमुळे कोणत्या ना कोणत्या कारणावरून अस्वास्थ राहिल. पोटाच्या तक्रारींची दखल घ्यावी. अडचणीतून मार्ग निघत जाईल. कला-गुणांचा विकास होईल. नव्या संधीचे स्वागत करावे. शुभ ता. २८

### मकर- नव्या संधी लाभतील

माणसांन गुलमोहरासारखं जगावं, भर उन्हातही फुलता आलं पाहिजे. अष्टमातील बुध, शुक्रामुळे अडचणीतून वेळीच मार्ग निघत जाईल. चिकाटीने रहावे. मनासारखी प्रगती होत जाईल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता वाढेल. नव्या कामांना गती मिळेल. खर्चाचे नियोजन करून निर्णय घ्यावेत. नव्या संधी लाभणार आहेत. अपेक्षीत घटना घडतील. वेळेचा सदुपयोग करावा. शुभ ता. २८

### कुंभ- परिश्रमाची गरज

आयुष्यात दुःख, वादळं, संकटं अनेक येतील पण त्या सर्वांशी लढता आलं पाहिजे. राशीत शनि तर चतुर्थात मंगळ, हर्षल, गुरू समवेत आहे. चार पाऊले पुढे तर दोन पाऊले मागे पडतील. उद्दिष्ट गाठण्यासाठी अधिक परिश्रमाची गरज आहे. विलंबाने पण मनासारख्या घटना घडतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. विचाराने रहावे. अपेक्षीत संधी विलंबाने लाभतील. शुभ ता. ३१

### मीन- उत्साहवर्धक घटना

फुलासारखं फुलता आलं पाहिजे, तरचं आयुष्य सुंदर होईल. राशीत राहू, नेपच्यून असल्याने थोडे अस्वास्थ राहिले तरी उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या कामांना गती देता येईल. आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या संधी लाभणार आहेत. सरकारी कामे मनासारखी होतील. कामाचा व्याप वाढणार आहे. शुभ ता. २८, ३१

!! शुभं भवतु !!

**दादर परिसरात तेव्हा मोडक इंजिनीयर यांचा बंगला प्रसिद्ध होता. हे मोडक इंजिनीयर नेमके कोण होते, त्यांचं काम, याबद्दल आजच्या पिढीला माहिती असणं कठीणच आहे. पण आजची मुंबई या एका माणसामुळे पाणी पिऊ शकते एवढं एक वाक्य सांगितलं तरी मोडक या माणसाच्या कर्तृत्वाची पुरेशी कल्पना येईल. 'उद्यम' ह्या मोडक इंजिनीयरच्या बंगल्यावरून जाताना कृतार्थ आणि कृतज्ञ वाटतं आणि हात जोडले जातात. खरंच, तेथे 'कर माझे जुळती' असं म्हणावं अशा माणसाचं अस्तित्व एकेकाळी त्या बंगल्यात होतं.**

स्मरण

द्वारकानाथ संझगिरी

# ...तेथे कर माझे जुळती



जवळपास रोज संध्याकाळी शिवाजी पार्कला जाताना मी 'उद्यम' नावाच्या एका बंगल्यावरून जातो. माझ्या लहानपणापासून तो बंगला आमच्या शिवाजी पार्कमधे मोडक इंजिनीयरचा बंगला म्हणून प्रसिद्ध आहे. लहानपणी कोण हे मोडक इंजिनीयर हा प्रश्न मनात यायचा. माझ्या वडिलांनी ह्य प्रश्नाचं उत्तर मला एका वाक्यात दिलं होतं, ''अरे तू रोज वैतरणाचं पाणी पितोस ना, ते ह्यांच्यामुळे.'' त्या वेळी वैतरणा हा मुंबईपासून साधारण पाऊणशे मैलावर एक तलाव आहे. तिथे धरण आहे आणि त्या धरणाचं पाणी मुंबईत येतं एव्हढंच मला कळलं होतं. इंजिनीयर व्हायचं बीज माझ्या मनात रुजलं ते मोडकांच्या कानावर पडत असलेल्या नावामुळे!

दोन दिवस इलेक्ट्रिकल इंजिनीयरिंगला बसल्यावर मला पटलं की 'करंट' आपल्याला दिसत नाही. दिवा पेटल्यावरच आपण म्हणतो, ह्य वायरमध्ये करंट आहे. इमारत, पूल, धरण उभं राहताना कसं दिसतं, जाणवतं. त्यामुळे सिव्हिलला गेलो. बरं हा बाळबोध विचार करून मी सिव्हिलला गेलो होतो. शिवाजी पार्क ही लहान लहान मुलांच्या मनात विविध बिया पेरणारी एक विलक्षण जागा आहे. मोडकांनी, त्यांच्या गच्चीवजा पोर्चवर उभं राहून 'ए सुभाष' अशी हाक मारली असती, तरी ती समोरच्या गल्लीत राहणाऱ्या सुभाष गुप्तेला ऐकू आली असती. 'Warne may be latest, but Subhash Gupte was greatest', असं साक्षात सर गारफिल्ड सोबर्स बोललाय. ह्यवर सुभाष गुप्ते काय दर्जाचा फिरकी गोलंदाज होता ह्यची कल्पना येईल. सुभाष गुप्तेच्या समोर राहणाऱ्या संदीप पाटीलनेही मोडकांच्या बंगल्यावरून थ्रो केला असता, तर जिथे प्रबोधनकार आणि बाळासाहेब ठाकरे राहात होते तिथे पोहोचला असता किंवा त्या उद्यम बंगल्यावर कुणी रात्रीच्या शांततेच्या वेळी जयोस्तुते म्हटलं असतं तर त्या बंगल्याच्या उजवीकडे एक गल्ली सोडून राहणाऱ्या स्वा. सावरकरांना ते ऐकायला आलं असतं. विविध क्षेत्रांतली टॉपची मंडळी इतक्या एकमेकांच्या जवळ राहात होती. म्हणून मी म्हटलं, नुसतं तिथून फिरताना मुलांवर चांगले संस्कार होऊ शकतात. त्या विभागात जे कॉन्क्रीटचे रस्ते आहेत, मुख्य म्हणजे वर्षो न् वर्ष टिकलेले रस्ते आहेत ते मोडकांच्याचमुळे!

अचानक मोडकांबद्दल मला लिहावंसं वाटलं, त्याला अनेक कारणं आहेत. नव्या पिढीला त्यांची माहिती कमी आहे. इतिहासाबद्दल, तो जोपासण्याबद्दल आपल्याला प्रेम नाही. राजकीय मंडळी इतिहास त्यांच्या स्वार्थापुरता वापरतात.

जगन्नाथ शंकरशेट ह्य महान व्यक्तीची मुंबईसाठी केव्हढी मोठ्ठी कॉन्ट्रिब्युशन आहे! रेल्वे, व्हीटी स्टेशन, म्युझियम, जेजे स्कूल ऑफ आर्टस, राणीबाग. ह्य माणसाने मुंबईचं एक वेगळंच स्वप्न पाहिलं आणि स्वप्नपूर्तीच्या दिशेने पावलं टाकली. त्यांच्या नावाच्या पुलावरून जाताना आजच्या पिढीला त्यांच्याबद्दल संस्कृतची स्कॉलरशिप सोडली, तर फार काही माहीत नसतं. हे त्यांच्यापेक्षा आपलं दुर्दैव आणि दारिद्र्य आहे. तसंच थोडं मोडकांचं आहे. वैतरणा तलावाला मोडकसागर म्हणतात, पण मोडकांचं कॉन्ट्रिब्युशन फार थोड्या मंडळींना ठाऊक आहे. त्यांना नानासाहेब म्हणत. त्यांचं नाव नारायण! ते अभ्यासात हुशार होते हे सांगायची गरज नाही. पण आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे कधी गरीब विद्यार्थी फंडातून मदत घेऊन तर नंतर काणे स्कॉलरशिप मिळवून ते मॅट्रीक झाले. मॅट्रीकमध्ये चांगले गुण मिळाल्याने पुण्याच्या फग्र्युसन कॉलेजमध्ये प्रवेश त्यांना स्कॉलरशिपसह मिळाला. पुढे पुण्याच्या इंजिनीयरिंग कॉलेजमधून ते १९११ साली बी.ई. झाले. मग सरकारी नोकरी, पण त्यानंतर त्यांची पडणारी पावलं ही वामनाची पावलं होती. माथेरानच्या पाणीपुरवठ्याची सूत्रं त्यांच्या हातात आल्यावर त्यांनी तिथल्या प्रसिद्ध शारलॉट लेकमध्ये ऐन पावसाळ्यात पाइपलाइन टाकली. मी पावलं वामनाची का म्हणतो, कारण एक सरकारी कर्मचारी असून कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी कुठच्या कुठे भरारी मारली. त्यांच्या बुद्धीचे पंख हे गरुडाचे होते. त्यामुळे त्यांना जमूनही गेले.

भारत सरकारची स्कॉलरशिप मिळवून ते इंग्लडला गेले. पण परदेशात जाण्यापूर्वी त्यांनी डॉ. टर्नर ह्यंच्या हाताखाली देशातल्या कितीतरी मोठमोठ्या शहरातला पाणीपुरवठा आणि सांडपाण्याची कामं केली. इंग्लंडमधली त्यांची स्कॉलरशिप फक्त दोन वर्षांची होती, पण तिथल्या प्रायर ह्य इंजिनीयरने त्यांची स्कॉलरशिप एका वर्षानं वाढवली. अर्थात त्या वेळी इंग्लडमध्ये राहाणं म्हणजे सुखसोयीत लोळणं नव्हतं. ते समुद्राजवळील हेस्टिंग नावाच्या गावात राहात. १९१८ ते २१ची गोष्ट आहे. त्या वेळी तिथे गावात वीज आलेली नव्हती. घरात बाथरूम नसे. सार्वजनिक स्नानगृहात जाऊन आंघोळ करावी लागे. प्रवास ट्राम आणि घोडागाडीचा होता. पण तिथे त्यांना पाणीपुरवठा, पूलबांधणी, रस्ते बांधणे, ड्रेनेज वगैरे सिव्हिल इंजिनीयरिंगमधल्या वेगवेगळ्या कामाचा अनुभव मिळाला. त्यांना स्वतंत्र अधिकारसूत्रे दिल्यामुळे थोडक्यात जबाबदारी टाकल्याने त्यांची बॅग अनुभवाने भरून गेली. तिथून परतल्यावर अनुभवाच्या बॅगा कस्टमसुद्धा अडवू शकत नाहीत किंवा त्यावर ड्युटी लावू शकत नाहीत. उलट परदेशातून अनुभवाची पुंजी घेऊन आल्यामुळे चक्रवाढ व्याज मिळतं. नानासाहेबांना ते मिळालं. ते जी.आय.पी. रेल्वेत एक्झिक्युटिव्ह इंजिनीयर झाले. आजच्या सरकारी भाषेत सांगायचं तर कार्यकारी अभियंता! त्या वेळी रेल्वे खासगी होती, पण हिंदी माणूस रेल्वेत एकदम कार्यकारी अभियंता झाल्याचं ते पहिलं उदाहरण होतं.

तिथून त्यांच्या कारकीर्दीचा आलेख फक्त वरच चढत गेला. जिथे जिथे त्यांनी काम केलं, तिथे तिथे त्यांनी आपला ठसा असा उमटवला की पुढच्या पिढय़ा त्यांना दुवा देतील. रेल्वेत असताना रेल्वेसाठी दौंड, पुणे, कल्याण, भुसावळ, जुन्नर वगैरेंच्या पाणीपुरवठा योजना केल्या. कल्याणच्या ड्रेनेजचं काम करून त्यांनी कल्याणचं कल्याण केलं. माणसाला पाणी प्यायला देणे अतिशय पवित्र काम आहे. पाण्याला उगाचच जीवन म्हणत नाहीत. आणि ज्यांनी पाण्यासाठी पायपीट केली आहे, पाण्याने भरलेल्या कळशा उचललेल्या आहेत, त्यांना नळाला पाणी येण्याचं सुख आणि पावित्र्य समजू शकतं. रेल्वेतून त्यांनी मुंबई महानगरपालिकेत जवळपास रेड कार्पेटवरूनच 'एन्ट्री' घेतली. मुंबई महानगरपालिकेचे पहिले भारतीय कमिशनर अर्देसर यांनी त्यांना अर्ज करायला सांगितलं. त्या वेळी महानगरपालिकेत, पारशांचं वर्चस्व होतं. तरी मोडकच डेप्युटी सिटी इंजिनीयर झाले. आणि नंतर १९३२ पासून ४७ पर्यंत ते सिटी इंजिनीयर होते. महानगरपालिकेतही त्यांना रेड कार्पेटवरून जमिनीवर पाय ठेवायला लागलाच नाही. १९४८ साली स्वराज्यानंतर ते चार महिने महापालिका आयुक्त झाले, पण मग सरकारची भूमिका होती की आयुक्त हा आयसीएस (आता आयएएस) असावा. मग काय करायचं? खास कायदा करून स्पेशल इंजिनीयर म्हणून त्यांची नियुक्ती केली गेली.

**महानगरपालिकेच्या इतिहासात असं दुसरं उदाहरण नसावं.**

आणि मग त्यांनी मुंबईला अद्ययावत शहर बनवायला सुरुवात केली. दादर सुवेज डिस्पोजल स्कीम त्यांचीच. महामुंबईचा मास्टर प्लॅन त्यांचाच! आणि सर्वात महत्त्वाची म्हणजे वैतरणा-तानसा पाणी योजना. मुंबईहून ७५ मैलांवर असलेल्या वैतरणा नदीवर धरण बांधणे आणि तिथून तानसा तलावाद्वारे थेट अशा दोन मार्गांनी पाइप्स टाकून मुंबईत पाणी आणणे. वैतरणा धरण हे भारत स्वतंत्र झाल्यावर मुंबई महानगरपालिकेने बांधलेलं धरण होतं. त्यात नानासाहेबांचा वाटा सिंहाचा! आता धरण बांधायचं म्हटलं की, जगभरातून भरपूर पैसे घेऊन धरण बांधण्याचं ज्ञान वाटायला कन्सल्टंट तयार असतात. तेव्हा योजना मोडकांनी तयार केली आणि त्यात काही त्रुटी राहू नये म्हणून ते 'स्वखर्चाने' युरोपला गेले आणि तिथल्या तज्ज्ञांशी विचारविनिमय करून आले. 'स्वखर्चाने' हा शब्द लक्षात ठेवा. सिव्हिल इंजिनीयरिंगचे शहेनशहा सर विश्वेश्वरय्यांनीसुद्धा मोडकांच्या स्किमचं कौतुक केलंय. बरं हा उद्योग करत असताना, त्यांनी चंदिगढ आणि उज्जन शहरांचा पाणीपुरवठा आणि सांडपाण्याच्या योजना तयार केल्या होत्या.

सामान्य माणसाला पाणी देणं ही त्यांची जीवननिष्ठा असावी असं वाटतं. पण नानासाहेब जेव्हा हे कार्य निष्ठेने करत होते तेव्हा नियती वैयक्तिक आयुष्यात, त्यांच्या तोंडचं पाणी पळवत होती. त्यांनी त्यांच्या ऐंशी वर्षांच्या आयुष्यात घरचे किती मृत्यू पाहिले असावेत? त्यांचे आईवडील गेले तेव्हा ते ३४ वर्षांचे होते. त्यांच्यावर भावंडांची जबाबदारी होती. त्यांची दोन भावंडं लहानपणी गेली. नंतर त्यांच्या लग्न झालेल्या तीन बहिणी एकापाठोपाठ एक गेल्या. त्यांचा लाडका भाऊ विष्णू संधिवाताने १५व्या वर्षी गेला. त्यांची स्वत:ची तीन मुलं गेली. पण प्रत्येक वेळी मनावर दगड ठेवून त्यांनी कारकीर्दीत पुढचं पाऊल टाकलं.

मोडकसाहेबांवर महानगरपालिकेतून निवृत्त झालेले डेप्युटी म्युनिसिपल इंजिनीयर मनोहर सोहनी 'वैतरणेचे सुपुत्र' असं छोटेखानी चरित्र लिहीत आहेत. मला स्वत:ला ह्य स्तंभात नानासाहेब मोडकांबद्दल लिहावंसं वाटलं, कारण त्यांच्यामुळे मनात इंजिनीयर व्हायचं बीज पडलं होतं हा एक भाग आहेच. पण माझ्या सुदैवाने मीसुद्धा मुंबई महानगरपालिकेत पाणीपुरवठा खात्यात अनेक वर्षे कार्यरत होतो. शेवटी निवृत्त होताना प्रमुख अभियंता झालो. जसजसा अनुभव मला मिळत गेला, तसतसं नानासाहेबांनी वैतरणा धरण आणि स्कीम पूर्ण करताना, केव्हढं प्रचंड शिवधनुष्य पेलवलं, ह्यची कल्पना आली.

आता मुंबई महानगरपालिकेचं मध्यवैतरणा धरण आणि स्कीम उभी राहातेय. खरं तर जवळजवळ झालीए. मी प्रमुख अभियंता असतानाच त्यातल्या बऱ्याच कामांची सुरुवात झाली. अर्थात ह्यत माझा वाटा फक्त खारीचा होता. त्या वेळी मी त्या खुर्चीवर असणं हा नशिबाचाच भाग जास्त होता. नशिबाला कर्तृत्व मानायला मी तयार नाही आणि आता इंजिनीयरिंग ज्ञान पैशाच्या खनखनाटाबरोबर, तुमच्या ताटात येतं. मोडकसाहेबांच्या वेळी काळच वेगळा होता. माझं नशीब एव्हढंच की, मोडकसाहेब ज्या वाटेवर, त्यांची वामनाची पावलं उमटवत डौलाने चालले, त्या वाटेवर एक छोटंसं पाऊल ठेवण्याची संधी मला नशिबाने दिली. माझ्याबरोबरच्या सहकाऱ्यांनाही त्यांच्या भाग्याची जाणीव झाली असेल. त्यामुळे आज 'उद्यम' ह्य मोडक इंजिनीयरच्या बंगल्यावरून शिवाजी पार्कला जाताना कृतार्थ आणि त्यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे कृतज्ञ वाटतं आणि हात जोडले जातात. खरंच, तेथे 'कर माझे जुळती' असं म्हणावं अशा माणसाचं अस्तित्व एकेकाळी त्या बंगल्यात होतं.

स्रोत : लेखक : द्वारकानाथ संझगिरी

पान २ वरून

## महाराष्ट्रातील भक्ती चळवळ ...

जेव्हा माणसाच्या जीवनामध्ये दुःख येते, तेव्हा माणसाने खचून जाऊ नये. जेव्हा आनंदाचा क्षण असेल, तेव्हा मातून जाऊ नये, असा वास्तववादी विचार हेच संत मांडतात. **जगाच्या कल्याणा संताच्या विभूती। देह कष्टवीती परोपकारे ।।** प्रबोधन परंपरेचा हा मुख्य स्थायीभाव संत मोठ्या ताकदीने मांडतात. वेद, उपनिषद, स्मृती आणि श्रुती यातून दिशा देत आलेला भक्ती चळवळीचा हा अध्यात्म विचार सामान्य समाजाचे जीवन समृद्ध व्हावे, असा विचार करताना दिसतो. भक्ती चळवळीने समाजाला काय दिलं? तर, जेव्हा सर्व मध्ययुगीन कालखंडातील विविध मुसलमानी आक्रमणास चिरडले होते. सांस्कृतिक अस्मिता धोक्यात आली होती. सर्व महाराष्ट्रीयन समाज अनागोंदीच्या नावाखाली वेगवेगळ्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक दडपणाखाली दडपून टाकला जात होता. तेव्हा भक्ती चळवळीतील या संतांनी आपली सांस्कृतिक वैभव असणारी भारतीय संस्कृती टिकून ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य केले. एक प्रकारची आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली. सामान्य माणसाच्या जीवनाला आधार व अधिष्ठान निर्माण केले. महाराष्ट्रातील भक्ती चळवळ व वारकरी संप्रदायाचा विषय हाताळताना महाराष्ट्रामध्ये भक्ती चळवळीमध्ये प्रामुख्याने इतर संप्रदायाचाही मागोवा घेणे हे महत्त्वाचे ठरते. संतांनी ग्रंथ साकारताना उभी केलेली प्रतिमाने आणि रूपक यांचा विचारही खूप महत्त्वाचा वाटतो. संतांच्या अनुभवसंपन्न सिद्धहस्त लेखणीतून निर्माण झालेले ग्रंथ वाचताना मनाला एक वेगळ्या प्रकारचे सात्त्विक व वैचारिक भक्तीची अनुभूती देतो. भक्तीचा विचार असंख्य लेखकांनी वेगवेगळ्या विचारधारेतून उभा केलेला आहे. परंतु, वारकरी तत्त्वज्ञानाच्या, अध्यात्म अंगातून भक्ती चळवळ समजून घेणे, ही काळाची गरज आहे.

पान २ वरून

## सफर स्त्री-दिग्दर्शकांची

आंतरराष्टीय चित्रपट क्षेत्रात कार्यरत व वादग्रस्त विषयांवर चित्रपट बनवणाऱ्या दीपा मेहता, भारतात आपल्या चित्र-त्रयी 'फायर', 'अर्थ' आणि 'वॉटर' या चित्रपटांसाठी विख्यात आहेत. 'बॉलिवूड हॉलिवूड', 'मिडनाईटस२ चिल्डन' व 'फनी बॉय' हे त्यांचे अन्य चित्रपट. आपल्या शालीन व बुद्धिवादी सौंदर्यासाठी ख्यात अपर्णा सेन यांनी दिग्दर्शन क्षेत्रात स्पृहणीय कामगिरीअकेली आहे. आपल्या दिग्दर्शक म्हणून पहिल्याच चित्रपट '३६ चौरंगी लेन'साठी त्यांना सर्वोत्तम निर्देशकाचाअराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला होता. 'मिस्टर ॲन्ड मिसेसअअय्यर', '१५ पार्क ॲव्हेन्यू', 'सारी रात', 'सोनाटा', 'बलात्कारी' ही त्यांची इंग्रजी व हिंदी भाषेतील चित्रसंपदा. अर्थात त्यांनी बंगाली भाषेत अनेकानेक उत्तम चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. फराह खान, रीमा कागती, झोया अख्तर, गौरी शिंदे, भावना तलवार किरण राव, दिव्या खोसला कुमार, मेघना गुलजार, नंदिता दास, सई देवधर, तनुजा चंद्रा या सध्या विद्यमान असलेल्या व नवीन वाटा चोखाळणाऱ्या स्त्री-दिग्दर्शक. जाता-जाता, आपल्या केशभूषेसाठी विख्यात असलेल्या साधना यांनी 'गीता मेरा नाम' हा मसाला चित्रपट दिग्दर्शित करून आपल्या कलाकौशल्याची चुणूक दाखवली होती. स्त्री-दिग्दर्शक महिमा इती सुफल-संपूर्ण...! (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

पान ४ वरून

## भूमीमधील स्त्री जीवनावरील शैक्षणिक पडसाद

मैथिलीसारख्या संघर्षातून उभ्या राहिलेल्या आणि शिक्षणाच्या बळावर स्वतःचे अस्तित्व उभे केलेले तरुणीच्या अस्तित्वाचा धाक तिच्या नवऱ्याला म्हणजे शंतनू याच्या जीवनावर पडतो आणि तो न्यूनगंडाने पछाडतो. या दोघांनी एकमेकांना समजून घेत एकमेकांचा आसरा व्हावा, या उद्देशाने ते एकत्रित येतातही मात्र मैथिलीच्या अनेक प्रयत्नानंतरही शंतनू स्वतःच्या नकारात्मक वर्तुळातून पूर्णपणे बाहेर येऊ शकत नाही. यावरून स्वतःच्या जीवनाला सहारा देणारी असली तरी कर्तृत्ववान स्त्री सुशिक्षित समाजातील पुरुषांना स्वाभाविकपणे सहन करण्याची मानसिकता आजही नाही हे लक्षात येते. ठामपणे उभे राहता येते हे आशा बगे ह्यांनी आपल्या भूमी ह्या कलाकृतीतून दाखवले आहे.

पान ५ वरून

## आपल्या दुःखाचे वाकळ करू नका

मीही थोडावेळ स्तब्ध झालो. त्याचा रौद्र अवतार पाहून या संत साहित्याच्या अभ्यासकात किती संयम आहे? याचा मलाही चांगलाच अंदाज आला होता. त्या त्रयस्थ व्यक्तीने घेतलेली त्याची विकेट योग्य होती, असे मला मुळीच म्हणायचे नाही. पण, त्याला थोडे विनोदाने मिश्कील उत्तर देता आले असते. होय, मित्रा! त्या अगोदर दोन वेळा रात्री मी तुला घरी पोहचविले होते. त्यावेळेस तर तुला तुझ्या घराचा रस्ताच सापडत नव्हता. त्या उपकाराची तू एकदा परतफेड केली म्हणजे काय झाले? माझा मित्र म्हणून तुझे ते कर्तव्यच आहे. मला वाटते विनोदी साहित्याच्या अभ्यासाने ही समज त्या व्यक्तीत येते. इथे प्रामुख्याने आपल्याला एका गोष्टीचा विचार करावा लागतो तो हा की माझ्याजवळचे ज्ञान हे खूप अफाट आहे व इतर लोक कसे कवडीमोलं आहेत. हा अंहकार त्या ज्ञानी व्यक्तीची माती करतो. आमच्या प्रिय तुकाराम शिंदेची तीच अवस्था झाली. या लेखाच्या प्रारंभी पुरंदरे आणि पु.लं.च्या जीवना तीलं मिश्कील प्रसंग नमूद करण्याची मला त्यामुळेच आवश्यक्ता वाटली. जीवनातील अनेक प्रसंग असेच तेवढ्याच सहजतेने घ्यायचे असतात. त्यावर फारसे भाष्य करत बसण्यापेक्षा त्याला उत्तर म्हणून थोडेसे मिश्कील हास्य पुरेसे असते. पण, धूर्त माणसं त्याचं भांडवल करतात. कुटील लोकं त्याचा आधार घेवून षडयंत्र रचतात तर शिघ्रकोपी आपली मानसिकता बिघडवतात. काही कालावधीसाठी समोरच्यालाही ते मनस्ताप देतात. पण त्यांच्या त्या वर्तनामुळे त्यांच्या पासून हळूहळू माणसे दूर जातात. ते मागे वळून पहातात. तेंव्हा त्यांच्यामागे कुणीच नसते. जवळ असण्याचा तर प्रश्नच नाही.

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# चेतनेची शिडी

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २२६



आपली ऊर्जा शोषून घेणाऱ्या अनेक गोष्टींमध्ये आपण नकळत गुंतलेलो असतो. भूतकाळात रममाण होणे, अर्धवट निद्रा, अतिविचाराने मेंदूत गुंता आणि गोंधळ, समाजमाध्यमांचे अतिक्रमण, स्वतःच्या मर्यादांना सातत्याने आव्हान आणि त्यामुळे अतिश्रम, निर्जलीकरण, नकारात्मकता, पडद्यासमोरील अतिरिक्त वेळ, ताणतणाव, भय, वारुणी (मद्य), चीडचीड, सत्वहीन अन्न (जंक फूड) इत्यादी इत्यादी. आपल्याला निरुत्साही करण्यासाठी हे सतत कार्यरत असणारे घटक आहेत आणि दिवसातील अनेक तास आपण त्यांच्या वेढ्यात असतो. यांच्यासाठी काही विशेष करावे लागत नाही, थोडा रिकामा वेळ असला की तेवढे पुरेसे असते. सगळे व्याप मग आपोआप येतात वेढायला.

याउलट अनेक ऊर्जादायी घटना- संगीत, निसर्ग, विश्रांती, सूर्यप्रकाश, सकारात्मकता, कृतज्ञता, ध्यानधारणा, निवडक श्वसनक्रिया, निद्रा, चौरस आहार, नवं ज्ञान, समाजकार्य आपल्याला सतत गुंतवून ठेवतात आणि मन प्रफुल्लित करतात. यांच्या आसपास असण्याने थकवा येत नाही, दमणूक होत नाही, हतोत्साह भिववत नाही.

**विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः।**
**निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति।।**

अमर्याद क्षमतांचे गाठोडे ही मानवाची पूर्वापार ओळख आहे. पण मीच कर्ता हा अहंभाव आणि गर्व, जीवनाच्या असंख्य शक्यता नाकारतो. आपली मिळकत खरं तर ईश्वराची देणगी असते. त्याची असीमित कृपा असते. या देणग्यांप्रती आपली सकारात्मकता आपल्याठायी नम्रभाव आणते. त्यामुळे अंगी पात्रता विकसित होत जाते. याला मदत होते सत्संग आणि अध्यात्मिक ज्ञान यांच्या सहभागाची.

स्पंदनं (व्हायब्रेशन्स) आणि वारंवारिता (फ्रीक्वेन्सी) या दोन संकल्पनांच्या बाबतीत माणसे वारंवार गल्लत करतात, पण या दोन्हींमध्ये मूलभूत फरक आहे. ऊर्जा जेव्हा आपल्या निर्मितीकेंद्राच्या दिशेने प्रवास करताना आकुंचित होते तेव्हा स्पंदने निर्माण होतात. मात्र ऊर्जा जेव्हा निर्मितीकेंद्राच्या परिघात प्रसरण पावते तेव्हा हेलकावे/ आंदोलने तयार होतात. आणि त्याच्या साच्यातून उत्पन्न होते- वारंवारिता! थोडक्यात ऊर्जेच्या आकुंचन-प्रसरणातून एक वारंवारितेचा साचा उद्भवतो.

**धर्मो हि तेषामधिको विशेषः धर्मेण हीनाः पशुभिः समानाः**

विचार करण्याची क्षमता, उपलब्ध पर्यायांचे अध्ययन करून परिस्थितीचे विश्लेषण करण्याची कुवत यांच्या मदतीने मानवाला आपल्या नियतीला आव्हान देता येते.

**मनोबुद्धिरहङ्कारश्चितं करणमान्तरम् ।**
**संशयो निश्चयो गर्बः स्मरणं विषया अमी ।**

विश्वात वास्तव्य असलेले आपण त्याकडे कसे बघतो आणि कसा प्रतिसाद देतो याकडे मानसशास्त्र अधिक काळजीपूर्वक लक्ष देत असते. ऊर्जेचे आकुंचन (स्पंदन) आणि प्रसरण (आंदोलन/हेलकावे) ज्या वेगाने होते, त्यावरून वारंवारितेची प्रमाण ठरविले जाते. या वारंवारितेमध्ये आपल्याला इजा करण्याची किंवा आपल्या जखमांवर फुंकर घालण्याची क्षमता असते. त्यामुळे आपल्याला तंदुरुस्त राहायचे असेल तर या वारंवारितेच्या हातात आपल्या आरोग्याची दोरी असते. उदा. संगणक, भ्रमणध्वनी किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे वापर त्यांच्यातील ऊर्जा आपल्या शरीरासाठी हानिकारक असते आणि तिचा आपल्या शारीरिक ऊर्जेशी सुसंवाद होऊ शकत नाही.

आपल्या आसपास जेव्हा विद्युत चुंबकीय ऊर्जेचे जाळे पसरते, तेव्हा ती मानवी शरीरातील नैसर्गिक ऊर्जेच्या ओघामध्ये व्यत्यय आणते. हा व्यत्यय अधिक काळासाठी राहिला तर स्वास्थ्याच्या समस्या उभ्या राहू शकतात. याचे दैनंदिन उदाहरण म्हणजे- संगणकाच्या पडद्याकडे सातत्याने बघत राहिले तर डोळ्यांवर ताण येतो आणि क्वचित डोकेही दुखायला सुरुवात होते. अतिशय कमी वारंवारिता असलेल्या अन्नाचे सेवन केल्यास आपली ऊर्जा पातळी उणावते म्हणूनच सत्वहीन (जंकफूड) खाऊ नये असे सुचविले जाते.

**वारंवारिता आणि वस्तुमानातील संबंध -**

सत्याची अवस्था फक्त ऊर्जेच्या संवेदनांमधून उजागर होत असते. त्यावर आपली सदसदविवेकबुद्धी प्रक्रिया करून आपल्याला वेळ आणि वस्तुमानाचे आकलन सादर करते.वेगळ्या शब्दात सांगायचे तर वस्तुमान बरेचदा भ्रामक भासते. प्रत्यक्षात ते खरे आणि म्हणूनच आपल्या उत्क्रांतीसाठी आवश्यक असते. त्याचा विचार गांभीर्याने होणे गरजेचे असते.

वारंवारिता वस्तुमानाला वैविध्यपूर्ण अव्दियता बहाल करीत असते. त्यामधूनच ऊर्जेच्या संरचनेचे आकार, रंग आणि पोत तयार होत असते. वारंवारिता, स्पंदने आणि हेलकावे या ऊर्जेच्या वैशिष्ठयांमुळे वस्तुमानाचे भौमितिक आकार तयार होत असतात आणि त्याला जीव बहाल केला जातो. पुढे त्यांचे रूपांतर वस्तूंमध्ये संभवते. माणसाच्या ऊर्जेमध्ये सकारात्मकता असेल तर त्यावरील अध्ययन आपल्याला सकारात्मक आणि नकारात्मक अनुभव सिद्ध करण्यास मदत करते.

उच्च कोटीचे स्वास्थ्य (हाय सब्जेक्टिव्ह वेल बीइंग) तेव्हाच साध्य होऊ शकते जेव्हा आपल्या अनुभवांकडे, जीवनाकडे आपण सकारात्मक नजरेने पाहायला शिकतो. सतत येणारे सकारात्मक अनुभव, क्वचित वाट्याला येणारे नकारार्थी विचार आणि एकुणातच जीवन- साफल्याची अनुभूती म्हणजे उच्च कोटीचे स्वास्थ्य!

आपला प्रत्येक संघर्ष मन आणि हृदय यातील असतो. काय/केव्हा/कसे वागायचे याबद्दलचे निर्णय घ्यायला आपण एकुणातच उशीर करतो. मात्र इतरांना सल्ले देण्यासाठी मात्र लगेच सरसावतो. आजच्या जगातील सर्वाधिक अंतर शब्द आणि कृतीमधील असते. ते घटविता आलं तरच बाकीच्यांना उपदेश करण्यात अर्थ असतो. थोर संत आणि नेते कायम काहीही बोलण्यापूर्वी त्यावर अंमलबजावणी करतात.

आयुष्याच्या प्रवाहात अनेक खळाळत्या पायवाटा, उत्फुल्ल झरे तयार करावेत- प्रेमासाठी, आनंदासाठी, शांततेसाठी, आशीर्वादांसाठी आणि अशा अनेक मिळकतींसाठी ओंजळी खुल्या असाव्यात. नंतर त्यांचाच वापर काही देण्यासाठी करावा. तोटी उघडावी आणि आनंदाला प्रवाहित करावे. वाटून टाकण्याची सवय लागली की श्रीमंती आपोआप वाढत जाते.

चेतनेच्या शिडीवरील कोणत्या पायरीवर आता आपण आहोत? पृथ्वीतलावरील जगण्याच्या वाटेवर बरेच आत्मबोध होत जातात. त्या त्या वेळची परिस्थिती यासाठी प्रामुख्याने कारणीभूत असते. आणि मग एखादा विशिष्ट टप्पा येतो, तोही विनाकारण ज्याक्षणी आयुष्याच्या अत्तुच्य टप्प्यावर आपण विराजमान झालो आहोत असं वाटायला लागतं. दरवेळी समज फक्त बदलत जाते, तीही चेतनेच्या पायरीनुसार. त्याप्रमाणात समज वरच्या पातळीवरील स्पंदनांच्या रूपात प्रतिबिंबित होते. सध्या मानवी चेतना, ज्याला आपण अंतर्ज्ञान म्हणतो त्या टप्प्यावर येऊन स्थिरावली आहे.

पृथ्वीतलावर अवतरलेले संत, गुरु आपल्याला हे अंतर्ज्ञान प्राप्त होण्यासाठी आवश्यक असलेली मानसिक चौकट बहाल करतात. क्वचितच एखादी व्यक्ती यापलीकडेही काही आहे कां, अधिक समावेशक, सध्याच्या ज्ञानापेक्षा महत्वाचे आणि प्राप्य असे काही आहे कां याचा शोध घेतात. चेतनेच्या पायऱ्या म्हणजे एखाद्या फळावरील आवरण टप्प्याटप्प्याने दूर करीत गाभ्याकडे वाटचाल करणे. असं मानतात की फळाचा तो सर्वात देखणा भाग असतो.

एक मात्र, या सगळ्या पायऱ्या खऱ्या असतात. ही सहा पायऱ्यांची उतरंड तळाशी असलेल्या मानवतेच्या सध्याच्या स्व-जागृतीपासून सुरु होते आणि एकावर एक गुंफत जाते.

**पहिली पायरी**

बरेचदा गफलतीने याच पायरीला अंतर्ज्ञान मानले जाते. अशा मंडळींनी थोडेफार धार्मिक, अध्यात्मिक किंवा मानसशास्त्रीय पुस्तकांचे वाचन केलेले असते. यामध्ये पौर्वात्य गूढवाद असतो. या वाचनानंतर खरोखर असं वाटायला सुरुवात होते की आसपासच्या मंडळींपेक्षा आपणास जीवनाचे आकलन थोडे जास्त झालेले आहे. अशी मंडळी मग लगेच स्व-मदत पुस्तके लिहायला सुरुवात करतात, ब्लॉग्स लिहून प्रसिद्धी आणि थोडेफार अर्थार्जन करण्याचा प्रयत्न करतात. प्रसिद्धी झाली की व्याख्यानेही द्यायला सुरुवात करतात. यामार्गाने मानवतेला थोडीफार मदत करतात. हा टप्पाही वाटतो इतका सोप्पा नसतो. सामाजिक रूढींना ओलांडून ही मंडळी एक पाऊल पुढे गेलेली असतात. आत्मज्ञानाच्या नव्या मार्गाकडे जाणे त्यांना जमू शकते.

**दुसरी पायरी**

इथे अध्यात्मिकता स्पष्टपणे सुरु होते आणि ज्ञानाची पातळी वाढते. आपण कोण आहोत आणि आपले जीवित कार्य काय आहे याची त्यांना जाणीव झालेली असते. पुनर्जन्म, सचेत जाणिवा, उर्जास्थाने, ऐहिक जीवनाची बलस्थाने यांचे अस्तित्व त्यांना मूलभूत समजत असते. हे आत्मबोधाचे अनुभव त्यांच्यात हळूहळू आमूलाग्र बदल घडवून आणायला सुरुवात करतात. त्यांची जीवनशैली अध्यात्माच्या मार्गाने प्रवासाला सुरुवात करते. शाकाहारी भोजन, योगसाधना, ध्यानधारणा अशी ही वाटचाल असते. जीवनभर हा प्रवास उन्नत मार्गावरून व्हावा या ध्येयाने ते जगायला सुरुवात करतात आणि हे सारे त्यांच्या बाह्यांगी, वर्तनात परावर्तित होते.अध्यात्मातील सौंदर्य आणि क्लिष्टता त्यांना आकर्षित करीत असते. जागरूकता आणि सजगता ओलांडून अशा व्यक्ती अध्यात्माच्या धारणांचा अभ्यास करीत आपले अनुभव वारंवार जगत असतात आणि त्यांत मग्न असतात.

**तिसरी पायरी**

विनाअट प्रेम, जगण्यातूनच स्वर्गारोहणाचा मार्ग शोधायचा असतो अशा ज्ञानाच्या सर्वसमावेशक टप्प्यावर ही पायरी नेते. इथे माणसाला त्याचे गंतव्य आणि तिकडे जाणारे मार्ग ज्ञात असतात. समाजाच्या चौकटीबाहेर त्यांची पावले वळलेली असतात. अध्यात्मिक दृष्टीने बघायला गेले तर इथे मानव वैश्विक होण्याचा प्रयत्न करतो. स्वतःचा समतोल ताब्यात असल्याने देव ही संकल्पना त्यांच्यासाठी बदलते. आपण देवाचाच एक हिस्सा आहोत आणि आपल्या अस्तित्वाला तो वेढून आहे या समजुतीत ते असतात. सुस्पष्ट ध्येय आणि त्याच्या साध्यासाठी मिळालेल्या आयुष्यात प्रयत्न करणे हीच आपली नियती आहे असं ते मानतात. या ग्रहावरील स्वतःच्या अस्तित्वाच्या पूर्ततेसाठी मानवतेची सेवा हा त्यांचा मार्ग असतो. उर्वरित आयुष्य त्याच वाटेने जाण्याची त्यांची तयारी असते. अशा व्यक्ती ज्ञानी, बहुश्रुत असतात आणि हे त्यांच्या कृतींमधून प्रतीत होत असते.

**चौथी पायरी**

शिडीवरील चौथी पायरी असते आत्म्याच्या ज्ञानाची- साक्षीभावाची. समोर उलगडणारे विश्व दुरून न्याहाळायचे हे त्यांचे इतिकर्तव्य असते. त्यांचा कोणाशीही संवाद असो वा नसो, त्यांची वैश्विक जाण स्वतःकडे सामान्य म्हणून बघण्याच्या पलीकडे गेलेली असते. जीवनमरणाच्या दोरखंडाला त्यागून फक्त विनाअट प्रेम हेच जगण्याचे मर्म आणि माध्यम असते आणि त्यासाठीच हा देह असतो ही जाण त्यांचा स्तर उंचावत असते. जीवनाकडे ते फारसे आकृष्ट होत नाही आई आसपासच्या समाजाच्या आकलनात समग्र भर घालण्यासाठी ते प्रयत्नशील असतात. या टप्प्यावरील आत्मे जगाकडे एक प्रेम व्यक्त करण्याची संधी म्हणून बघत असतात. विश्वाकडे जेव्हा ते नजर टाकतात तेव्हा त्यांना सगळीकडे एकत्व दिसते आणि एकाकार देव भेटतो. विशेषतः या पृथ्वीवरील आत्मकार्य संपुष्टात येते तेव्हा ह्या टप्प्यावर मानव जाऊन ठेपतो. हा असामान्यत्वाचा ठसा असतो.

**पाचवी पायरी**

इथे विश्वाच्या पलीकडचा टप्पा सुरु होतो. बारा मितींपासून आपले विश्व बनलेले असते आणि त्याच्या आत असंख्य मिती असतात. अमर्याद अस्तित्वाच्या वेढ्यात, अतिशय सुंदर आणि प्रभावी निर्मिकाच्या सहवासात आपले वास्तव्य असते. अनेक निर्मिक आपापल्या समग्र विश्वात सुखेनैव वास्तव्य करीत असतात. असे कोट्यावधी निर्मिक असतात आणि आपल्या ज्ञानकक्षांच्या पूर्वीच ते अस्तित्वात आलेले असतात. या संकल्पनेला महाशिव असे संबोधिले जाते. कोणत्याही सीमारेषा नसलेल्या अस्तित्वाला महाशिव मानतात. इथे मानसिक संकल्पनाही तोकड्या पडतात. प्रकाशाचा खूप मोठा स्रोत असतो, एवढेच सत्य. निर्मिक विनाअट प्रेमाचे प्रतीक असते याला कोठलाही आधार नाही. पृथ्वी ग्रह सगळ्या जीवितांना जोडतो आणि त्याच्याभोवती हे सर्वसमावेशक विश्व एखाद्या संरक्षणात्मक कवचासारखे असते. या पायरीवर फक्त अस्तित्व जोडण्याचा आणि तोडण्याचा विचार होत असतो आणि त्याला त्यांच्या विश्वाचे ध्रुवीकरण कारणीभूत असते. मानवाचे सध्या अस्तित्व असलेल्या विश्वाचे स्वरूप ५० टक्के प्रकाश आणि ५० टक्के अंधार असे आहे. पण हीच टक्केवारी ८०:२०, किंवा ७०:३०, किंवा ६०:४० इतकेच नव्हे तर ९९:१ अशीही संभवते.

**सहावी पायरी**

शिडीवरील हे अंतिम पाऊल. इथे प्रभावी संकल्पना असतात आणि त्या सामान्यांच्या आकलनाच्या पलीकडे असतात. विनाअट प्रेम असंख्य दिशांनी परावर्तित होत असते आणि असंख्य दिशांना आपले हात फैलावत असते. या पायरीवरील दृश्य अद्भूत असते, कारण काही भेदच उरलेले नसतात, सगळं एकाकार असते. प्रतीकात्मक अभ्यास करायचा असेल तर अशी कल्पना करू- आपण एका छोट्याशा तळ्याच्या कडेवर उभे आहोत आणि पाणी उडवतो आहोत. मग पटकन दुसऱ्या टोकाला जाऊन तेथूनही पाणी उडवत आहोत. म्हणजे एका टोकाकडून येणारे तरंग दुसऱ्या टोकाकडून येणाऱ्या तरंगांशी एकरूप होताना दिसतील.

महाशिव शक्तीचे कार्यच हे असते की निरनिराळ्या निर्मिकांना एकत्र आणून विनाअट प्रेमाचे एक समग्र रूप तयार करायचे आणि त्याच्या प्रतिमा आरशात दाखवायच्या. अंती स्व-स्वरूपात विलय हे ज्ञान मिळाले की चेतनेचे कार्य संपते. पदार्थ (मॅटर) आणि गती (मोशन) यांच्या एकत्रीकरणासाठी आवश्यक असलेली ऊर्जा(एनर्जी) हे एकत्र यायला हवेत. या अध्यात्माच्या पार्श्वभूमीवर आपले कार्य या महाशिव शक्तीला पूरक असावे म्हणून प्रयत्न करणे एवढेच उरते.

सकारात्मकतेच्या परिप्रेक्ष्यातून आपण जन्मलो, शिकलो, स्मरणात ठेवले, निर्माण केले, नष्ट केले, उत्क्रांत झालो, वरचा टप्पा गाठला, सीमा पार केली या जीवनातील चक्राचे ज्ञान आवश्यक असते. ज्यासाठी आपण जन्म घेतलाय, ते साध्य करणे याचसाठी अट्टाहास असावा. मग आपल्या विश्वात घडणाऱ्या प्रत्येक घटीकाप्रती आपण आपोआप नम्र होतो.

साधता संवाद
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८

# राम कृष्ण हरि श्वास झाला


## (भाग-४२)

रविवार दि.२१ जलै २०२४ चा दिवस अत्यंत महत्त्वाचा होता. कारण या दिवशी अनेक चांगले योगायोग जुळून आले होते. आषाढी पौर्णिमा, गुरू पौर्णिमा, व्यास पौर्णिमा आणि पवित्र अशा चातुरमासास आरंभ हे सगळे कसे छान योगायोग जुळून आलेत पण आम्हा वारकऱ्यांसाठी हा दिन विशेष महत्वाचा यासाठी आहे की, या दिवशी पौर्णिमेला प्रत्यक्ष परब्रह्म परमात्मा आमचा पांडुरंगच आम्हाला हा काल्याचा प्रसाद वाटप करतो आणि आम्ही भाविक कृतकृत्य होऊन जातो. नामदेव महाराजांनी म्हटल्याप्रमाणे

**जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले**
**तेव्हा या विठुले कृपा केली**

याची प्रत्यक्ष अनुभूती येते. खरोखरच जन्मोजन्मीची पुण्याई फळाला आल्याशिवाय अशी भगवंताची व संतांची कृपा होत नसते. म्हणूनच पायी चालत आल्याचे सारे श्रम आणि साऱ्या सांसारिक अडीअडचणी क्षणात दूर होतात. आणि आयुष्याची पुढील वाटचाल करण्यासाठी एक नवीन सकारात्मक उर्जा भरभरून मिळते. जड अंतःकरणाने सर्व पालख्या, दिंड्या व भाविक भक्त पांडुरंगाचा निरोप घेऊन परतीच्या प्रवासाला लागतात.

आषाढी कार्तिकी वारीचा पौर्णिमेचा काला म्हणजे यमुना तीरावर भगवान श्रीकृष्णाने आपल्या संवगड्यासवे केलेला अमृतमय 'गोपाळ कालाच' होय. अतिशय भक्तिभावाने हा काला उपरण्यात बांधून वारकऱ्याने घरी आणावा आणि सर्वांनी मिळून तो वाटून खाण्यात खरोखरच ब्रह्मानंदच वाटतो. संसारत परतलो तरी मन मात्र दिंडीत, पालखी सोहळ्यात,पावलीत,रिंगणात, चंद्रभागेच्या वाळवंटात, कळसाच्या दर्शनात आणि... आणि विठुलाच्या चरणावरच रेंगाळत राहातं. वाटतं देवा तुझे हे चरण आयुष्यभर काळजाला असेच कवटाळून धरावेत. पण... या संसाराची आसक्ती सुटेना आणि तुझा विरह सोसवेना अशी आमची गत होते. देवा, देहाने जरी मी संसारात असलो तरी मनाने मात्र अजूनही मी त्या चंद्राभागेच्या वाळवंटातच आहे. देह भान हरवून मी किर्तनात नाचत होतो. ते काल्याचे किर्तन म्हणजे प्रत्यक्ष श्री नामदेव महाराज किर्तन करत आहेत असे वाटते. आणि त्या किर्तनात तुम्ही आम्ही नाचतो हे काही विशेष नाही तर प्रत्यक्ष पांडुरंगच आम्हा वैष्णवां सोबत नाचतो. मग मला सांगा यापेक्षा अनुपम्य सुख सोहळा वेगळा काय असतो? त्याची अनुभूती घेतली. आषाढी दिंड्या पंढरीच्या वेशीवर पोचताच धन्य धन्य झाल्यासारखं वाटतं. माहेराच्या भेटीसाठी आसुसलेला जीव कृतार्थ होतो, आणि **सुखाचे हे सुख नाही त्रिभुवन** याची प्रत्यक्ष अनुभूती येते. जन्माचं सार्थक झाल्यासारखं वाटतं. देवा नखशिकांत काया थरथरते, लोचनाला कळसाचं दर्शन होतं अन् दंडवत घालण्यासाठी आसुसलेला हा देह जमिनीवर लोळण घेतो. आषाढी पौर्णिमेला भल्या पहाटे ब्राह्म मुहूर्तावर जाग आली, रात्रभर माझं मन देवा, माऊली-तुकोबांचे आणि संतांचे अभंग गात गात तुझ्या चरणाशी नतमस्तक झालं होतं. माझ्या डोक्यातली निद्राच जणु काही तुझ्या चरणावर लीन झाली होती. माझ्याही नकळत माझे पाय चंद्रभागेच्या दिशेने चालू लागले. चंद्रभागेच्या त्या विस्तीर्ण घाटावर भक्तांची गर्दी होतीच. आभाळ आल्याने नभीचा धुसर चंद्रही अलगदपणे चंद्रभागेच्या जळात पवित्र स्नान करण्यासाठी उतरला होता. लक्ष चांदण्या दीवे होऊन चंद्रभागेच्या लाटांवर हिंदोळे घेत होते. हे चंद्रभागेचं नयन मनोहर रूप पाहून देवा, अक्षरशः डोळ्याचं पारणं फिटलं रे पारणं फिटलं. अलगदपणे घाट उतरून चंद्रभागे मध्ये या देहानं डुबकी मारली आणि जन्मजन्मांतरीची सारी पापं शुद्ध झाली. माझं देहभान हरपलं आणि तसाच ओलेत्याने त्यासुरावलीचा वेध घेत घेत पाय चालु लागले. एव्हाना रूपाचा अभंग संपला होता. आणि विठुलचा गजर सुरू झाला. महारजासह सर्व वैष्णव तल्लीन होऊन नाचू लागले. माझा देहही फेर धरून नाचू लागला. टाळ मृदंग वीणा आणि चिपळ्या बेभान होऊन वाजु लागल्या. विठुल नामाचा गजर आसमंतात दुमदुमू लागला. आणि काय



सांगावं नवलच घडलं विठुलाने कमरेवरचे हात खाली घेतले आणि त्याने अक्षरशः वीट सोडली आणि वाळवंटात भक्तात अवतरला नुसताच अवतरला नाही तर फेर धरून नाचू लागला. भक्त वत्सल माझा विठु इतका तल्लीन होऊन नाचू लागला की पाहता पाहता माझ्या डोळ्यातून इंद्रायणी चंद्रभागा वाहु लागल्या. आता मी, मी राहिलो नव्हतो, भक्तवेडा विठुल भक्तासवे नाचू लागला. हा अनुपम्य सोहळा पाहण्याची आकाशात देवदेवतांची गर्दी केली होती. पण याचं भान ना भक्तांना ना विठुलाला. किर्तनकारा समवेत विठुल नाचू लगला. वाटलं काय भाग्यवान आहे हा किर्तनकार? पाहतो तर काय...?

**किर्तन काल्याचे । नामदेव करी ।।**
**काला वाटे हरि । वैष्णवला ।।२।।**

अरे बापरे हे तर साक्षात नामदेव महाराज? आणि टाळकरी कोण?...बाप रे माऊली, मुक्ता, जना, चोखा सगळी संतांची मांदियाळीच? कानात प्राण एकवटून शब्द न शब्द ऐकु लगलो. काय ती नामदेवांची रसाळ वाणी. अक्षरशः भक्ती रसाचे असंख्य झरे पाझरू लागले. त्या भक्ती रसात अवघे चराचर चिंब चिंब भिजु लागले. जणु असंख्य नद्या या नामादेवांच्या भक्तिरसात एकरूप होत होत्या. किर्तनाचा उत्तर रंग सरला. नामाचा गजर त्रिभुवनात निनादु लागला. अभिर गुलालाची उधळण आसमंतात झाली. प्रत्यक्ष हरिच आपल्या हाताने भक्ताला काला वाटु लागला. मनाच्या आनंदाला पारावार राहिला नाही. रंध्रा रंध्रातून आनंदाच्या लाटा उसळु लागल्या. आणि माझे तुकोबा आपल्या गंधर्वीय सूरात **आनंदाचे डोही आनंद तरंग...** गाऊ लागले. आणि आता हे पटलं की...

**ज्या सुखाच्या कारणे देव वेडावला ।**
**वैकुंठ सोडोनी संत सदनी राहिला ।।**

परब्रह्म परमात्मा पांडुरंग वैकुंठ सोडून भक्त पुंडलिकासाठी पंढरपूरात आला आणि इतर भक्तांची निष्काम भक्ती पाहून यांच्यातच रमला. वैकुंठापेक्षाही संत सदन त्याला जास्त प्रिय वाटु लागले, म्हणून तर तो वैकुंठ सोडून संत सदनी राहु लागलाय. आणि आपल्या लाडक्या भक्तांना स्वतःच्या हाताने काला वाटु लागलाय. खरोखरच आमच्या जन्मोजन्मीच्या पुण्याईचच हे फळ आहे. देवा, तुझी ही कृपा पाहून अंतःकरण भरून आलं रे...

**माय चंद्रभागा । लोचनी दाटली ।।**
**ठायीच सरली । क्षुधा तृष्णा ।।३।।**

देवा, तुझ्या हातचा हा काला मिळाला, आणि मी भरून पावलो रे भरून पावलो. आता काही मागणे असे शिल्लकच राहिले नाही रे. ही सर्व कृपा माझ्या माऊली व तुकोबाची आहे. नाही तर कुठे भरटलो असतो आपण कोण जाणे? माझ्या माऊली तुकोबांनी बोटाला धरून वारीत आणलं आणि जीव ओवाळून टाकावा असा लळा लावला त्यांनी या पामराला. त्यांच्याच तर कृपेने लेखणी अभंग रचना बोलु लागली की,

**नको मज काही आता ज्ञानदेवा ।**
**हात असु द्यावा माथ्यावरी ।।**

माऊली-तुकोबा मी तुमच्या दासांचाही दास रामाचा असाच आशिर्वादाचा हात सदैव माझ्या मस्तकावर असवा. केवळ आणि केवळ तुमच्या कृपेनेच आजचा दिवस माझ्यासाठीच नव्हे तर आम्हा सर्वांसाठीच परम अनंदाचा आहे. त्यामुळे आता मलाच काय कुणालही क्षुधा तृष्णेचं भानच राहिलेलं नाही. कारण तुझ्या काल्याचा एक शित काय चाखला आणि खरं सागु देवा या जीवाची क्षुधा तृष्णा ठायीच सरल्या रे. देवा, हा देह भान, संसार सारं सारं विसरून अशा या मंतरलेल्या क्षणाचा आनंद घेत असतानाच...

**निरोपाची नको । घाई विठुराया ।।**
**माहेराची माया । सोडवेना ।।४।।**

देवा, पांडुरंगा तुला एवढी काय घाई झाली आहे की, आत्ता कुठे तुझ्या सहवासाची गोडी लागली आहे आणि एवढ्यातच तुला घाई झालीय आम्हाला निरोप देण्याची. अरे आम्ही तुझी माहेरवाशीण लेकरं आहोत. तू पदरात घे ना? आणि इथे तुझ्याच सेवेत अखंड राहु दे ना? अरे ही माहेरची माया तुझ्या लेकरांना सोडवेना रे! अशी निरोपाची घाई नको करूस. तुच तर आमाचा माय बाप आहेस, तुच तर आमची विठु माऊली आहेस.

विठु माऊली स्मित करत म्हणाली, बाळा संसार दुःख मुळ असला तरी तो अटळ आहे हे ध्यानात घे. कारण तो तुच निर्मिला आहेस तर तुलाच तो निभवावा लागेल. माहेरात कितीही सुख असलं तरी कोणत्याही माहेरवाशीणीने तिथे जास्त काळ राहु नये. नाही तर लोक नाही नाही ते बोलतील. तुम्हाला ज्ञानेश्वर माऊलींनी मोठ्या विश्वासाने सांगितलं आहे ना की,

**अवघाची संसार सुखाचा करीन ।**
**आनंदे भरीन तिही लोकी ।।**

मग त्यांचच आचरण करा आणि तिन्ही लोकांच्या आनंदी संसाराचं सोड तुमचा संसार सुखी करा. लेक सासरी आनंदात असली की माहेरात माऊलीलाही आनंद होतो. आणि जाता जाता तुम्हाला आणखी एक संसाराचं गमक सांगतो की, तुमच्या वाट्याला जे कर्म आले असेल ते स्वधर्माने रा. झालीच तर कुणाला मदत करा, पण कुणाची निंदा नालस्ती करून वेळ वाया घालवू नका आणि स्वतः ला मनस्तापही करून घेऊ नका. आता सगळ्यात महत्वाचं सांगतो ते ध्यान देऊन ऐका की, **राम कृष्ण हरि** या आपल्या वैष्णवांच्या संजीवन मंत्राचं आचरण करत राहा. राम म्हणजे सत्य, कृष्ण म्हणजे प्रेम आणि हरि म्हणजे करूणा. वाणीत सत्यता असावी, वागण्यत प्रेमभाव असावा आणि भूतमात्रांविषयी अंतःकरणात अपार करूणा असावी म्हणजे संसार सुखाचा होईल. तुम्ही सारेजण वैष्णव कुळीचे राजे आहात. संसार टाळयचा नाही तर इमानेइतबारे तो पाळायचा. शेवटी मी तुमच्या पाठीशी आहेच ना! माझे आशिर्वाद सदैव तुमच्या पाठीशी आहेतच आणि हो पुन्हा कार्तिकीला आपण भेटुच. आता या बाळांनो. देवा, किती छान सांगितलात हो. संसारचा कंटाळा आला होता. पण तुम्ही आमच्या कर्तव्याची जाणीव करून दिलीत आम्हाला आणि माऊलींच्या अवघाचि संसार सुखाचा करीन...या वचनची अठवण करून दिलीत. जातो माघारी पंढरी नाथा तुझे दर्शन झाले आता...

देवा, पंढरी नाथा, तुझं दर्शन तर झालच पण त्याच बरोबर तुझ्या मार्गदर्शनाचा 'अमृतानुभवही' आला. आता निश्चिंतीने संसारात माघारी जातो, पण देवा तुझ्या विरहाची कल्पनाच व्याकुळ करते रे. पण आता मला लेकरं बाळं, शेत शिवार, कर्म, स्वधर्म सारं सारं दिसत आहे. अटळ असा संसार मला खुणावत आहे. पण तुला शब्द देतो देवा की, माऊलींनी सांगितल्याप्रमाणे इतरांचा करू शकेन की नाही ते सांगत नाही पण मझा मात्र अवघाचि संसार सुखाचा करीन... आणि तू सांगितलेला राम कृष्ण हरि हा संजीवन मंत्रही आचरणात आणेल. कारण माझ्या तुकोबांनी हाच मंत्र तुझी आन घेऊन आम्हाला संगितला होता. तुही तोच मंत्र आता सांगितल्यामुळे **राम कृष्ण हरि** हा संजीवन मंत्र माझा श्वास झाला आहे. आणि कार्तिकी वारीला भेटण्याचं तु वचन दिले आहेसच.

लवकरच अपली पुन्हा पुन्हा भेट होत रहील या विचाराने मनाला समाधान वाटते. आणि हेच समाधान घेऊन संसारात माघारी जातो देवा. शेवटी आम्हा सकळांवरती तुझी कृपाछाया असु द्यावी एवढी विनंती तुझ्या चरणी करून थांबतो. (ज्या अभंग रचनेचे निरूपण केले आहे ती अभंग रचना लेखकाचीच आहे.)

**।।राम कृष्ण हरि।।**

राष्ट्ररक्षा

ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

# अंदमान-निकोबारच्या विकासासाठी 'ग्रेट निकोबार' विकास प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा

भारतात पूर्वेकडील समुद्रात अंदमान व निकोबार बेटे आणि पश्चिमेकडील समुद्रात लक्षद्वीप बेटे स्थित आहेत. पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यांवरील अतिव्यग्र जलमार्गांवर लक्ष/निगराणी करण्याचे प्रचंड सामर्थ्य आपल्याला त्यांच्या भौगोलिक स्थितींमुळे प्राप्त झाले आहे. अंदमान व निकोबार बेटे संख्येत ५७२ आहेत. त्यातील ३६ बेटांवर वस्ती आहे. तर, लक्षद्वीपच्या समुहातील एकूण ३६ बेटांपैकी १० बेटांवर वस्ती आहे. महत्त्वाच्या समुद्री दळणवळणाच्या जलमार्गांनजीक (सी-लेन्स ऑफ कॉम्युनिकेशन) असल्याने तसेच आग्नेय आशिया व आफ्रिकन देशांचे संदर्भातील सामरिक भौगोलिक स्थिती त्यांचे महत्त्व वाढविते.

ग्रेट निकोबार, अंदमान आणि निकोबार द्वीपसमूहातील सर्वात दक्षिणेकडचे, निकोबार द्वीपसमूहातील सर्वात मोठे बेट आहे. बेटाचे एकूण क्षेत्रफळ १०४५ किमी वर्ग आहे. कॅम्पबेल बे येथील सर्वात मोठे गाव आहे. बेटाचा ९८ टक्के भूभाग हा विषववृत्तीय घनदाट जंगलाने व्यापला आहे. निकोबार द्वीपसमूहात २२ बेटे आहेत; जी उत्तर, मध्य आणि दक्षिण उपसमूहांमध्ये विभागली गेली आहेत.



### ग्रेट निकोबारच्या विकासासाठी ग्रेट निकोबार विकास प्रकल्प

भारत सरकारने ग्रेट निकोबारच्या विकासासाठी महा पायाभूत सुविधा प्रकल्प तयार केला आहे. हा प्रकल्प अंदमान आणि निकोबार आयलँड इंटिग्रेटेड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनद्वारे राबविण्यात येत आहे. पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाने २०२२ मध्ये या प्रकल्पाला पर्यावरणीय मंजुरी दिली. हा प्रकल्प ७२ हजार कोटी रुपयांचा असून पुढील ३० वर्षांत तो राबविला जाणार आहे. या प्रकल्पाद्वारे येथे इंटरनॅशनल कंटेनर ट्रान्सशिपमेंट टर्मिनल उभारण्यात येणार असून ४००० प्रवाशांना हाताळण्याची क्षमता त्यात आहे. ग्रीन फिल्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ, गॅस व सौर ऊर्जा प्रकल्प त्यासह प्रकल्पाची अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी टाऊनशिप उभारण्यात येणार आहे. १६,६१० हेक्टरवर हा प्रकल्प उभारत आहे.

### ग्रेट निकोबार द्वीपवरील आंतरराष्ट्रीय पारगमन बंदर

सरकारने/जहाज बांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने ग्रेट निकोबार बेटाच्या सर्वांगीण विकासाचा कार्यक्रम तयार केला आहे. ग्रेट निकोबार बेटांशी सलग्नित गॅलाथिया खाडीवर मेगा इंटरनॅशनल कंटेनर ट्रान्सशिपमेंट पोर्ट म्हणजेच आंतरराष्ट्रीय पारगमन बंदर विकसित करण्यात येणार आहे. याशिवाय विमानतळ, नागरी वसाहत विकसित करणे आणि वीज प्रकल्प यांचे काम करण्यात येणार आहे. इथल्या पायाभूत सुविधा या जगातील सर्वोत्तम कंटेनर ट्रान्सशिपमेंट टर्मिनल आणि आसपासच्या बंदरांमध्ये उपलब्ध करून दिलेल्या सेवासुविधांच्या गुणवत्तेशी बरोबरी साधणाऱ्या असतील.

ट्रान्सशिपमेंट पोर्ट म्हणजेच एका जहाजावरून दुसऱ्या जहाजावर माल चढविण्यासाठी उपयोगी ठरणारे पारगमन बंदर. हा प्रकल्पाच्या परिचालनाशी संबंधित तीन प्रमुख घटकांवर भर दिला आहे; ज्यामुळे हे ठिकाण एक आघाडीचे कंटेनर ट्रान्सशिपमेंट पोर्ट म्हणजेच एका जहाजावरून माल उतरवून, तो इच्छित स्थानी पाठविण्यासाठी- पुढच्या प्रवासासाठी दुसऱ्या जहाजावर चढविण्याची सुविधा असलेले बंदर बनू शकणार आहे. या ठिकाणी आंतरराष्ट्रीय शिपिंग व्यापारी मार्ग सागरी ४० मैल अंतरावर आहे. तसेच मोठ्या जहाजांसाठी आवश्यक असणारी पाण्याची २० मीटरपेक्षा जास्त नैसर्गिक खोली उपलब्ध आहे.

भारतीय बंदरांसह नजीकच्या परदेशी बंदरांमधून ट्रान्सशिपमेंट कार्गोची वाहतूक करण्याची क्षमता असल्यामुळे या ठिकाणाला महत्त्वाचे स्थान मानले जाते. प्रस्तावित सुविधा चार टप्प्यात विकसित केली जाणार असून पहिला टप्पा २०२८ मध्ये ४ दशलक्ष टीईयू हाताळणी क्षमतेसह कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित असून विकासाच्या अंतिम टप्प्यात त्याची क्षमता १६ दशलक्ष टीईयूपर्यंत वाढेल. प्रस्तावित ट्रान्सशिपमेंट बंदराच्या पहिल्या टप्प्यात जलरोधक भिंतीचे बांधकाम, गाळ उपसा, भरणी घालणे, जहाज नांगरणीची जागा, साठवणूक परिसर, इमारत आणि सोयी सुविधा, उपकरणांची खरेदी तसेच त्यांना स्थापित करणे आणि मुख्य पायाभूत सुविधांसह बंदर वसाहतीचा विकास समाविष्ट आहे.

### प्रकल्पाला विरोध का?

काही पर्यावरणप्रेमी या विकास प्रकल्पामुळे ग्रेट निकोबार बेटाच्या पर्यावरणाला धोका निर्माण होण्याच्या कारणास्तव त्याला विरोध करत आहेत. त्यांना वाटते की, येथील आदिवासीच्या जीवनावर या प्रकल्पामुळे प्रभाव पडेल. तसे होणार नाही. शॉम्पेन, निकोबारिज या आदिवासींची संख्या १००० हून कमी आहे. या बेटाची लोकसंख्या ८५०० असून शॉम्पेन, निकोबारिज या आदिवासींसह काही हजार गैरआदिवासी तिथे राहतात. या बेटावर शॉम्पेन आदिवासी केवळ १०० आहेत. शॉम्पेन जमातीचा बेटावरील नागरी वस्त्यांशी फारसा संवाद नाही. ते बेटाच्या जंगलात किनार पट्टीपासून दूर राहतात आणि शिकारी जीवन जगतात. याशिवाय मोठ्या संख्येने सरकारी कर्मचारी येथे उपस्थित आहे. येथे नौदल, तटरक्षक दल आणि सैन्य तैनात आहेत. इतर सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये बीएसएनएल, दूरसंचार सेवा, पोस्ट ऑफिस आणि राज्य परिवहन सेवेसाठी काम करणाऱ्यांचा समावेश होतो. काही निकोबारी आदिवासी हे भारतीय सैन्याच्या टेरिटोरियल आर्मीमध्ये सामील आहेत. या प्रकल्पामुळे काही लाख झाडे कापली जातील, असा एक आक्षेप आहे. पण हे बरोबर नाही. कारण इथे वर्षातून नऊ महिने पाऊस पडत असतो आणि इथली जंगले ही एव्हरग्रीन असून इतकी घनदाट आहेत की जंगलाच्या आत जाणे अशक्य असते. त्यामुळे या बेटांना लाकडांची एक वखारच समजली जाते.

### प्रकल्पाचे सामरिक महत्त्व

बंगालचा उपसागर आणि हिंद महासागर क्षेत्र हे भारतासाठी सामरिकदृष्ट्या आणि सुरक्षा हितासाठी महत्त्वाचे क्षेत्र आहे. चिनी पीपल्स लिबरेशन आर्मी नेव्ही या संपूर्ण क्षेत्रांत आपला विस्तार करत आहे. या क्षेत्रातील मलाक्का, सुंदा आणि लोंबोकच्या हिंद-प्रशांत चोक पॉइंट्सवर चिनी सागरी सैनिक तळ उभारत आहे. त्यासाठी ग्रेट निकोबार विकास प्रकल्पाला महत्त्व आहे. या बेटांना अनेक पारंपरिक व अपारंपरिक सुरक्षा धोके आहेत. जसे की चाचेगिरी, तस्करी, अमली पदार्थ, अवैध मानवी वाहतूक, अवैध शस्त्रास्त्र वाहतूक, आणि अवैध मासेमारी याकरिता भारतीय सुरक्षा दलांचा येथे तळ आहे. अंदमाननिकोबार द्वीपसमूह हा बंगालच्या उपसागरामध्ये स्थित आहे. या उपसागरामध्ये चिनी सैन्याची तैनाती खूपच वाढली आहे.

अंदमानच्या पूर्वेला कोको आयलॅण्ड्समध्ये चिनी लष्करी तळ असावा. याशिवाय बांगलादेशच्या चितगाव बंदरामध्ये चिनी नौदलाची उपस्थिती आहे आणि तिथे दोन पाणबुड्या चिनी नौ सैनिक चालवत आहेत. याशिवाय म्यानमारच्या सीतवे बंदरामध्ये चिनी सैन्याची उपस्थिती आहे. हंबनतोता श्रीलंकेचे बंदर हे चिनी सैन्याचे लष्करी तळ आहे. यामुळे या भागामध्ये अंदमान-निकोबार समूहाचे रक्षण करण्याकरिता तयारी करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. अंदमान-निकोबार बेटांवर एक प्रमुख लष्करी पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू आहे. एअरफील्ड व जेटी सुधारणे, अतिरिक्त रसद व साठवणूक सुविधा, लष्करी कर्मचाऱ्यांसाठी तळ, गस्त घालण्यासाठी व पाळत ठेवण्यासाठी पायाभूत सुविधा यांचा समावेश आहे. या प्रकल्पाचे उद्दिष्ट अतिरिक्त सैन्य दल, मोठ्या युद्धनौका, विमाने, क्षेपणास्त्र तैनात करण्याचे सुलभीकरण करणे असे आहे. द्वीपसमूहाच्या सभोवतालच्या संपूर्ण क्षेत्रावर बारीक पाळत ठेवणे आणि ग्रेट निकोबार येथे मजबूत लष्करी प्रतिबंध उभारणे हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी महत्त्वाचे आहे. त्यामुळे या प्रकल्पाला महत्त्व आहे. हा प्रकल्प भारताच्या दृष्टीने एक आत्मनिर्भर आणि स्वावलंबी राष्ट्र बनण्यासाठी तसेच देशाच्या आर्थिक विकासाला पाठबळ देईल. अत्यंत महत्त्वपूर्ण समुद्र जलमार्गिकाच्या संगमावर वसलेली असल्याने ही बेटे इतर सत्तांनाही महत्त्वाची वाटतील. अंदमान व निकोबार द्वीपसमूह म्हणजे न बुडणाऱ्या चार विमानवाहक नौकाच आहे. ही द्वीपसाखळी स्वसंरक्षणाव्यतिरिक्त भारताची पूर्वे कडे राष्ट्रीय हित साध्य करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. म्हणून या बेटांचा सर्वांगीण विकास आवश्यक आहे. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

# ... पुन्हा एकदा शाहबानो



**अनेकदा शरियतच्या नावाखाली मुस्लिम महिलांचे हक्क डावलले जातात. काम न करणाऱ्या महिला पतीपासून विभक्त झाल्यानंतर कुठे जातील, त्यांचे जीवन कसे असेल, याचा विचारही होत नाही. असे असताना सर्वोच्च न्यायालयाने दिलेला मुस्लिम महिलाही पोटगी मागू शकतात, हे स्पष्ट करणारा निकाल मुस्लिम महिलांना आश्वस्त करणारा आहे. या निकालाने अनेकांना शाहबानो प्रकरणाचे स्मरण झाले असेल.**

नोंद

शिवाजी कराळे

सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच मुस्लिम महिलांबाबत दिलेला मोठा निर्णय दखल घेण्याजोगा आहे. सीआरपीसीच्या कलम १२५ नुसार मुस्लिम महिला पतीकडून पोटगीची मागणी करू शकते, असा महत्त्वपूर्ण निर्णय दिला गेल्यामुळे त्रासात असणाऱ्या महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे, यात शंका नाही. पत्नीला पोटगी देण्याबाबतच्या तेलंगणा उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देण्यासाठी मोहम्मद अब्दुल समद नावाच्या व्यक्तीने सर्वोच्च न्यायालयात संबंधित याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने देखभाल भत्याबाबतचा हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

सीआरपीसी कलम १२५ अन्वये घटस्फोटित पत्नीला पोटगी देण्याच्या निर्देशाविरुद्ध मोहम्मद अब्दुल समद यांनी दाखल केलेली ही याचिका न्यायमूर्ती बी. व्ही. नागरथना आणि न्यायमूर्ती ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांचा समावेश असणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने फेटाळली. 'मुस्लिम महिला (घटस्फोटावरील हक्कांचे संरक्षण) कायदा, १९८६' हा धर्मनिरपेक्ष कायद्यावर विजय मिळवू शकत नाही, असे न्यायालयाने यावेळी म्हटले. अर्थात हा अशा स्वरूपाचा पहिला निर्णय नाही. यापूर्वीही कलम १२५ धर्मनिरपेक्ष असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले होते. कारण ते फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार आहे. याअंतर्गत येणारी सगळी कलमे धर्मनिरपेक्षच आहेत. कोणत्याही एका धर्माला लागू होतील, अशा वैयक्तिक कायदेस्वरूपात ती नाहीत. म्हणूनच हा शाहबानो प्रकरणाच्या निकालाची पुनरावृत्ती ठरणारा निकाल असल्याचे आपण लक्षात घ्यायला हवक. मुख्य म्हणजे कलम १२५ मध्ये केवळ महिलाच नाही तर मुले, वृद्ध पालक यांची जबाबदारीही घरातील कर्त्या पुरुषावर असल्याचे म्हटले आहे. एकंदरीत आपल्याकडील सामाजिक परिस्थिती बघता या निर्णयाचा विचार व्हायला हवा.

आपल्याकडे अद्यापही महिला आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर नाहीत. लिंगभेदाची स्थिती पाहिली तर ही दरी सातत्याने वाढताना दिसते. या यादीमध्ये आपण इतर देशांपेक्षा बरेच खाली आहोत. आपल्या देशातील बहुसंख्य महिला आर्थिकदृष्ट्या पतीवर वा इतरांवर अवलंबून असण्यामागील अनेक कारणे बघायला मिळतात. उदाहरणार्थ, मातृत्वाची जबाबदारी स्वीकारताना त्यांना कारकीर्दीत दोन पावले मागे यावे लागते. अद्यापही मध्येच शाळा सोडणाऱ्या, शिक्षण थांबवणाऱ्या मुलींचे प्रमाण बरेच जास्त आहे. मुलींना शिक्षणाची कमी संधी मिळत असल्यामुळे पुढे नोकरी आणि स्वत:च्या गरजांच्या परिपूर्तीची वेळ येते, तेव्हा पुरुषांच्या तुलनेत त्या मागेच दिसतात. अजूनही कमावण्याची जबाबदारी पुरुषावरच असल्याचे मत मांडणारा एक वर्ग आहे. बायकांनी घर आणि मुले सांभाळावीत, घरकामाला प्राधान्य द्यावे, असा त्यांचा विचार असतो. यातूनच कौटुंबिक पातळीवर कामाचे असमान वाटप बघायला मिळते.

दुसरीकडे बाई कमावत असली तरी घरातील कामांमधून तिची सुटका होत नाही. उलट, तिला या दोन्ही आघाड्या सांभाळण्याची कसरत करावी लागते. कारकीर्दीत मागे राहण्याचे हेदेखील एक मोठे कारण आहे. या सगळ्यामुळे तिच्या अर्थहक्कांवर परिणाम होतो. मुस्लिम महिलांविषयी बोलायचे तर आकडेवारीनुसार साक्षरतेच्या दृष्टीने वा कामातील सहभागाच्या दृष्टीने मुस्लिम महिलांची स्थिती अधिक बिकट आहे. या पातळीवर त्या अधिक मागे दिसतात. अजूनही बुरख्यासारख्या परंपरांमध्ये अडकल्या असल्यामुळे त्यांना बाहेर पडण्याची, विकास साधून अर्थनिर्भर होण्याची संधी तुलनेने कमी मिळते. या सगळ्या पृष्ठभूमीवर महिलांसाठी आणि विशेषत: मुस्लिम महिलांसाठी पोटगीचा हक्क किती महत्त्वाचा आहे, हे लक्षात येते. कदाचित त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाला ते पुन्हा एकदा अधोरेखित करण्याची गरज भासली असावी. आधी उल्लेख केल्याप्रमाणे याआधीही न्यायालयाने ही बाब स्पष्ट केली आहे. मात्र, आधीच्या कोर्टाने सांगितलेली बाब अद्याप समजत नाहीये का, अजूनही हा कायदा उलगडत नाहीये का, हेही बघायला हवे. कारण अर्थ समजून घेताना तसेच त्याची अंमलबजावणी करताना फक्त कलमाचा नाही तर संबंधित कायद्याचा पूर्ण अभ्यास केला जातो. तिथे बाकी परिस्थितीही लक्षात घ्यावी लागते. म्हणजेच व्याख्या आणि त्यातील मथितार्थ लक्षात घेऊन कायदा वापरला पाहिजे. पण कधी कधी यात त्रुटी राहतात आणि खटले सर्वोच्च न्यायालयापर्यंत येतात. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाला पुन्हा पुन्हा कायद्याचा खरा अर्थ समजून सांगावा लागतो. ताज्या निकालाच्या निमित्ताने हीच बाब पुन्हा एकदा उघड झाली आहे. तलाक देण्याचा अर्थ पत्नीला वाऱ्यावर सोडून द्यायचे, असा होत नसल्याचा विचारच या निकालाद्वारे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने मुस्लिम पतीची याचिका फेटाळत घटस्फोटित मस्लिम पत्नीलाही भरणपोषण भत्ता मिळण्याचा हक्क असल्याचा निर्णय दिला आहे. या निर्णयाने ४९ वर्षीय घटस्फोटित शाहबानो प्रकरणाच्या आठवणीही ताज्या झाल्या. त्यावेळीदेखील सर्वोच्च न्यायालयाने असाच निर्णय दिला होता. मात्र, मुस्लिम समाजाने काढलेले मोर्चे, झालेल्या दंगली आणि दगडफेक लक्षात घेऊन आणि मतपेढीचा विचार करून राजीव गांधींच्या काँग्रेस सरकारने कायदा करून न्यायालयाचा हा निर्णय रद्द केला होता. त्यावर मोठ्या प्रमाणात टीकाही झाली. समद यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ नुसार मुस्लिम महिलेला पतीकडून भरणपोषण मिळण्याचा अधिकार असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. न्यायालयाने म्हटले की, सीआरपीसीची तरतूद धर्मनिरपेक्ष आणि धर्म तटस्थ असल्याने सर्व धर्मातील विवाहित महिलांना लागू होते. न्यायालयाच्या या निर्णयावर मुस्लिम धर्मगुरूंनी नाराजी व्यक्त केली असली, तरी त्याला काहीच अर्थ नाही. पती-पत्नीचे नाते चांगले नसल्यास घटस्फोटामुळे वेगळे होण्याची आणि नव्याने आयुष्य सुरू करण्याची संधी मिळते. घटस्फोट घेतल्यास बंधनातून मुक्तता मिळू शकते. मात्र, संबंधित स्त्री पत्नी राहिली नाही तर घटस्फोटित पतीने खर्चाची जबाबदारी का उचलावी, असा प्रश्न मुस्लिम धर्मगुरू करतात. परंतु घटस्फोट दिल्यानंतर पती दुसरा विवाह करून मोकळा होत असताना पहिल्या पत्नीने उत्पन्नाचे साधन नसल्यास कसे जगायचे, या प्रश्नाचे उत्तर धर्मगुरू किंवा अन्य कोणीच देत नाही. यामुळेच अनेक मुस्लिम स्त्रियांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले. अनेकदा शरियतच्या नावाखाली मुस्लिम महिलांचे हक्क डावलले जातात, असे त्यांचे म्हणणे आहे. घटस्फोट परस्पर संमतीने झाला नसेल तर पोटगी देणे आवश्यक आहे. काम न करणाऱ्या महिला पतीपासून विभक्त झाल्यानंतर कुठे जातील, त्यांचे जीवन कसे असेल, याचाही विचार व्हायला हवा. ताज्या प्रकरणी सर्व धर्मातील महिलांना समान वागणूक आणि न्याय देणारा कायदा देशात असायला हवा. शरियत आणि 'मुस्लिम पर्सनल लॉ'च्या नावाखाली मुस्लिम महिलांचे नेहमीच नुकसान होत असल्याचे अनेक जणींचे म्हणणे आहे. यासंबंधीची एक घटना वाचकांना स्मरत असेल. २००१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने डॅनियल लतीफी प्रकरणात १९८६ च्या कायद्याची घटनात्मक वैधता कायम ठेवली होती. शाहबानो खटल्यातील ऐतिहासिक निकालाने 'वैयक्तिक कायदा' स्पष्ट केला आणि लिंग समानतेच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी समान नागरी संहितेची आवश्यकता नमूद केली. विवाह आणि घटस्फोटाच्या बाबतीत मुस्लिम महिलांना समान हक्क मिळण्याची पायाभरणी केली. शाहबानो प्रकरणात, घटस्फोटानंतर स्वत:ला सांभाळू न शकणाऱ्या आपल्या घटस्फोटित पत्नीला आधार देण्याचे मुस्लिम पतीचे कर्तव्य आहे, असे नमूद केले होते. खंडपीठाने शाहबानो प्रकरणात नमूद केले होते की, पतीच्या उत्तरदायित्वावर या संदर्भात कोणताही 'वैयक्तिक कायदा' अस्तित्वात नाही आणि कलम १२५ अंतर्गत भरणपोषणाची मागणी करण्याचा अधिकार महिलांना आहे. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात स्पष्ट केले की, इतर धर्मांप्रमाणे घटस्फोटित मुस्लिम महिलेलाही फौजदारी संहितेच्या कलम १२५ अंतर्गत पोटगी मागण्याचा अधिकार आहे. आता नागरत्ना आणि न्यायमूर्ती ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांचा समावेश असणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने ९९ पानांचा निकाल देताना सांगितले की, घटस्फोटित मुस्लिम महिलेलाही फौजदारी संहितेच्या कलम १२५ अंतर्गत भरणपोषणासाठी याचिका दाखल करण्याचा अधिकार आहे.

## पाऊस

तप्त झाल्या पावलांना न कळला इशारा ओले
चिंब करीत आल्या पावसाच्या धारा
ओसाड पर्वत खुलला घेऊनी हिरवा रंग साथ
येत ओहोळांची नदी-नाले भरली तुडुंब
हरित तृण जागी झाली जागी झालीत पाने
बेधुंद स्वरात गाऊ लागे कोकिळा आपले गाणे
खेळ करीत फुलपाखरू कळी फुलांना देई रंग
पक्ष्यांच्या किलबिलात झाडे-वेली झाली दंग
दाही दिशा स्पर्श करूनी सांगत आली वारे
आसुसलेल्या चातकाचे स्वप्न झाले पुरे

डॉ. मंगेश अ. रणदिवे

## गुरुवंदना

गुरू चरणी माथा टेकून,
मिळाले अनंत दिव्य ज्ञान.
जगण्याचे आले मज भान.
सत्कारणी लागले जीवन।।१।।
गुरूने चालविले सानंदे,
मन पोहचले ब्रह्मानंदे.
पाहुनिया सुंदर रूपाते.
मन व्याकूळ गदगदे।।२।।
गुरूने शमविले चित्त.
पद वंदूनी झाले शांत.
संपली ही जीवनाची भ्रांत.
तन्मयता पूर्ण ठाके दत्त।।३।।
गुरूने उपचारिले मन,
साकारून आले कारुण्य.
सार्थकी लागेल जीवन.
धन्यता होई ब्रह्मलीन।।४।।

रेखा भिवगडे

## श्री गुरू चरण

गुरू परब्रह्म स्वरूप तोची सखा मायबाप
गुरू महेश महादेव राहो पदी सेवाभाव
स्वयें गुरू धुंडाळी भक्तास मनी त्याचे लावती ध्यास
गुरू नसे कुणी व्यक्ती जी असे अगाध शक्ती
सद्गुरू नित्य एक तत्त्व शिष्याचे लागे पणास सत्त्व
भक्त ठेविता श्रद्धा भक्ती गुरू त्यांचे काजा धावती
गुरू निरंतर स्मरावा गुरू प्रत्येकाने करावा
गुरू एक ध्यानी धरावा अहंकार शत्रू दूर ठेवावा
धन, कांचन, दारा प्रपंचाचा फटाफट पसारा
मन धावे सैरावैरा गुरू लावितो पैलतीरा
या भूवरी गुरूचे गुरुत्व ठेवी भक्तांठायी ममत्व
गुरू आईचा पदर ठाई ठाई भक्तांसी आधार
गुरू ज्ञानाचे भांडार शिकवी जनांसी सदाचार
भक्तास सांभाळी वारंवार कृपा करती अपरंपार
नित्य भजन संकीर्तन गुरू भाव भक्तीचे कारण
करी चिंतन मनन हा जन्म नसे अकारण
भ्रमले दमले हे मन सदा भरकटे दिशाहीन
धरिता अनन्य भावे गुरुचरण
परमानंदे सुखावे अंत:करण

प्रशांत हनवाडीकर

